■ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : विशेष लेखांचा विभाग

एप्रिल २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

विकासाला गती



अर्थसंकल्प २०२१-२२

सत्यमेव जयते

मृद व जलसंधारण विभाग,
महाराष्ट्र शासन

जलसंधारणातून जलसमृद्धी

थेंब थेंब वाचवा पाण्याचा
हाच मार्ग आहे सुखी भविष्याचा!

- मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून जलसंधारण, जलसंपदा, कृषी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जिल्हा परिषदांकडील जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती करून मूळ पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्याचा निर्णय.
- पहिल्या टप्प्यात मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतील ७९१६ प्रकल्पांच्या दुरुस्तीकरिता १३४१ कोटींचा आराखडा. सर्व प्रकल्पांच्या दुरुस्तीची विशेष मोहीम.
- मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी २०२०-२१ साठी ४५० कोटी तर २०२१-२२ साठी ७२० कोटींची तरतूद.

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. शंकरराव यशवंतराव गडाख
मा. मंत्री, मृद व जलसंधारण

श्री. दत्तात्रय विठोबा भरणे
मा. राज्यमंत्री, मृद व जलसंधारण

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री

वर्ष ७२ वे | अंक ८ | एप्रिल २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

अंतरंग

भक्कम तरतूद	५
प्रगती अधिक गतिमान	६
समृद्ध करणारा अर्थसंकल्प	७
सर्वसमावेशक अर्थसंकल्प	८
संकटातही साधला समतोल!	२२
लोकहित सर्वोतोपरी	२४
कृषिपंप वीजजोडणी धोरण	२७
महाआवास : सर्वांसाठी घरे	३०
लसही घ्या अन् काळजीही	३३
पाऊल पडते पुढे	३५
वारसा जपला जाणार...	४६
मंत्रिमंडळात ठरले !	४९
विचारांवर ठाम	५१
आंबेडकरी चळवळीचा पाया	५४
वंचितांचा विकास	५७

८

सर्वसमावेशक अर्थसंकल्प

राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि सर्व विभागांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प कोविडच्या पार्श्वभूमीवरील सर्वोत्तम असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. आरोग्य, नागरी सुविधा आणि घरे महिलांच्या मालकीची व्हावीत, यांसारख्या विविध तरतुदींमुळे अर्थसंकल्प सर्वसमावेशक झाला आहे.

कृषिपंप वीजजोडणी धोरण

२७

कोरोना आणि लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना हात देऊन शेतकरी बांधवांचा विकास साधण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने नुकतेच 'कृषिपंप वीजजोडणी' हे एक अत्यंत महत्त्वाचे धोरण जाहीर केले आहे. शेतीसाठी वीज जोडणी हे या धोरणाचे महत्त्वाचे अंग आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : विशेष लेखांचा विभाग

१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मात्र गेल्या वर्षीप्रमाणे यावेळीही कोरोना महामारीच्या संकटामुळे सामुहिकपणे हा उत्साह साजरा करणे शक्य होणार नाही. मात्र बाबासाहेबांच्या विचारांचे वाचन, चिंतन व मनन करून अनोखी आदरांजली आपण महामानवाला वाहू शकतो. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त या अंकात विशेष लेखांचा विभाग समाविष्ट करण्यात आला आहे.

५१

विकासाला गती

विधिमंडळात नुकताच सादर करण्यात आलेला २०२१-२२ चा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासाचा भक्कम पाया आहे. राज्याला अधिक समृद्ध करणारा आहे. अवघ्या जगाची आर्थिक स्थिती कोलमडणाऱ्या कोविड-१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या स्थूल उत्पन्नात ८ टक्के घट होऊनही विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

नैसर्गिक संकटांचा व कोरोनासारख्या महामारीचा सामना करत राज्यातील सर्व घटकांना अर्थसंकल्पात न्याय देणे म्हणजे तारेवरची कसरतच. मात्र सर्वसामान्य माणूस हाच राज्य शासनाच्या केंद्रस्थानी असल्याने ही कसरत लीलया पार पाडण्यात आली आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि सर्व घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प कोविडच्या पार्श्वभूमीवरील सर्वोत्तम असल्याचे मत विविध अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. हे मत राज्याचा विकासरथ सुयोग्य दिशेला जात असल्याचे सूचक आहे.

कोविड-१९सारख्या आजारांवर मात करता यावी यासाठी आरोग्य यंत्रणा बळकट करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. त्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या उत्तम दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धन केले जाणार आहे. यासाठी ७५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालय, मनोरुग्णालय, ट्रॉमा केअर सेंटर, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे बांधकाम तसेच तालुकास्तरीय रुग्णालयांचे श्रेणीवर्धन केले जाणार आहे. त्यासोबतच नागरी आरोग्य सेवा, साथरोग अद्ययावत संदर्भ सेवा रुग्णालये, कार्डियाक कॅथलॅब, ग्रामीण भागात कर्करोगाच्या निदानाची सोय, रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा, नवीन अभिमत विद्यापीठ, परिचर्या तसेच भौतिकोपचार व व्यवसायोपचार, कोविड पोस्ट केअर, नवीन शासकीय महाविद्यालये आदींची निर्मिती केली जाणार असल्याने नजीकच्या आरोग्य सेवा अधिक सुकर होणार आहेत.

शेतकरी जगाचा पोशिंदा मानला जातो. त्याच्या उन्नतीसाठी शासन विविध योजना राबवत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. त्यांना शून्य टक्के व्याजाने पीककर्ज, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण, कृषिपंप वीजजोडणी, वीजबिलात सवलत, शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, यासाठी 'विकेल ते पिकेल' धोरणाची अंमलबजावणी, महाराष्ट्र ग्रो बिझनेस नेटवर्क प्रकल्प, शरद पवार ग्राम समृद्धी योजना, रेशीम उद्योग शेती आदी योजनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्राला नवी उभारी दिली जाणार आहे.

शेती क्षेत्राला संजीवनी देणाऱ्या, २६ लाखांहून अधिक हेक्टर सिंचन क्षमता वाढवणाऱ्या जलसंपदा विभागाच्या २७८ प्रकल्पांसाठी भरीव निधी देण्यात आला आहे. गोसीखुर्द प्रकल्प २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर पायाभूत सुविधांच्या विकासावरही भर दिला गेला आहे. सागरी महामार्ग, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ, नागरी सडक योजना, पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प, विविध मेट्रो प्रकल्प आदी महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम ४४ टक्के पूर्ण झाले असून एकूण ७०१ पैकी नागपूर ते शिर्डी हा ५०० कि.मी.चा मार्ग १ मे २०२१ रोजी वाहतुकीसाठी खुला केला जात आहे. कोरोना काळातही विकासकामे किती झपाट्याने सुरू आहेत याचेच हे उदाहरण. राज्याच्या सर्व विभागांच्या योजना व प्रकल्पांसाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आल्याने हा अर्थसंकल्प सर्वांगीण विकासाबाबत सर्वसामान्यांना आश्वस्त करणारा ठरला आहे.

सध्या राज्यात कोरोनाचा संसर्ग पुन्हा वाढण्यास सुरुवात झाली आहे. राज्य शासन आवश्यक पावले उचलत आहे, मात्र नागरिकांनी 'मी जबाबदार' या मोहिमेचा भाग होत मास्क वापरणे, शारीरिक अंतर ठेवणे, वेळोवेळी हात स्वच्छ धूणे अथवा निर्जंतुक करणे या त्रिसूत्रीचा अवलंब करून आपले कुटुंब सुरक्षित करणे गरजेचे आहे. आपण सुजाण नागरिक आहात, त्यामुळे आपण या मोहिमेत सहभागी होऊन तिला चळवळीचे रूप द्याल, असा माझा विश्वास आहे.

एप्रिल २०२१ च्या अंकात यंदाच्या अर्थसंकल्पाची वैशिष्ट्यपूर्ण माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष लेखांचा विभाग, कोरोना प्रतिबंधक लसीकरण, महत्त्वाच्या घडामोडी आदींचा समावेश या अंकात करण्यात आला आहे. हा माहितीपूर्ण अंक आपणास आवडेल, अशी खात्री आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

कोरोनामुळे स्थूल राज्य उत्पन्नात ८ टक्के घट होऊनही कृषी, पायाभूत सुविधांची कामे तसेच उद्योग व गुंतवणुकीला अधिक चालना देऊन महाराष्ट्र मोठी भरारी घेईल. राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य यंत्रणेला मजबूत करण्यासाठी केलेली तरतूद निश्चितच महाराष्ट्र सुदृढ करणारी ठरेल. सर्व क्षेत्रात घसरण होत असताना ११.७ टक्के इतकी विक्रमी वाढ नोंदवणाऱ्या कृषी क्षेत्राला अधिक बळकटी देण्यात येईल. हा अर्थसंकल्प पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देताना समाजातील सर्व घटकांना दिलासा देणारा आहे.

भक्कम तरतूद

देशात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण जग आणि देशाची अर्थव्यवस्था संकटात असताना महाराष्ट्रावरही त्याचा परिणाम जाणवणारच होता. संपूर्ण आर्थिक वर्षात जवळपास आठ महिने राज्याच्या स्थूलराज्य उत्पन्नात सर्वाधिक योगदान देणारी उद्योग आणि सेवा क्षेत्रासारखी महत्त्वाची क्षेत्रे टाळेबंदीमुळे बंद होती त्याचा परिणामही राज्य अर्थव्यवस्थेवर झाला असला तरी महाराष्ट्र कधीच थांबला नाही आणि थांबणारही नाही. टाळेबंदी उठवल्यानंतर महाराष्ट्राच्या अनेक क्षेत्रातील अर्थचक्र गतिमान झाले असून भविष्यात कोरोनाचे संकट कमी झाले तर महाराष्ट्र पुन्हा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी भरारी घेईल, असा मला विश्वास वाटतो.

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

सक्षम आरोग्य सेवा

आरोग्य सेवा, आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास, नवीन वैद्यकीय महाविद्यालये प्रत्येक जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कोविडपश्चात समुपदेशन केंद्रे अशा अनेक निर्णयांद्वारे आरोग्य व्यवस्थेला सक्षम करण्याचे प्रयत्न या अर्थसंकल्पातून झालेले दिसतात.

शेतकऱ्यांना दिलासा

ज्या शेतीने राज्य अर्थव्यवस्थेला भक्कम आधार दिला त्या शेती क्षेत्रास आणि शेतकऱ्यांना दिलासा देणारे अनेक निर्णय यंदाच्या अर्थसंकल्पात घेण्यात आले आहेत. यात ३ लाखापर्यंतचे पीककर्ज वेळेत फेडणाऱ्या शेतकऱ्याला शून्य टक्के व्याजदराची योजना ही अतिशय महत्त्वाची आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना मजबूत करणारी योजना निश्चितपणे शेतकऱ्यांना उपयोगी ठरेल. शेती आणि शेतकऱ्याला सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सौर कृषी पंपाच्या माध्यमातून शेतीला दिवसा पाणी देण्यासाठी अखंडित वीज पुरवठा, कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना, कृषी उत्पादनांना हमी नाही तर 'विकेल तेच पिकेल'च्या माध्यमातून हमखास भाव मिळवून देण्याचे शासनाचे प्रयत्न भविष्यात या क्षेत्राला अधिक बळकटी देतील. तसेच ऊसतोड कामगारांसाठी घेतलेला निर्णयही खूप महत्त्वाचा ठरणार आहे.

महिला सक्षमीकरण

महिलेच्या नावे घर खरेदी केल्यास मुद्रांकशुल्कात कपात, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले योजनेतून ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थिनींना मोफत बसची सुविधा, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी नव्याने सुरू करण्यात आलेली संत जनाबाई सामाजिक सुरक्षितता योजना, तेजस्विनी बस संख्येत वाढ, राज्य राखीव महिला पोलिसाची स्वतंत्र तुकडी यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयातून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया गतिमानपद्धतीने पुढे नेली आहे

पायाभूत सुविधांचा विकास

उद्योग, व्यवसाय, पर्यटन यासारख्या क्षेत्रांना सवलती देण्यात आल्याने रोजगार संधीत वाढ होईल. पर्यटनाला आदरातिथ्याचा दर्जा, कृषी पर्यटन धोरण, कॅराव्हेन, बीच शेक्स, लोणार सरोवराचा विकास, गडकिल्ल्यांचे संवर्धन, वनविकास यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प शासनाने हाती घेतले आहेत.

कोरोना काळात १ लाख १२ हजार कोटींची गुंतवणूक आणि ३ लाख रोजगार निर्मितीमुळे राज्यातील उद्योगाला मोठी चालना मिळाली आहे. पायाभूत सुविधांचे अनेक प्रकल्प, मेट्रो जाळे, रेल्वे जलमार्ग विकास यातूनही राज्य विकासाला गती मिळेल.

शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे, मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

महाराष्ट्रासारख्या प्रगत, पुरोगामी राज्याचा अर्थसंकल्प सादर करणे ही आव्हानात्मक जबाबदारी आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी निश्चित केलेली ध्येयधोरणे, सरकारमधील घटक पक्षांनी ठरवलेला किमान समान कार्यक्रम, राज्यातील जनतेच्या आशा-आकांक्षांची पूर्तता करण्याचा प्रयत्न या वर्षीच्या अर्थसंकल्पातून केला आहे. यंदाचा अर्थसंकल्प समाजातील प्रत्येक घटकाला न्याय, विकासाची संधी उपलब्ध करून देईल, राज्याच्या सर्वांगीण प्रगतीची प्रक्रिया अधिक गतिमान करेल, असा मला विश्वास आहे.

प्रगती अधिक गतिमान

अजित पवार
उपमुख्यमंत्री

अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया वर्षभर निरंतर सुरू असते. अर्थसंकल्प परिपूर्ण होण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सूचना महत्त्वाच्या ठरत असतात. राज्याचा उपमुख्यमंत्री तसेच वित्त व नियोजनमंत्री म्हणून राज्याचा दौरा करताना स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना आवर्जून भेटलो. त्यांच्याकडून स्थानिक प्रश्न, जनतेच्या मागण्या, गरजा समजून घेतल्या. या मागण्यांचे, सूचनांचे, गरजांचे संकलन माझ्या कार्यालयात वर्षभर सुरू असते. विविध क्षेत्रात तळमळीने कार्य करणाऱ्या व्यक्ती, स्वयंसेवी संस्थांकडूनही वेगवेगळे विषय समोर येतात. यापैकी अनेक विषय राज्याच्या विकासाला नवी दिशा, गती देणारे असतात. यंदाच्या अर्थसंकल्पात अशा अनेक विषयांचे प्रतिबिंब आपल्याला दिसेल.

भरीव तरतूद

या वर्षीचा अर्थसंकल्प 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर सादर झाला असला तरी, या संकटामुळे विकासकामांना खीळ बसणार नाही, याची काळजी घेतली आहे. कोरोना महामारीमुळे स्थूल राज्य उत्पन्नात ८ टक्के घट झाली. मात्र सर्व घटकांसाठी भक्कम निधीची तरतूद करण्यात आम्हाला यश आले. चांद्यापासून बांद्यापर्यंत समतोल विकास साधण्यासाठी प्रत्येक विभागाला समन्यायी निधिवाटप केले आहे. महसुली खर्चाऐवजी भांडवली खर्चावर भर देण्यात आला आहे. कृषी, सिंचन, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, महिला व बालविकासासारख्या विभागांसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत विकास महामंडळांसाठीही भक्कम निधीची तरतूद केली आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सुरू केलेली 'संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना' हे अर्थसंकल्पाचे एक वैशिष्ट्य आहे.



पायाभूत सुविधांवर भर

राज्यातील रस्ते, रेल्वे, मेट्रो, जलमार्गासारख्या परिवहन सेवांचा विकास, जलसंपदा प्रकल्पांना गती, ऊर्जा प्रकल्पांची निर्मिती, आरोग्य सुविधांचा विकास ही कामे अखंड सुरू राहतील, याची काळजी घेण्यात आली आहे. मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक बांधवांना त्यांचा न्याय्य हक्क देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पातून केला आहे. समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांच्या विकासाची प्रक्रिया अविरत सुरू राहील. महिला व बालकल्याणाच्या योजनांसाठी निधी कमी पडणार नाही, याची खबरदारीही घेण्यात आली आहे.

अर्थसंकल्प महिला शक्तीला समर्पित

अर्थसंकल्प आठ मार्चला, जागतिक महिला दिनी सादर करण्यात आला. हा अर्थसंकल्प माता-भगिनींना, महिला शक्तीला समर्पित आहे. कुटुंबातील महिलेच्या नावावर गृहखरेदीची नोंदणी झाल्यास मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरात सवलत देण्यात आली आहे. ग्रामीण मुलींना शाळेत जाण्यासाठी 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना' सुरू केली आहे. मोठ्या शहरातील 'तेजस्विनी' महिला बस सेवेसाठी अधिक बसगाड्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ३ टक्के नियतव्यय राखून ठेवला आहे. राज्य राखीव पोलीस दलाचा राज्यातील पहिला स्वतंत्र महिला गट स्थापन करण्यात येणार आहे. यातून महिला शक्ती अधिक सक्षम, समर्थ होईल, असा मला विश्वास आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय

वेळेत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाने तीन लाखांपर्यंत पीककर्ज, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण, शेतकऱ्यांना वीजबिलात सूट आदी शेतकरी हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय या अर्थसंकल्पात घेतले आहेत.

राज्याचा वित्त व नियोजन मंत्री या नात्याने मी अर्थसंकल्प सादर केला असला तरी तो तयार करण्यात मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनासह महाविकास आघाडी व विरोधी पक्षाच्या नेत्यांसह सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या सूचनांचेही मोठे योगदान आहे. सर्वसमावेशक अर्थसंकल्प तयार करण्यासाठी सहकार्य केलेले राज्यमंत्रिमंडळातील माझे सर्व सहकारी, राज्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, कर्मचारी बंधुभगिनींचे मी आभार मानतो. अर्थसंकल्पाच्या प्रभावी, यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्य सरकार पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेल, असा मला विश्वास आहे.

शब्दांकन : संजय देशमुख,
उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

राज्याच्या २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातून सर्व समाजघटकांना व विभागांना न्याय देण्यात आला आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देऊन महाराष्ट्राला समृद्ध करणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो. अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी या अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती व कल्याणकारी योजनांबरोबरच पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे.

समृद्ध करणारा अर्थसंकल्प

कोरोनाच्या अभूतपूर्व संकटामुळे राज्य सरकारचे उत्पन्नाचे स्रोत घटले आहेत. केंद्र सरकारकडून राज्याला जीएसटीच्या परताव्यासह इतर निधीच्या रूपाने मिळणारा निधीही मिळत नसताना राज्य शासनाने आपल्या अर्थसंकल्पातून कृषी, आरोग्य, शिक्षण आणि विकास प्रकल्पांसह राज्यातील सर्व समाजघटक व विभागांसाठी भरीव निधीची तरतूद केली आहे.

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीतही अर्थकारणाचे आव्हान पेलण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात केला असून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. सातारा, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, रायगड त्याचप्रमाणे अमरावती आणि परभणी येथे वैद्यकीय महाविद्यालये प्रस्तावित करण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात कोविड उपचार केंद्रही निर्माण करण्यात येणार आहेत. १५० रुग्णालयांमध्ये कर्करोग निदान सुविधा. सात नवीन वैद्यकीय महाविद्यालये ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयांमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे.

अन्नदात्याकडे विशेष लक्ष

अन्नदाता बळीराजाला ३ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी पीककर्ज, कृषी उत्पन्न बाजार समित्या बळकटीकरणाठी दोन हजार कोटी, कृषिपंप वीजजोडणीसाठी दीड हजार कोटी, शेतकऱ्यांना थकीत वीजबिलात सूट, शेतमालाच्या बाजारपेठ व मूल्यसाखळ्यांच्या निर्मितीसाठी २ हजार १०० कोटी, पक्का गोठा, शेळीपालन, कुक्कुटपालनाची शेड बांधण्यासाठी मदत दिली जाणार आहे. सिंचनासाठी १२ हजार ९५१ कोटी, मदत व पुनर्वसन विभागास ११ हजार ४५४ कोटी, रेल्वे, रस्ते आणि विमानतळाच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे. ग्रामीण रस्ते प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकूल योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीला चालना

कोरोनाच्या संकट काळातही शालेय शिक्षण विभागाला विविध योजनांसाठी गेल्या वर्षी २००० कोटींवरून २१४० कोटींची तरतूद करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीला महत्त्व दिले आहे. राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदेच्या जीर्ण, मोडकळीस आलेल्या इमारतींची, वर्गखोल्यांची पुनर्बांधणी व दुरुस्ती याकरिता तीन हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यासह सातारा सैनिकी शाळेचे आधुनिकीकरण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. या शाळेच्या आधुनिकीकरणासाठी ३०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला असून, २०२१-२२ साठी १०० कोटी नियत व्यय मंजूर करण्यात आले आहे.

उल्लेखनीय कामगिरी

राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजनेंतर्गत महिलेच्या नावावर घर खरेदी केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. महिलांच्या नावे घर खरेदीसाठी मुद्रांक शुल्कात सवलत देऊन महाराष्ट्राने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

रोजगार निर्मितीला चालना

अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी या अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती व कल्याणकारी योजनांबरोबरच पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला असून, यातून राज्याला गतवैभव प्राप्त होईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत स्थानिक कारागीर, मजूर व कामगारांना कौशल्य विकासाठी मदत देऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे. मुंबईतील विविध विकास प्रकल्प, राज्यातील तीर्थक्षेत्रे व पर्यटनाच्या विकासासाठी भरीव मदतीची तरतूदही करण्यात आलेली आहे.

सर्व घटकांना न्याय

महाज्योती, सारथी, बार्टी, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी भरीव निधीची तरतूद करून सर्वच समाजघटकांना न्याय दिला आहे.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे, विभागीय संपर्क अधिकारी

कोविड-१९ च्या संकटावर मात करत राज्याची अर्थव्यवस्था सांभाळत, वंचित-उपेक्षित, शेतकरी, महिलांना न्याय देतानाच राज्याच्या प्रगतीचा आलेख उंचावला जाईल, असा अर्थसंकल्प विधानसभेत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार व विधान परिषदेत वित्त राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी मांडला. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि सर्व विभागांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प कोविडच्या पार्श्वभूमीवरील सर्वोत्तम असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. आरोग्य, नागरी सुविधा आणि घरे महिलांच्या मालकीची व्हावीत, यांसारख्या विविध तरतुदींमुळे अर्थसंकल्प सर्वसमावेशक झाला आहे.

सर्वसमावेशक अर्थसंकल्प

आरोग्य सेवा

कोरोना महामारीच्या काळात सर्वच क्षेत्रांतील आरोग्य सेवांतील सुधारणांची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धन करून जनतेला उत्तम दर्जाची आरोग्यसुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प तयार केला असून, येत्या चार वर्षांत तो पूर्ण करण्यात येईल. यात जिल्हा रुग्णालय, मनोरुग्णालय, ट्रॉमा केअर सेंटर, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे बांधकाम तसेच तालुकास्तरावरील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन आणि बांधकाम यांचा समावेश आहे.

नागरी आरोग्य सेवा - राज्याच्या वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरी जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या प्रभावी, परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने आरोग्य आयुक्तालयाच्या आधिपत्याखाली संचालक, नागरी आरोग्य या कार्यालयाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे कालबद्ध पद्धतीने, अभियान स्वरूपात

अर्थसंकल्प २०२१-२२ विधिमंडळात मांडण्यापूर्वी विधान भवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार आणि वित्त राज्यमंत्री शंभूराज देसाई.

सर्व घटकांना न्याय

यंदाच्या अर्थसंकल्पात सर्व घटकांना न्याय देण्यात आला आहे. शेतकरी व वंचित बांधवांच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. वेळेत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाने तीन लाखांपर्यंत पीककर्ज, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण, शेतकऱ्यांना वीजबिलात सवलत, जालना-नांदेड द्रुतगती जोड मार्ग, सागरी महामार्ग, पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प, विविध महामंडळे, आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, कौशल्य विद्यापीठ, कोयनानगर (ता. पाटण, जि. सातारा) येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना, सिंधुरत्न समृद्धी योजना आदी महत्त्वपूर्ण योजना व प्रकल्पांची सुरुवात करून त्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे.

- शंभूराज देसाई, वित्त व नियोजन, राज्यमंत्री

महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये आरोग्य सेवाविषयक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येत्या ५ वर्षांत त्यासाठी शासनाकडून ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. त्यापैकी ८०० कोटी रुपये या वर्षी, २०२१-२२ साठी उपलब्ध करून देण्यात येईल.

साथरोग अद्ययावत संदर्भ सेवा रूग्णालये - राज्यामध्ये संसर्गजन्य आजारांच्या उपचारांसाठी अद्ययावत रुग्णालये असणे आवश्यक आहे, हे कोरोना साथीमुळे स्पष्ट झाले आहे. औंध येथील जिल्हा रुग्णालय परिसरात राज्याचे अद्ययावत संसर्गजन्य आजार संदर्भ रुग्णालय स्थापन करण्यात येईल. टप्प्याटप्प्याने विभागीय व जिल्हा पातळीवरही या रुग्णालयाची उपकेंद्रे स्थापन करण्याची योजना आहे.

कार्डियाक कॅथलॅब - हृदयविकाराच्या रुग्णांना प्रकृतीत बिघाड जाणवू लागल्यानंतर २४ तासाच्या आत अँजिओग्राफी करणे आवश्यक असते. त्यासाठी राज्यातील ८ मध्यवर्ती ठिकाणी या वर्षी कार्डियाक कॅथलॅब स्थापन करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागामध्ये कर्करोग निदानाची सोय - विविध प्रकारच्या कर्करोगाच्या निदानासाठी तालुकास्तरावर राज्यात १५० रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा - ज्या शासकीय रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजनांची कमतरता आहे, त्या रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक उपकरणे बसवण्यात येतील.

अभिमत विद्यापीठाचा दर्जा - ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यात येणार आहे.

परिचर्या, भौतिकोपचार व व्यवसायोपचार - परिचर्यांची कमतरता आणि संसर्गजन्य आजारांचा वाढता प्रसार विचारात घेऊन रुग्णसेवांशी संबंधित इतर अभ्यासक्रमांमध्येही आमूलाग्र बदल करून रुग्णसेवेशी निगडित शाखांना प्रोत्साहन व प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयांमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. शिवाय १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयांची टप्प्याटप्प्याने स्थापना करण्यात येणार आहे.

कोविड पोस्ट केअर - कोरोना संसर्गातून बऱ्या झालेल्या रुग्णांमध्ये फुफ्फुस, यकृत व मूत्रपिंडांच्या तसेच मानसिक तणावाच्या तक्रारी उद्‌भवत असल्याने प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये व शहरी भागात वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, पोस्ट कोविड काऊन्सलिंग व ट्रीटमेंट सेंटर सुरू करण्यात येणार आहेत.

आरोग्य संस्थांची बांधकामे - लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विज्ञान संस्थेच्या नवीन बाह्यरुग्ण इमारतीच्या बांधकामासाठी ७३ कोटी २९ लाख रुपये, तर पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयातील वर्ग - ४ कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या बांधकामासाठी २८ कोटी २२ लाख रुपये अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सांगली येथील जिल्हा रुग्णालय, तसेच महिला रुग्णालयाची ९२ कोटी १२ लाख रुपये अंदाजित किमतीची दोन कामे तसेच आटपाडी येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून त्याचे उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्यासाठी २० कोटी ६२ लाख रुपये अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

प्रशिक्षण केंद्र - अन्न व औषध प्रशासनांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी तसेच औषध व्यावसायिकांना बदलत्या कायद्यांची माहिती देण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मोशी येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड, सातारा, अमरावती आणि परभणी येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची क्षमतावाढ आणि नव्या महाविद्यालयांमुळे पदवी स्तरावरील १ हजार ९९०, तर पदव्युत्तर स्तरावर १ हजार, आणि विशेषज्ञांच्या २०० जागा वाढणार आहेत.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक आरोग्य विभागास २ हजार ९६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, अनिवार्य खर्चासाठी ५ हजार ९९४ कोटी २८ लाख ८९ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. वैद्यकीय शिक्षण विभागास कार्यक्रम खर्चाकरिता १ हजार ५१७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, अनिवार्य खर्चासाठी ४ हजार २४ कोटी ६३ लाख ६३ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

कृषिपंप वीजजोडणी धोरण

पैसे भरूनही ज्यांना अद्यापपर्यंत कृषिपंप वीजजोडणी मिळाली नाही, अशा शेतकऱ्यांना पारंपरिक अथवा सौर कृषिपंपाच्या माध्यमातून वीजजोडणी देण्याकरिता कृषिपंप वीज जोडणी धोरण राबवण्यात येणार आहे. ही योजना राबवण्याकरिता महावितरण कंपनीला दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपये निधी भागभांडवलाच्या स्वरूपात देण्यात येईल.

कृषी

राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य कृषी क्षेत्राच्या सुदृढतेवर अवलंबून आहे. २०२०-२१ मध्ये उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये घट झाली असतानाही कृषी व संलग्न कार्यक्षेत्रात ११.७ टक्के एवढी भरीव वाढ झाली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाने पीककर्ज - एकाही शेतकऱ्याने कर्जाच्या ओझ्याखाली आत्महत्या करू नये, व्याजाच्या या जाचातून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी व शेतकरी थकबाकीदार होऊ नये, यासाठी ३ लाख रुपये मर्यादेपर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या व त्याची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२१ पासून शून्य टक्के व्याजाने कर्जपुरवठा करण्यात येणार आहे. पीककर्जावरील व्याजाची रक्कम शेतकऱ्यांच्यावतीने शासनामार्फत चुकती करण्यात येईल.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे बळकटीकरण - बहुतांशी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांकरिता आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव आहे. या सुविधा पुरवणे अत्यंत गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची योजना घोषित करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना वीजबिलात सवलत - थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट देण्यात आली असून शेतकऱ्यांनी उर्वरित थकबाकीपैकी ५० टक्के रकमेचा भरणा मार्च २०२२ पर्यंत केल्यास त्यांना राहिलेल्या ५० टक्के रकमेची अतिरिक्त माफी देण्यात येईल. महाविकास आघाडी सरकारच्यावतीने ४४ लाख ३७ हजार शेतकऱ्यांना मूळ थकबाकी रकमेच्या जवळपास ६६ टक्के, म्हणजे ३० हजार ४११ कोटी रुपये इतकी रक्कम माफ केली जाणार आहे.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प - 'विकेल ते पिकेल' या धोरणांतर्गत शेतमालाच्या बाजारपेठ व मूल्यसाखळ्यांच्या निर्मितीसाठी एकूण २ हजार १०० कोटी रुपये अंदाजित किमतीचा मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबवण्यात येत आहे, त्यातून शेतमालाला योग्य भाव मिळावा, यासाठी १ हजार ३४५ मूल्यसाखळी प्रकल्प राबवण्यात येत आहेत.

महाराष्ट्र ग्रो बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) - फळ व भाजीपाला उत्पादक, लहान व सीमान्त शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र ग्रो बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) प्रभावीपणे राबवण्याचा शासनाचा संकल्प आहे. या प्रकल्पाची किंमत १ हजार कोटी रुपये असून, प्रकल्प ६ वर्ष राबवला जाणार आहे. शेतमालावरील प्रक्रियेत सुधारणा करणे व नाशवंत मालाचे नुकसान कमी व्हावे, यासाठी उपाययोजना करण्याचा समावेश या प्रकल्पामध्ये आहे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

सायट्रस इस्टेट स्थापन करणे - विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांसाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड व मोर्शी तालुक्यामध्ये अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे. मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढवण्याकरिता औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे ६२ एकर जागेवर सायट्रस इस्टेट स्थापन करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका - शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर दर्जेदार भाजीपाला रोपांचा पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान एक, याप्रमाणे सुमारे ५०० नवीन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका स्थापन करण्यात येणार आहेत.

महाडिबीटी पोर्टल - शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्याला सहजगत्या एकाच अर्जाद्वारे उपलब्ध व्हावा, यासाठी डिसेंबर २०२० मध्ये महाडिबीटी पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. या पोर्टलवर आतापर्यंत ११ लाख ३३ हजार शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून विविध कृषी योजनांच्या लाभाकरिता २५ लाख २२ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

मुख्यमंत्री कृषी संशोधन निधी - राज्यातील शेती व्यवसायाची उत्पादकता वाढवण्याच्या अनुषंगाने कृषी संशोधनावर भर देण्यासाठी राज्यातील चार कृषी विद्यापीठांना कृषी उन्नतीला उपयोगी ठरेल, अशा संशोधनासाठी दरवर्षी २०० कोटी रुपयांप्रमाणे येत्या तीन वर्षात ६०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात

येणार आहे.

शरद पवार ग्राम समृद्धी योजना - ग्रामीण भागात सामूहिक व वैयक्तिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने शरद पवार ग्राम समृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत लाभार्थींना गाय किंवा म्हशींचा पक्का गोठा बांधण्यासाठी, शेळीपालन किंवा कुक्कुटपालनाची शेड बांधण्यासाठी तसेच कंपोस्टिंगकरता अनुदान देण्यात येईल.

फिशरिज ॲण्ड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड (मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा निधी योजना) - मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील विविध पायाभूत सुविधांच्या कामासाठी नाबार्डच्या साहाय्याने फिशरिज ॲण्ड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंडमधून अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

उच्चश्रेणी जैव सुरक्षा प्रयोगशाळा उभारणे - राज्याने मागील वर्षी बर्ड फ्ल्युसारख्या घातक रोगाचा सामना केला. या वर्षीही काही प्रमाणात त्याचा सामना करावा लागत आहे. या रोगनिदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथे उच्चश्रेणीची जैव सुरक्षा प्रयोगशाळा उभारण्यात येईल.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागास ३ हजार २७४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

रेशीम शेती उद्योग - रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र व इतर आनुषंगिक सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास १ हजार २८४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प

जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने धरण सुरक्षिततेसाठी धरण पुनर्स्थापना व सुधारणा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत १२ धरणांच्या बळकटीकरण आणि सुधारणांच्या, ६२४ कोटी रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

लाकडी-निंबोडी उपसा सिंचन योजना ता. इंदापूर, जि. पुणे- इंदापूर व बारामती तालुक्यातील सुमारे ५ हजार हेक्टर क्षेत्रास बंद नलिकांद्वारे सिंचनाचा लाभ देण्यासाठी लाकडी-निंबोडी उपसा सिंचन योजना राबवण्यात येत आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता जलसंपदा विभागास १२ हजार ९५१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

जलसंपदा

जलसंपदा प्रकल्प - राज्यात जलसंपदा विभागाची २७८ प्रकल्पांची कामे सुरू असून त्यामधून २६ लाख ८८ हजार ५७६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणे अपेक्षित आहे. त्यातून ८ हजार ४७० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण होणार आहे.

प्रधानमंत्री कृषिसिंचन योजनेंतर्गत २६ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली असून, या प्रकल्पांची सुधारित उर्वरित किंमत २१ हजार ६९८ कोटी २१ लाख इतकी आहे. २०२१-२२ या वर्षात २६ पैकी १३ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत ९१ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली असून, या प्रकल्पांची सुधारित किंमत १५ हजार ३२५ कोटी ६५ लाख इतकी आहे. यापैकी १९ प्रकल्प पूर्ण झाले असून, त्यातून १ लाख २ हजार ७७९ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जलसंपदा विभागाचे पूर्णत्वाच्या टप्प्यावर असलेले इतर सिंचन प्रकल्पही पूर्ण करण्यात येतील.

गोसीखुर्द प्रकल्प - गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी एक हजार कोटी रुपये एवढी भरीव तरतूद प्रस्तावित केली असून हा प्रकल्प डिसेंबर २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना - राज्यातील ६०० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंतच्या नादुरुस्त असलेल्या जलस्रोतांची विशेष दुरूस्ती मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत करण्यात येत आहे. यात ७ हजार ९१६ कामांची विशेष दुरुस्ती प्रस्तावित असून त्यावर १ हजार ३४०कोटी ७५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हा कार्यक्रम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मृद् व जलसंधारण विभागास ३ हजार ७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मदत व पुनर्वसन

शेतकऱ्यांना नुकसानभरपाई - जून २०२० मध्ये कोकण किनारपट्टीवरील निसर्ग चक्रीवादळ, पूर्व विदर्भात निर्माण झालेली पूर परिस्थिती, जून ते ऑक्टोबर या काळात राज्यात झालेली अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना ५ हजार ६२४ कोटी एवढी मदत वितरित करण्यात आली.

राष्ट्रीय आपत्ती निवारण दल - या आपत्तीच्या वेळी निर्माण झालेली निकड लक्षात घेऊन नैसर्गिक आपत्तीत तत्पर मदत मिळावी म्हणून राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाची एक तुकडी महाड (जि.रायगड) येथे कायमस्वरूपी तैनात करण्याबाबत आपल्या शासनाने केंद्रशासनास विनंती केली आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मदत व पुनर्वसन विभागास १३९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, नैसर्गिक आपत्ती मदत व इतर अनिवार्य खर्चासाठी ११

हजार ३१५ कोटी ७८ लाख ६२ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

पायाभूत सुविधा

२०२०-२१ मध्ये राज्याच्या स्थूल उत्पन्नात ८ टक्के घट झाली आहे.तरीही अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी या अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती व कल्याणकारी योजनाबरोबरच पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात आला.

रस्ते विकास

जालना-नांदेड द्रुतगती जोड महामार्ग - हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम ४४ टक्के पूर्ण झाले असून ७०१ किलोमीटर लांबीपैकी ५०० किलोमीटर लांबीचा नागपूर ते शिर्डी हा मार्ग महाराष्ट्र दिनी, १ मे २०२१ रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. या महामार्गाचा, मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी व जालना या जिल्ह्यांच्या विकासासाठी लाभ व्हावा, या उद्देशाने नांदेड ते जालना या २०० किलोमीटर लांबीचे ७ हजार कोटी रुपये अंदाजित रकमेचे द्रुतगती जोड महामार्गाचे नवीन काम हाती घेण्यात येत आहे.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ - मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर साडेदहा किलोमीटर लांबीच्या दोन भुयारी मार्गांच्या, तसेच दोन किलोमीटर लांबीच्या दोन पुलांचा समावेश असलेल्या ६ हजार ६९५ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पांचे बांधकाम सुरू असून ते डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सागरी महामार्ग - मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय ठरणारा आणि कोकणच्या विकासाचा मार्ग म्हणून ओळखला जाणारा रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी अशा ५४० किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गाच्या कामासाठी ९ हजार ५७३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

पुणे चक्राकार मार्ग - परराज्यातून तसेच राज्यातील कोकण, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात प्रवासी व मालवाहतूक पुणे शहरातून होत असते. शहरातील वाहतुकीवर त्याचा प्रचंड ताण येतो. तो टाळून इंधन तसेच प्रवासी वेळेत बचत होण्याच्या दृष्टीने पुण्याबाहेरून चक्राकार मार्गाची (रिंग रोड) उभारणी ही काळाची गरज आहे. त्यासाठी सुमारे १७० किलोमीटर लांबीच्या २६ हजार कोटी रुपये अंदाजित किंमतीच्या आठ पदरी, चक्राकार मार्गाचे काम हाती घेण्यात येईल. या मार्गामुळे पुणे शहरातील वाहतूक कोंडीच्या गंभीर समस्येवर मात करता येईल. या कामाच्या भूसंपादनाचे काम याच वर्षी हाती घेण्यात येईल.

विलासराव देशमुख पूर्वमुक्त मार्ग - दक्षिण मुंबईला पूर्व उपनगरांशी जोडणाऱ्या पूर्वमुक्त मार्गाचे नामकरण विलासराव देशमुख पूर्वमुक्त मार्ग करण्यात आले आहे.

वित्तीय विकास महामंडळ - राज्यात आतापर्यंत राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग मिळून एकूण ३ लाख ३ हजार ८४२ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे रस्ते विकसित करण्यात आले आहेत, त्यांची कालबद्ध सुधारणा व नियमित देखभाल दुरुस्तीसाठी निधी उभारण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वित्तीय विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.

आशियाई विकास बँक साहाय्यित रस्ते विकास - आशियाई विकास बँकेच्या अर्थ साहाय्यातून पहिल्या टप्प्यात ५ हजार ६८९ कोटी रुपये अंदाजित किमतीची कामे हाती घेतली आहेत. २०२१-२२ मध्ये बाह्य साहाय्यातून आणखी ५ हजार कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येतील.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास रस्ते विकासासाठी १२ हजार ९५० कोटी रुपये व इमारतींसाठी ९४६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

नागरी सडक विकास योजना

राज्याचे वाढते नागरीकरण लक्षात घेता सर्व शहरातील मुख्य बाजारपेठांच्या रस्त्यांची दर्जोन्नती, रुंदीकरण व सुशोभीकरणासाठी नागरी सडक विकास योजना राबवण्याचे २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात घोषित करण्यात आले होते. या वर्षी या कार्यक्रमाला अधिक गती देण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील रस्ते विकासाची ४० हजार किलोमीटर लांबीची कामे हाती घेऊन ती २०२० ते २०२४ या कालावधीत पूर्ण करण्याचे मी गेल्या अर्थसंकल्पात जाहीर केले होते. पण गेल्या वर्षी टाळेबंदीमुळे कामे हाती घेता आली नाहीत. त्यातील १० हजार किलोमीटर लांबीची कामे या वर्षी २०२१-२२ मध्ये हाती घेण्यात येतील.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ग्रामविकास विभागास ७ हजार ३५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

रेल्वे विकास

पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प - पुणे - नाशिक या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गास मान्यता दिली असून या रेल्वेमार्गाची प्रस्तावित लांबी २३५ किलोमीटर असून मार्गावर पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात एकूण २४ स्थानके प्रस्तावित आहेत. या रेल्वेची गती २०० किलोमीटर प्रतितास एवढी असणार आहे. प्रकल्पाचा अपेक्षित खर्च १६ हजार ३९ कोटी रुपये इतका राहील.

राज्यातील मेट्रो प्रकल्प - नागपूर शहर, वर्धा, रामटेक, भंडारा रोड व नरखेड ही शहरे नागपूर मेट्रो मार्गाला जोडण्यासाठी

वातानुकुलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन हा २६९ किलोमीटर लांबीचा प्रकल्प, नाशिक शहरामध्ये ३३ किलोमीटर लांबीचा २ हजार १०० कोटी रुपये किमतीचा नाशिक मेट्रो निओ प्रकल्प, ठाणे शहरांतर्गत मेट्रोलाईट प्रणालीवर आधारित ७ हजार१६५ कोटी खर्चाचा वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प तसेच पिंपरी चिंचवड ते निगडी कॉरिडॉर क्रमांक १ हा ९४६ कोटी ७३ लाख रुपये किमतीचा प्रकल्प, हे मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. याशिवाय राज्यात अहमदनगर-बीड-परळी, वर्धा-यवतमाळ-नांदेड व नागपूर येथील इतवारी ते नागभीड या रेल्वे मार्गांची कामे वेगाने सुरू आहेत.

राज्य परिवहन महामंडळास अर्थसाहाय्य - राज्य परिवहन महामंडळाच्या डिझेलवर चालणाऱ्या जुन्या बसेसचे पर्यावरणपूरक सीएनजी व विद्युत बसेसमध्ये रूपांतर करण्याचे शासनाने ठरवले आहे. शिवाय बसस्थानकांचे आधुनिकीकरणाचे कामही हाती घेण्यात येत आहे. त्यासाठी १ हजार ४०० कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता परिवहन विभागास एकूण २ हजार ५७० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

विमान वाहतूक क्षेत्र

शिर्डी विमानतळावरील नवीन हवाई वाहतूक नियंत्रण मनोरा, रात्रीच्या उड्डाणाची सुविधा तसेच प्रवासी सेवांची कामे सुरू आहेत.

अमरावती जिल्ह्यातील बेलोरा येथील विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार, नवीन टर्मिनल बिल्डिंग तसेच रात्रीच्या विमानवाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्याची कामे प्रगतिपथावर आहेत.

सोलापूर शहराजवळ बोरामणी येथे ग्रिनफिल्ड विमानतळ विकसित करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. या विमानतळासाठी

भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळावर विमानसेवा सुरू करण्याची बाब अखेरच्या टप्प्यात आहे. पुणे येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यास शासनाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. या कामाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. शिवणी, अकोला येथे मोठ्या विमानांच्या उड्डाणासाठी धावपट्टी वाढवणे व इतर कामांसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. उजळाईवाडी, कोल्हापूर येथील विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणाचे तसेच रात्रीच्या उड्डाणासाठीची कामेही प्रगतिपथावर आहेत.

ग्रामविकास

घरकूल योजना - २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकूल योजना व शबरी घरकूल योजनेंतर्गत प्रलंबित दायित्वाकरिता एकूण २ हजार ९२४ कोटी ८८ लाख रुपये निधी वितरित केला आहे.

२०२१-२२ या आर्थिक वर्षात घरकूल योजनांसाठी ६ हजार ८२९ कोटी ५२ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मनुष्यबळ विकास

राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (स्टार्स) - राज्यातील इयत्ता १२ वी पर्यंतच्या दर्जेदार शिक्षणासाठी, शिक्षण क्षेत्रात मूलभूत सुधारणांकरिता शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने 'स्टार्स' योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची अंदाजित किंमत ९७६ कोटी ३९ लाख रुपये आहे.

राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान - शासकीय व जिल्हा परिषद शाळांच्या जीर्णावस्थेतील इमारतींची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्याकरिता ३ हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शाळांना अर्थसाहाय्य - देशातील पहिली सैनिकी शाळा १९६१ मध्ये सातारा येथे स्थापन करण्यात आली. या शाळेच्या मूलभूत सुविधांच्या विकासासाठी येत्या तीन वर्षात ३०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित असून २०२१-२२ या वर्षात त्यापैकी १०० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करणे - मागील अर्थसंकल्पीय भाषणात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल, असे घोषित करण्यात आले होते. त्यानुसार पुणे येथे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात तिथे क्रीडा विज्ञान व तंत्रज्ञान, क्रीडा शिक्षण व प्रशिक्षण अशा चार अभ्यासक्रमांसाठी एकूण २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभागास २ हजार ४६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित

आहे.

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क - राज्यातील प्रत्येक महसुली मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये, अशा प्रकारे एकूण ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

नेहरू तारांगण - नेहरू सेंटर, मुंबई या संस्थेस अत्याधुनिक यंत्रांची खरेदी, आधुनिकीकरण व नूतनीकरणासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्थांना अनुदाने - अमरावती येथील विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त या संस्थेतील महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी १० कोटी रुपये तसेच मुंबईतील मुलुंड येथील कुणबी समाजोन्नती संघाच्या विद्यार्थी वसतिगृहासाठी ५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागास १ हजार ३९१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

कौशल्य विद्यापीठाची स्थापना - युवकांना यापुढील काळात रोजगारासाठी नवनवीन कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक ठरणार आहे. त्या दृष्टीने राज्यातील युवकांसाठी खास कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या विद्यापीठामुळे राज्यातील युवकांचे लवकरच कौशल्य प्रशिक्षण सुरू होईल. त्यातून युवक-युवती रोजगारक्षम बनतील.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना - या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा ५ हजार रुपये यापैकी जी कमी असेल, ती रक्कम शासनाकडून देण्यात येईल. ही योजना येत्या महाराष्ट्र दिनी,१ मे २०२१ रोजी सुरू करण्यात येईल. २०२१-२२ मध्ये दोन लाख युवा उमेदवारांना या योजनेत सहभागी करून घेतले जाईल. या योजनेच्या माध्यमातून युवक-युवतींना रोजगाराच्या निश्चित संधी उपलब्ध होतील, असा विश्वास मला आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता

पाणीपुरवठा योजना - जलजीवन मिशन योजनेंतर्गत २०२४ पर्यंत एकूण १ कोटी ४२ लाख ३६ हजार १३५ घरगुती नळजोडण्या देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी जानेवारी २०२१ पर्यंत ८४ लाख ७७ हजार ८४६ नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर ७४३ पैकी ४३८ नवीन नळयोजना कार्यान्वित झाल्या आहेत.

शिवराज्य सुंदर ग्राम अभियान - ग्रामीण भागातील घनकचरा, सांडपाणी, शौचालय व स्वच्छताविषयक कामे, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, गावातील वृद्ध नागरिक, महिला व बालकांसाठी आरोग्य सेवेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकाच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये शिवराज्य सुंदर ग्राम अभियान राबवण्यात येणार असून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुकास्तरावर भरघोस पुरस्कार देण्यात येतील.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान - स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील एकूण ३९६ शहरांच्या ३ हजार १३७ कोटी रुपये किमतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून त्यांची अंमलबजावणीही सुरू आहे. २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास २ हजार ५३३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मुंबईच्या विकासाचे प्रकल्प

मुंबई शहरातील वाहतूक सुविधा जागतिक दर्जाच्या असाव्यात हे शासनाचे ध्येय असून त्यासाठी सप्टेंबर २०२२ मध्ये शिवडी-न्हावा शेवा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. वांद्रे-वरळी सागरी मार्ग शिवडी-न्हावा शेवा मार्गाला जोडण्यासाठी वरळी ते शिवडी या चार पदरी उड्डाणपुलाचे काम सुरू झाले असून ते ३ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विरार, भिवंडी, कल्याण, पनवेल, उरण, पेण व अलिबाग या शहरांच्या विकासाकरिता तसेच जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, नवी मुंबई विमानतळ आणि शिवडी-न्हावा शेवा मार्गाला जोडणाऱ्या, ४० हजार कोटी रुपये किमतीच्या, १२६ कि.मी. लांबीच्या, विरार ते अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉरच्या भूसंपादनाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत

मुंबईतील पर्यटन आकर्षणे

हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी ४०० कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील सिटी पार्क ते महाराष्ट्र निसर्ग उद्यानादरम्यान, त्यांना जोडणारा पादचारी पूल उभारण्यात येणार असून या प्रकल्पाकरिता ९८ कोटी ८१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील सायकल मार्गावरील बॅटरीवर चालणाऱ्या सायकलींना अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे येत्या वर्षभरात मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गांवर मुंबई महानगर क्षेत्र विकास महामंडळामार्फत सायकलींकरिता स्वतंत्र मार्गिका तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

सुरू आहे.

ठाणे खाडीला समांतर सुमारे १५ किलोमीटर लांबीचा व ४० मीटर रुंदीचा ठाणे कोस्टल रोड उभारण्यात येत असून त्यासाठी सुमारे १ हजार २५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

मुंब्रा बायपास जंक्शन, शिळ कल्याण फाटा, शिळफाटा व कल्याणफाटा जंक्शनवर उड्डाणपुलांची निर्मिती, महामार्गाचे रुंदीकरण तसेच कल्याणफाटा अंडरपासचे काम प्रगतिपथावर आहे.

मुंबई, ठाणे व नवी मुंबई या शहरांभोवती उपलब्ध असलेल्या जलमार्गाचा वाहतुकीसाठी वापर करण्याचे शासनाने ठरवले असून त्यासाठी पहिल्या टप्प्यामध्ये वसई ते कल्याण या जलमार्गावर वाहतूक सुरू करण्यात येईल. त्यासाठी कोलशेत, काल्हेर, डोंबिवली आणि मीरा भाईंदर या चार ठिकाणी जेट्टी उभारण्यात येत आहेत.

मुंबई अंतर्गत प्रवासासाठी दळणवळण सुविधा - वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूचे काम सुरू झाले आहे, हे आपल्याला माहीत असेल. या प्रकल्पाची लांबी १७.१७ किलोमीटर असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ११ हजार ३३३ कोटी रुपये आहे. वांद्रे-वर्सोवा-विरार या सागरी सेतू प्रकल्पाची अंदाजित किंमत ४२ हजार कोटी रुपये असून कामाचा पूर्व सुसाध्यता अहवाल तयार करण्यात आला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

मुंबईतील १४ मेट्रो लाईन्सचे ३३७ किलोमीटर लांबीचे काम प्रगतिपथावर असून त्याकरिता १ लाख ४० हजार ८१४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सर्व १४ मेट्रो लाइन्सची कामे पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर आहेत. मेट्रोमार्ग २ (अ), मेट्रोमार्ग ७ या मार्गांवरील कामे २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

गोरेगाव - मुलुंड लिंकरोड प्रकल्पाची अंदाजित किंमत ६ हजार ६०० कोटी रुपये आहे.

मुंबई किनारी मार्ग (कोस्टल रोड) प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू असून हा मार्ग २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या या प्रकल्पाच्या दक्षिण मुंबईतील बोगद्याचे काम सुरू आहे. मुंबई शहरातील रेल्वे रुळावरील ७ उड्डाणपुलांची कामेही हाती घेण्यात येत आहेत.

मुंबई येथील पायाभूत विकास प्रकल्प

बृन्हमुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून वरळी, वांद्रे, धारावी, घाटकोपर, भांडुप, वर्सोवा व मालाड येथे सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा निर्णय झाला असून त्याकरिता १९ हजार ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. समुद्रातील खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प मालाड उपनगरातील मनोरी येथे उभारण्याबाबत प्राथमिक सर्वेक्षण झाले असून सविस्तर प्रकल्प अहवाल डिसेंबर २०२१ पूर्वी अपेक्षित आहे.

मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प मार्च २०२१ पासून सुरू होणार असून त्याकरिता ४५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मुंबई परिसरातील दहिसर, पोईसर व ओशिवरा नद्या पुनरुज्जीवित करण्यासाठी १ हजार ५५० कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येत आहेत.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नगर विकास विभागास ८ हजार ४२० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम - राज्यातील युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमातून पुढील पाच वर्षात एक लाख उद्योग घटक तयार होतील, आणि त्यात प्रतिवर्षी सुमारे १ हजार ५०० कोटी रुपये गुंतवणूक होईल, असा अंदाज आहे. त्यातून ८ ते १० लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होईल. या कार्यक्रमात किमान ३० टक्के महिला तर २० टक्के अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थी असतील. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेचे उद्दिष्ट वाढवून यावर्षी २५ हजार उद्योग घटकांना मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

गुंतवणूक सामंजस्य करार - कोविड टाळेबंदी काळात विविध उद्योग घटकांसमवेत ५४ सामंजस्य करार झाले असून त्याद्वारे १ लाख १२ हजार ९३९ कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यातून सुमारे ३ लाख रोजगार उपलब्ध होतील, असा अंदाज आहे. थेट परकीय गुंतवणूक आणि ५० कोटी रुपये व त्यापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या औद्योगिक प्रस्तावांना थेट महापरवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उद्योगांना प्रोत्साहन

रायगड जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या बल्क ड्रग पार्क आणि ऑरिक सिटी, औरंगाबाद येथे प्रस्तावित असलेल्या वैद्यकीय उपकरण पार्क प्रकल्पांना विविध विशेष प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार असून या दोन्ही पार्कमध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. यातून मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होईल हे निश्चित आहे.

कुटीरोद्योग - खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत मध उत्पादन व गांधी निलय स्मृती केंद्र स्थापन करण्यासाठी ७० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.

एक जिल्हा एक उत्पादन - एक जिल्हा एक उत्पादन या उपक्रमाच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांतील प्रसिद्ध हस्तकला, हातमाग, अन्नप्रक्रिया आदी क्षेत्रातील स्थानिक कारागीर, मजूर व कामगारांना कौशल्य वर्धनासाठी साहाय्य करून त्यांच्या उत्पादनांसाठी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल.

सुधारित इलेक्ट्रिक व्हेईकल धोरण

ग्रीन हाऊस गॅसेसचा परिणाम कमी करण्यासाठी तसेच शहरातील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शासनाने २०१८ मध्ये ई-व्हेईकलचे धोरण जाहीर केले होते. त्यात आता कालानुरूप सुधारणा करण्यात येत आहे. राज्यामध्ये नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-नाशिक महामार्गावर मेगा इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग सेंटर स्थापन करण्यात येतील. २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ऊर्जा विभागास ९ हजार ४५३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागास ३२१ कोटी रुपये नियतव्यय तसेच उद्योगांना प्रोत्साहन अनुदानासाठी ३ हजार ४३५ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प - २०२५ पर्यंत राज्यात २५ हजार मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ९ हजार ३०५ मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून २ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत.

महिला व बालविकास

राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना - ज्या महिलेमुळे घराला घरपण येते, त्या घरावर तिचे नाव असावे, ही अपेक्षा अवाजवी नाही. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचाच तो भाग आहे. राज्यातील तमाम महिलांच्या अपेक्षेला न्याय देणारी राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना त्यासाठीच घोषित करण्यात येत आहे. कोणतेही कुटुंब यापुढे राज्यात घर विकत घेईल, तेव्हा त्याची नोंदणी गृहलक्ष्मीच्या नावावर व्हावी व ती खऱ्या अर्थाने गृहस्वामिनी बनावी, यासाठी प्रोत्साहन म्हणून १ एप्रिल २०२१ पासून गृहखरेदीची नोंदणी त्या कुटुंबातील महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरामध्ये सवलत देण्यात येईल.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी प्रवास सवलत योजना - राज्यातील सर्व ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थिनींना आपल्या गावापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसने मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देणारी राज्यव्यापी योजना जाहीर केली. ही योजना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सुरू करण्यात येईल. या योजनेसाठी शासनाकडून राज्य परिवहन महामंडळास पर्यावरणपूरक दीड हजार सीएनजी व हायब्रीड बस प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील.

तेजस्विनी - मोठ्या शहरातील महिलांच्या सुलभ व सुरक्षित प्रवासासाठी तेजस्विनी योजनेंतर्गत आणखी विशेष महिला बस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

नवतेजस्विनी (तेजस्विनी टप्पा २) - आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी साहाय्यित नवतेजस्विनी - महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास हा एकूण ५२२ कोटी ९८ लाख रुपये खर्चाचा प्रकल्प असून हा प्रकल्प सहा वर्षांच्या कालावधीकरिता राबवण्यात येणार आहे. त्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता बचतगटातील दहा लाख महिलांना उपजीविकेसाठी साधने तर उपलब्ध होतीलच, शिवाय त्यांच्या व्यवसायामध्ये मूल्यवृद्धीदेखील होईल.

महिला व बाल सशक्तीकरण योजना - महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ३ टक्के नियतव्यय राखून ठेवण्याचा निर्णयही घेतला आहे. त्यातून प्रत्येक वर्षी किमान ३०० कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध होईल.

महिला राज्य राखीव पोलीस गट - महिला दिनाच्या निमित्ताने राज्य राखीव पोलीस दलाचा राज्यातील पहिला स्वतंत्र महिला गट स्थापन करण्याची घोषणाही करण्यात आली.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महिला व बालविकास विभागास २ हजार २४७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. केंद्राकडून प्राप्त होणारा १ हजार ३९८ कोटी ६६ लाख रुपये नियतव्यय विचारात घेता या विभागासाठी एकूण तरतूद ३ हजार ६३७ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

कामगार

संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना - असंघटित क्षेत्रातल्या महिला मदतीपासून वंचित राहू नयेत, यासाठी त्यांची

नवीन न्यायालयाची स्थापना

राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराचे खटले (पोक्सो) त्वरेने निकाली निघावेत, यासाठी १३८ विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्यासाठी १०३ कोटी ५० लाख रुपये खर्च होणार आहे. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळास मान्यता देण्यात आली आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता विधी व न्याय विभागास ४८२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

नोंदणी व त्यांना आधार ठरेल, अशी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना शासनाने जाहीर केली आहे. या महिलांच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी समर्पित कल्याण निधी निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी बीजभांडवल म्हणून २५० कोटी रुपये जाहीर केले आहेत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत गहू, तांदूळ, तूर, मका इ. धान्याची पुरेशी साठवणूक क्षमता निर्माण करण्यासाठी नाबार्डच्या साहाय्याने राज्यात २८० नवीन गोदामे बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी आतापर्यंत ३३४ कोटी रुपये उपलब्ध करून दिले असून २०२१-२२ करिता ११२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास ३२१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

गृह

न्याय साहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा - राज्यातील सर्व ८ न्याय सहाय्यक प्रयोगशांळामध्ये स्वतंत्र पोक्सो डीएनए विश्लेषण विभाग, संगणक गुण्य विभाग, ध्वनी व ध्वनिफीत विश्लेषण विभाग आणि संगणकीय न्याय साहाय्यक उत्कृष्टता केंद्र सुरू करण्यात येईल. तसेच नागपूर येथील प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये वन्यजीव डीएनए तंत्रज्ञान विभाग सुरू करण्यात येणार आहे. कोयनानगर (ता.पाटण, जि. सातारा) येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येईल.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृह विभागास १ हजार ७१२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

गृहनिर्माण

एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - राज्यातील घरांच्या बांधकाम परवान्यांमध्ये पारदर्शकता, गतिमानता आणि एकसूत्रता आणण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका व विशिष्ट क्षेत्र वगळता राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे व मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर करण्यात आली आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृहनिर्माण विभागास ९३१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य

पर्यटन धोरण - राज्यातील शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, यासाठी महाविकास आघाडी सरकारने कृषी पर्यटन धोरण जाहीर केले आहे. समुद्र किनाऱ्यावरील स्थानिकांना रोजगाराच्या संधी व पर्यटकांना आकर्षण म्हणून राज्याचे बीच शॅक आणि कॅराव्हॅन पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन धोरणही लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. हेरिटेज वॉक या उपक्रमास मुंबई शहरात उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे.

महाबळेश्वर, पाचगणी तसेच लोणार सरोवराच्या विकासाचा आराखडा अंतिम झाला असून त्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

आदिवासीबहुल पालघर या नवीन जिल्ह्यातील जव्हार येथे गिरिस्थान पर्यटनस्थळ विकसित करण्यात येणार असून या जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांच्या विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत.

वरळी दुग्धशाळेच्या १४ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन संकुलाची निर्मिती करण्याची घोषणा मागील अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आली होती. या संकुलाच्या विकासाकरिता जागा हस्तांतरणाची प्रक्रिया व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन

आपल्या प्राचीन परंपरा, श्रद्धास्थाने व संस्कृतीचे जतन करणे हे आपले सर्वांचेच आद्यकर्तव्य आहे. शेकडो वर्षांचा वारसा असलेल्या व स्थापत्य शैलीसाठी प्रसिद्ध असलेल्या प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचे काम शासनाने प्राधान्याने ठरवले आहे.

पहिल्या टप्प्यात राज्यातील निवडक आठ प्राचीन वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे त्यासाठी निवडली आहेत. धूतपापेश्वर मंदिर (ता. राजापूर, जि. रत्नागिरी), कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर), एकविरा माता मंदिर,कार्ले (ता. मावळ, जि. पुणे), गोंदेश्वर मंदिर (ता. सिन्नर, जि. नाशिक), खंडोबा मंदिर, सातारा (ता. जि. औरंगाबाद), भगवान पुरुषोत्तम मंदिर, पुरुषोत्तमपुरी (ता. माजलगाव, जि. बीड), आनंदेश्वर मंदिर, लासूर (ता. दर्यापूर, जि. अमरावती), शिव मंदिर, मार्कंडा (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) या मंदिरांचा त्यात समावेश आहे. या कामांसाठी २०२१-२२ मध्ये १०१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

पर्यटनासाठी जेट्टी बांधणे - काशिद (ता. मुरूड, जि. रायगड) येथील पर्यटनासाठी जेट्टी विकसित करणे व भगवती बंदर (ता. जि.रत्नागिरी) येथे क्रुज टर्मिनलच्या बांधकामाचे, अशी दोन कामे हाती घेण्यात आली आहेत.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पर्यटन विभागास १ हजार ३६७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र राज्य संग्रहालय - महाराष्ट्र राज्याचा वैभवशाली इतिहास दर्शवणारे, कला व सांस्कृतिक घडामोडींचे महासंस्कृती केंद्र ठरावे, असे महाराष्ट्र राज्य संग्रहालय उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सांस्कृतिक कार्य विभागास १६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

साखर संग्रहालय - पुण्यातील साखर संकुलात सुमारे ४० कोटी रुपये खर्चून साखर संग्रहालय उभारण्याचे प्रस्तावित असून या संग्रहालयामध्ये महाराष्ट्रातील साखर उद्योगात कालानुरूप झालेली प्रगती, साखर व अन्य अनुषंगिक उद्योग याविषयाची माहिती असेल.

सामाजिक विकास कार्यक्रम

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

शासकीय निवासी शाळामध्ये सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम सुरू करणे - अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील एका शासकीय निवासी शाळेमध्ये पथदर्शी तत्त्वावर इयत्ता सहावीपासून सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल.

दिव्यांगांच्या सुविधेकरिता वेब ॲप्लिकेशन तयार करणे - दिव्यंगत्वाचे यापूर्वी सहा प्रकार होते. त्यात वाढ करून दिव्यंगत्वाच्या यादीत आता २१ प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग व्यक्तींच्या गरजा ओळखून त्यांना मदत होईल, असे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यात येत आहे.

तृतीयपंथी घटकातील लाभार्थ्यांसाठी बीज भांडवल योजना - तृतीयपंथी घटकांतील व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नवीन बीज भांडवल योजना सुरू करण्यात येणार आहे.

स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ - स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा, यासाठी साखर कारखान्यांकडून ऊस गाळपानुसार प्रतिटन १० रुपये आकारून प्राप्त होणाऱ्या निधीच्या समप्रमाणात राज्य शासन दरवर्षी अनुदान देईल.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागास सर्वसाधारण योजनेतून २ हजार ६७५ कोटी रुपये व अनुसूचित जाती घटक योजनेतून १० हजार ६३५ कोटी रुपये असा एकूण १३ हजार ३१० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

आदिवासी विकास

मॉडेल निवासी शाळा - शासकीय आदिवासी आश्रमशाळांचे मॉडेल निवासी शाळांमध्ये रूपांतर करण्याचे प्रस्तावित. पहिल्या टप्प्यात १०० आश्रमशाळांची कामे हाती घेण्यात येणार.

आदिम जमातींकरिता एकात्मिक वसाहत - राज्यात कातकरी, कोलाम व माडिया गोंड या तीन आदिम जमाती आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा येथे पथदर्शी तत्त्वावर कातकरी समाजाची एकात्मिक वसाहत वसवण्याचे प्रस्तावित आहे. या वसाहतीमध्ये आदिम जमातीच्या लाभार्थींना घरकुल, शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधा, रोजगार निर्मितीसाठी कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कोलाम व माडिया गोंड या आदिम

एकलव्य निवासी शाळा

राज्यामध्ये या घडीला २५ एकलव्य मॉडेल निवासी शाळा सुरू आहेत. या शाळांमध्ये इयत्ता सहावी ते १२वीपर्यंत सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमांचे शिक्षण देण्यात येते. पुढील ३ वर्षांमध्ये या शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाचे इयत्ता पहिली ते पाचवीचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

जमातींसाठीदेखील अशाच प्रकारे एकात्मिक वसाहती वसवण्याचे प्रस्तावित आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता आदिवासी विकास विभागास ९ हजार ७३८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

इतर मागास बहुजन कल्याण

महाज्योती, सारथी व बार्टी - वेगवेगळ्या समाजघटकांच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या महाज्योती, सारथी व बार्टी या संस्थांना विविध योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येकी १५० कोटी रुपये तरतूद उपलब्ध करून देण्यात येत आहे.

श्री. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ - श्री. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी १०० कोटी एवढे अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ - महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची कोकण विभागाकरिता उपकंपनी असलेल्या शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळासाठी ५० कोटी रुपये अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करून दिले जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ - महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास भागभांडवलाकरिता १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ - वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाला भागभांडवलाकरिता १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना - धनगर समाजासाठी राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गातील लाभार्थींकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याचे प्रस्तावित आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता इतर मागास बहुजन कल्याण विभागास ३ हजार २१० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

डोंगरी भागासाठी मूलभूत सुविधा - राज्यात डोंगरी विभागातील गावे, वाड्या-वस्त्या तसेच डोंगरपठारावरील वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी डोंगरी विकास निधी व इतर योजनांतून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. विमुक्त जाती, भटक्या जमाती, आदिवासी तसेच धनगर समाजाच्या वस्त्यांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २५० कोटी रुपये नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

अल्पसंख्याक विकास

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक घटकांच्या विविध योजना राबवण्यात येतात. या महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलामध्ये २०० कोटी रुपये एवढी वाढ करण्यात येईल.

हजरत ख्वाजा शमनामिरा दर्गा विकास

सांगली जिल्ह्यातील मिरज येथील हजरत ख्वाजा शमनामिरा दर्गा परिसराच्या विकासाकरिता पुरेसा निधी देण्यात येणार आहे. २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अल्पसंख्याक विकास विभागास ५८९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

नियोजन व रोहयो

राष्ट्रपिता महात्मा गांधी : एक अनुभूती - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती गेल्यावर्षी साजरी झाली. या जयंती वर्षामध्ये सुरू केलेली १६२ कोटी ५२ लाख रुपये रकमेची सेवाग्राम विकास आराखड्याची कामे सध्या सुरू आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभावीपणे प्रसार करणे व त्यांचा वारसा जतन करून तो प्रभावीपणे नवीन पिढीसमोर पोहोचवण्याकरिता वर्धा जिल्ह्यात एक विशेष कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

सिंधुरत्न समृद्ध योजना - सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक साधनसामग्रीवर आधारित पर्यटन, मत्स्य व्यवसाय व सूक्ष्म उद्योगांचा विकास करण्यासाठी सिंधुरत्न समृद्ध ही पथदर्शी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेकरिता पुढील तीन वर्षात दरवर्षी १०० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्य नियोजन भवन - बृहन्मुंबईमध्ये राज्य नियोजन भवन बांधण्याचे प्रस्तावित आहे. या भवनाची अंदाजित किंमत २०० कोटी रुपये आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ४ हजार ८६२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

रोजगार हमी योजना - चालू आर्थिक वर्षात जवाहर विहिरी,

मानव विकास कार्यक्रम

मानव विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील २३ जिल्ह्यांतील १२५ मागास तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या तालुक्यातील महिला बचतगट आणि अनुसूचित जाती जमातींचे सक्षमीकरण करण्याकरिता रोजगार निर्मितीवर अधिक भर देण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी २ कोटी रुपये याप्रमाणे २५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. या कार्यक्रमांतर्गत नंदुरबार व गडचिरोली या आंकांक्षित जिल्ह्यात आदिवासींच्या उपजीविका वृद्धीसाठीच्या आमचूर व मोहफुल प्रकल्पाला मंजुरी देण्यात येणार आहे.

फलोत्पादन, शेततळी, जलसंधारणाची कामे, शेत पाणंद रस्त्यांची कामे इत्यादींकरिता रोजगार हमी योजनेसाठी २०२१-२२ मध्ये १ हजार २३१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

पर्यावरण व वने

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग - पर्यावरण विभागाचे नामकरण पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग असे करण्यात आले आहे. माझी वसुंधरा हा पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा अभिनव उपक्रम या विभागाच्या वतीने हाती घेतला आहे. या उपक्रमातून नागरिकांना वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल जागरूक केले जाईल.

प्रदूषण नियंत्रणाकरिता उपाययोजना - औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण कमी करण्याकरता सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये अधिक सुधारणा करण्याकरता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने एक विस्तृत प्रस्ताव तयार केला असून त्यासाठी ३ हजार ४८७ कोटी ५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान, नागपूर - विदेशी पर्यटकांना आकर्षित करून त्यांना स्थानिक संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात गोंडवना थीम पार्क ची निर्मिती करण्यात येत आहे, तिथे सफारीही सुरू करण्यात येणार आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान - मुंबई महानगराचे फुफ्फुस असणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सिंह सफारी व व्याघ्र सफारीचे नूतनीकरण, प्राणीसंग्रहालयात नवीन प्रजातींचे प्राणी आणणे, ई बस, ई-गोल्फ कार्ट, फुलपाखरू उद्यान इत्यादी अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

वृक्षाच्छादनात भर घालणे - दुर्गम भागात पारंपरिक पद्धतीने वृक्षलागवड करण्यात येणाऱ्या मर्यादा विचारात घेऊन हवाई बीज पेरणी तंत्रज्ञानाने वृक्षारोपण करण्याचे शासनाने ठरवले आहे. समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा वृक्षराजी निर्माण करण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वन विभागास १ हजार ७२३ कोटी रुपये आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २४६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

तीर्थक्षेत्र विकास आणि स्मारके

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम - देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी महाराष्ट्रातील श्रीक्षेत्र परळी वैजनाथ (ता. परळी, जि. बीड), श्रीक्षेत्र औंढा नागनाथ (ता. औंढा, जि. हिंगोली), श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), श्रीक्षेत्र भीमाशंकर (ता. खेड, जि. पुणे) या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

खंडेरायाची जेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र जेजुरी गड (ता. पुरंदर, जि. पुणे), श्रीक्षेत्र बिरदेव देवस्थान, निरा व भीमा नदीच्या पवित्र संगमावर वसलेले श्रीक्षेत्र निरा नृसिंहपूर (ता. इंदापूर, जि. पुणे), आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) या तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यांकरिताही निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्रीक्षेत्र मोझरी आणि श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (ता. तिवसा, जि. अमरावती) तसेच संत गाडगेबाबा निर्वाणभूमी, वलगाव (ता. जि. अमरावती) येथे मूलभूत सुविधा आराखड्यांकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धशक्तिपीठ मानल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी गड (ता. कळवण, जि. नाशिक), त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर, श्रीक्षेत्र भगवानगड (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर), श्रीक्षेत्र नारायण गड आणि श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड (ता. पाटोदा, जि. बीड) या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिताही निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मोरगाव, थेऊर, रांजणगणगाव, ओझर, लेण्याद्री, महाड, पाली तसेच सिद्धटेक या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी अष्टविनायक तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

श्रीक्षेत्र नरसी नामदेव, ता. जि. हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा - २०२१ हे संत नामदेव महाराज यांचे ७५० वे जयंती वर्ष आहे. त्यानिमित्ताने संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थान श्रीक्षेत्र नरसी नामदेव (ता.जि.हिंगोली) या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

संत बसवेश्वर महाराज स्मारक, मंगळवेढा - संत बसवेश्वर महाराज यांचे महाराष्ट्रातील मंगळवेढा (जि. सोलापूर) येथे ३० वर्षाहून अधिक काळ वास्तव्य होते. त्यांनी सर्वसामान्यांना समता, श्रमप्रतिष्ठा व सदाचाराची शिकवण दिली. संत बसवेश्वर महाराज यांच्या स्मरणार्थ मंगळवेढा, जि. सोलापूर येथे स्मारक उभे करण्यासाठी २०२१-२२ मध्ये आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री क्षेत्र पोहरादेवी - बंजारा समाजाचे आराध्यदैवत असलेले जगतगुरू संत सेवालाल महाराजांचे समाधिस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवी (ता. मानोरा, जि. वाशिम) या धार्मिक स्थळाच्या विकास आराखड्याची कामे प्रगतिपथावर आहेत. ती पूर्ण करण्याकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना - स्व. शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्याजातून जेष्ठ पत्रकारांना निवृत्तिवेतन देण्यात येते. त्यासाठी सध्या २५ कोटी रुपयांची ठेव असून त्यात १० कोटी रुपयांची भर मी जाहीर करतो. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या पोंभुर्णे (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथील स्मारकासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

इमारती/प्रशासकीय भवन

नागपूर येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे - राज्याच्या उपराजधानीच्या दर्जाला साजेशा भव्य प्रशासकीय इमारतीचे बांधकाम नागपूर येथे हाती घेण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी २५० कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महसूल विभागास २८९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

सुंदर माझे कार्यालय - राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांचा कायापालट करण्यासाठी सुंदर माझे कार्यालय हे अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानामुळे शासकीय कार्यालयातील वातावरणात तसेच सेवांच्या गुणवत्तेत वाढ होऊन शासन अधिकाधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयांना राज्य, विभागीय, जिल्हा व तालुकास्तरावर पुरस्कार देण्यात येतील.

२०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामान्य प्रशासन विभागास १ हजार ३५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

वार्षिक योजना

जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२ - २०२०-२१ च्या योजनेंतर्गत ९ हजार ८०० कोटी रुपयांच्या तुलनेत या वर्षी १ हजार २३५ कोटी रुपये इतकी वाढीव तरतूद करण्यात आली असून २०२१-२२ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेसाठी ११ हजार ३५ कोटी रुपये तरतूद उपलब्ध होणार आहे.

वार्षिक योजना २०२१-२२ - २०२१-२२ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम १ लाख ३० हजार कोटी रुपये एवढी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या १० हजार ६३५ कोटी रुपये, तर आदिवासी विकास उपयोजनेच्या ९ हजार ७३८ कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

सुधारित अंदाज २०२०-२१

२०२०-२१ च्या अंदाजपत्रकात महसुली जमा ३ लाख ४७ हजार ४५७ कोटी रुपये अपेक्षित होती. मात्र, या वर्षी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या राज्य हिश्श्याच्या कराच्या रकमेत १४ हजार ३६६ कोटी रुपये घट झाली. या सर्व बाबींचा विचार करून महसुली जमेचे सुधारित उद्दिष्ट २ लाख ८९ हजार ४९८ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहे. २०२०-२१ च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख ४ हजार ३८५ कोटी रुपये व सुधारित अंदाज ३ लाख ७९ हजार ५०४ कोटी रुपये इतका आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ - २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये व महसुली खर्च ३ लाख ७९ हजार २१३ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी १० हजार २२६ कोटी रुपये महसूली तूट येत आहे. लोककल्याणकारी योजना राबवण्यासाठी ही तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. तसेच या वर्षी अर्थव्यवस्थेला गती देणे व रोजगार निर्मितीकरिता मूलभूत बाबींवर खर्च करण्यासाठी ५८ हजार ७४८ कोटी रुपये तरतूद केली आहे. त्यामुळे राजकोषीय तूट ६६ हजार ६४१ कोटी रुपये इतकी आहे. ही राजकोषीय तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. राज्याच्या विकासासाठी ही उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

संकलन : टीम लोकराज्य

कोरोना महासाथीच्या संकटामुळे देशाप्रमाणेच राज्यांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झालेला आहे. गाळात रुतलेल्या राज्याच्या अर्थचक्राला बाहेर काढण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर आहे. या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेला चालना देणारा; तसेच उत्पन्नाची हमी देणाऱ्या क्षेत्रांना प्राधान्य देणारा महाविकास आघाडी सरकारचा भविष्यवेधी अर्थसंकल्प महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी यंदा सादर केला. शेती, ग्रामविकास, परिवहन आणि ऊर्जा या उत्पादनक्षम क्षेत्रांसाठी भरीव तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली असून, आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर देखील यात विशेष भर दिल्याचे दिसते. सध्याचे संकट मोठे असूनही या अर्थसंकल्पात समाजातील विविध घटकांना सामावून घेण्याची आणि एकूणच समतोल साधण्याची कसरत सरकारने लीलया पार पाडल्याचे दिसून येते.

संकटातही साधला समतोल!

मुकुंद लेले

संकटामुळे विचलित न होता आशावाद जिवंत ठेवणे, दूरचा विचार करणे आणि कल्याणकारी कार्यक्रमाबाबतची कटिबद्धता हे या वेळच्या राज्याच्या अर्थसंकल्पाचे ठळक वैशिष्ट्य आहे. कोरोनाच्या संकटामुळे आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावेच लागणार आहे. तसे ते सरकारने दिल्याचे स्पष्ट होते. कारण लसीकरणाचा मोठा कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी सरकारवर आता आहे. 'कोविड'च्या संकटाने सर्वांनाच सार्वजनिक आरोग्य या गोष्टीचे महत्त्व लक्षात आणून दिले आहे. सरकारने त्या आघाडीवर काही तातडीचे आणि काही दूरगामी उपाय योजले आहेत. प्रत्येक जिल्ह्यात कोविड उपचार केंद्रे उभारणे, १५० रुग्णालयांत कर्करोग उपचार केंद्र, नागरी आरोग्य कार्यालयांची उभारणी, काही वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी असे अनेक निर्णय अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहेत, जे आजच्या काळात मोलाचे ठरावेत.

केंद्राकडून कर उत्पन्नातील थकबाकी मिळण्यातील अडचणी आणि वाढत्या वित्तीय व महसुली तुटीचा प्रश्न अशा अनेक अडचणी असतानाही अजित पवार यांनी विकासाभिमुख अर्थसंकल्प सादर केला आहे. जास्तीत जास्त समाजघटकांसाठी काही ना काही तरतुदी करून सर्वसमावेशक धोरणाची ग्वाही देणे, असे या अर्थसंकल्पाचे स्वरूप दिसते. त्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या आव्हानांचा विचार जरूर केला पाहिजे. मात्र, स्वीकारलेली दिशा योग्य आहे, यात शंका नाही.

शेतकऱ्यांना साथ

कोरोनाच्या संकटाच्या काळात शेतकरीराजाने अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लावलेला आहे, याची जाणीव ठेवून अर्थमंत्र्यांनी बळीराजाला साथ देण्याचे जे धोरण जाहीर केले आहे, ते निश्चितच महत्त्वाचे आहे. विशेषतः तीन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज शून्य टक्के व्याजदराने उपलब्ध करून देण्याची घोषणा दिलासा देणारी आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी २००० हजार कोटींची तरतूद, कृषिपंप वीजजोडणीसाठी महावितरणला दरवर्षी १५०० कोटींच्या निधीची तरतूद, थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट दिली असून, जे शेतकरी उर्वरित वीज बिलांपैकी मार्च २०२२ पर्यंत ५० टक्के भरणा करतील, त्यांना शिल्लक ५० टक्के बिलात सूट देण्याची घोषणाही बळीराजाला सुखावणारी आहे. उत्पन्न वाढीसाठी भाजीपाला लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना दर्जेदार रोपांचा पुरवठा व्हावा, यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान एक अशा नवीन ५०० पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भाजीपाला रोपवाटिका स्थापन करण्यात येणार आहे. आर्थिक पाहणी अहवालात, आर्थिक विकासाचा दर उणे ८ टक्के राहील, अशी अपेक्षा आहे आणि उद्योग व सेवा क्षेत्राची प्रगती अनुक्रमे उणे ११.३ आणि ९ टक्के राहील. याउलट कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रगती ११.७ टक्के राहील, याचा विचार केला, तर यंदाचा अर्थसंकल्प हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. कृषी क्षेत्र आणि आरोग्यसेवा या दोन क्षेत्रांमध्ये केल्या जाणाऱ्या खर्चाचा अंदाज गेल्या वर्षामधील खर्चाच्या अंदाजापेक्षा अधिक आहे, हे लक्षात येते. आर्थिक पाहणी अहवालात सेवाक्षेत्र, वस्तुनिर्माण क्षेत्राची कामगिरी 'कोविड'मुळे पार ढेपाळली असताना केवळ कृषी क्षेत्राने राज्याला हात दिल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेती क्षेत्रासाठी तरतुदी करतानाच भविष्यातील उत्पादकता वाढीचा विचारही या संकल्पात दिसतो.

महिलावर्गाचा सन्मान

अजित पवार यांनी महिला सक्षमीकरणाच्या अनेक घोषणा करून राज्यातील तमाम महिलावर्गाचा सन्मान केला आहे. महिलांच्या नावावर घरखरेदी केली, तर एक टक्का मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. एकीकडे स्त्रियांचे माहात्म्य सांगायचे आणि मालमत्तेवरील समान अधिकारांचा प्रश्न आला की, रीतीरिवाजांचा आडोसा घ्यायचा ही आपल्याकडे

बोकाळलेली दांभिकता घालवण्याची गरज आहे. तशा प्रयत्नांना या निर्णयाचा उपयोग होऊ शकेल. यामुळे तिजोरीवर सुमारे १००० कोटींचा बोजा पडणार आहे. या योजनेला 'राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना' असे नाव देण्यात आले आहे. ग्रामीण भागांतील मुलींना शिक्षणासाठी मोफत बससेवा पुरवण्याची महत्त्वाकांक्षी घोषणाही केली गेली. 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना' असे नाव असलेल्या या योजनेच्या अंमलबजावणीसाठी परिवहन विभागाला दीड हजार पर्यावरणपूरक सीएनजी व हायब्रीड बस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. घरकाम करणाऱ्या मोलकरणींसाठी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण या महत्त्वाकांक्षी योजनेची सुरुवात ही असंघटित महिलांना दिलासा देणारी आहे. सुमारे ४० लाख एवढ्या संख्येने असलेल्या या महिलांसाठी समर्पित कल्याण निधी उभारला जाणार असून, त्यासाठी २५० कोटींच्या बीजभांडवलाची तरतूद करण्यात आली आहे.

पायाभूत सुविधा प्रकल्पांना महत्त्व

निव्वळ ताळेबंद न मांडता राज्याला विकासाच्या मार्गावर नेण्याचे उद्दिष्टही सरकारला साध्य करायचे असते. त्याचे योग्य ते भान सरकारने ठेवल्याचे दिसून येते. विकासासाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी अर्थमंत्र्यांनी पायाभूत सुविधा प्रकल्पांना दिलेले महत्त्व ठळकपणे लक्षात येते. रस्ते, लोहमार्ग, सिंचन प्रकल्प, ऊर्जा यासंबंधीच्या तरतुदी या दृष्टीने पाहता येतील. काहीतरी भव्य घोषणा करण्याचा संकल्प सोडला की, जनतेला भुरळ घालता येते; परंतु ते करण्याचा मोह टाळलेला दिसतो, ही चांगली बाब आहे. कारण नवे प्रकल्प जाहीर करण्याइतकेच महत्त्व आधीच्या प्रकल्पांची पूर्तता आणि झालेल्या कामांच्या दुरुस्ती-देखभालीला असते. वेगवेगळ्या प्रकारचे मार्ग नि महामार्गाचे तीन लाख किलोमीटरचे रस्ते आपल्याकडे बांधून तयार आहेत. यंदा त्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी निधीची तरतूद करण्याचे अर्थमंत्र्यांनी उचललेले पाऊल महत्त्वाचे आहे. जो काही भांडवली खर्च वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी केला जातो, त्यांची नियमित देखभाल झाली नाही, तर त्या खर्चाचा बराच भाग वाया जातो. हे टाळण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या तरतुदीची गरज सरकारने ओळखली, हे बरे झाले. धरणांच्या बळकटीकरणासाठी ६२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

क्षेत्रनिहाय तरतूद (आकडे कोटी रुपयांत)

- कृषी व संलग्न सेवा : ९६०६.१७
- ग्रामीण विकास : ६४३७.४०
- जलसंपदा व पूरनियंत्रण: १४,८९४.४६
- ऊर्जा : १०,६६३.१३
- उद्योग व खाण : ९३१.४४
- परिवहन : २५,१३०.९५
- सामाजिक व समूह सेवा : ४७,७४९.८१
- विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण : ३८४.८२
- सामान्य सेवा : ८२३०.२९

वित्तीय व महसुली तूट

महसुली तूट २०२०-२१ मध्ये ४६,१७७.५९ कोटी रुपये होती. 'कोविड'चे संकट असेच चालू राहिले, करेतर उत्पन्नाच्या स्रोतांमध्ये वाढ झाली नाही आणि खर्च वाढले, तर महसुली तुटीचा अंदाज कोलमडू शकतो. अशा परिस्थितीत महसुली खर्चाच्या आकडेवारीत वाढ होईल. अर्थसंकल्पात पेट्रोल आणि डिझेलवरील करात कपात सुचविली गेलेली नाही आणि 'व्हॅट' आणि उत्पादनशुल्कात वाढ सूचित केली आहे. महसुली तूट थोड्याफार प्रमाणात आटोक्यात ठेवण्यात या गोष्टीची थोडीफार मदत होईल. या अर्थसंकल्पात करांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या उत्पन्नात लक्षणीय वाढ सुचवण्यात आलेली नाही. म्हणून 'कोविड'चे संकट आणि खर्च यांचे योग्य नियोजन करताना महसुली तूट ही प्रत्यक्ष अंदाजापेक्षा जास्त राहू शकेल. राज्य सरकारपुढील तेही एक महत्त्वाचे आव्हान राहील. त्याचप्रमाणे वित्तीय तुटीचे आकडेही प्रत्यक्ष अंदाजापेक्षा थोडेफार वेगळे राहण्याची शक्यता आहे. थोडक्यात, अर्थसंकल्पातील अंदाज आणि अर्थसंकल्पीय सुधारित आकडेवारी वित्तीय तुटीचा वाढत जाणारा आलेख दर्शवते. अर्थसंकल्पातील भांडवली खर्चाच्या गोष्टी आणि महसुली खर्च वाढून, उत्पन्न त्या प्रमाणात वाढले नाही, तर महसुली तूट वाढत जाऊन एकूण वित्तीय तुटीत आणखी भर पडण्याची भीती नाकारता येत नाही. कोविडमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत तुटीचा फारसा विचार करू नये, हे खरे. परंतु महसुली तुटीचा दहा हजार कोटीचा आकडा लहान नाही. प्रश्न तुटीचा नाही, तर हे भगदाड बुझवण्यासाठी सरकार कोणते कल्पक उपाय योजणार हा आहे. अप्रत्यक्ष कररचनेतील बदलांमुळे सरकारला आता करेतर मार्गांनी उत्पन्न वाढवण्याचीही गरज भासणार आहे.

कर्जाचा वाढता बोजा

राज्यावर एकूण ६ लाख १५ हजार १७० कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा असून, मागील वर्षांत राज्य सरकारने ६६ हजार ६६८ कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. या एकूण कर्जात सरकारी कर्जाचा वाटा ५ लाख ३३ हजार ६७० कोटी रुपये इतका आहे. यामध्ये राज्याने देशांतर्गत घेतलेले कर्ज (५ लाख २५ हजार ८६२ कोटी) आणि केंद्राकडून घेतलेल्या आगाऊ रकमा (७८०८ कोटी) यांचा समावेश आहे. गेल्या दोन वर्षांत राज्याच्या एकूण कर्जात १,६४,०५६ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. २०२१-२२ च्या अर्थसंकल्पी अंदाजानुसार, एकूण कर्ज ६,१५,१७० कोटी रुपयांनी वाढले आहे. यासंदर्भात २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील सुधारित आकडेवारी ५,३८,३०४ कोटी रुपये होती. म्हणजे सुधारित आकडेवारीच्या तुलनेत या अर्थसंकल्पी अंदाजात कर्जाच्या बाबतीत वाढ झालेली दिसते. कर्जाचे हे प्रमाण २५ टक्क्यांच्या आत असले, तरी ते वाढत जाणारे आहे. त्यामुळे कर्जाचा वाढता बोजा कसा नियंत्रणात ठेवायचा, त्यासाठी कोणती वित्तीय शिस्त पाळायची, याचा विचार सरकारला करावा लागणार आहे.

एकूण विचार करता, यंदाच्या अर्थसंकल्पाने सरकारची दिशा स्पष्ट झाली आहे. मात्र, त्यातील घटकांची, तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी कशी होते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

कोविड-१९च्या वाढत्या प्रादुर्भावात झालेले राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विशेष महत्त्वाचे ठरले. राज्याच्या महसुलात झालेली घट लक्षात घेऊन राज्य शासनाने सर्वसमावेशक अर्थसंकल्प मांडलाच त्याबरोबरच राज्यातील सर्वसामान्य घटकांच्या विविध प्रश्नाला न्याय देण्यासाठी विविध विधेयके मंजूर झाली. राज्य शासन महिला, वंचित-उपेक्षित आणि कामगारांच्या हिताच्या रक्षणासाठी सदैव कार्यरत असल्याचे आश्वासक चित्र यातून दिसून आले.

लोकहित सर्वोतोपरी

देवेंद्र पाटील

मागील वर्षापासून आपण कोरोना महामारीच्या संकटाचा मोठ्या धैर्याने सामना करत आहोत. मार्च २०२० मध्ये कोरोनामुळे अधिवेशन निर्धारित वेळेअगोदर संपवावे लागल्यानंतर गेल्या वर्षभरात कोरोनाच्या संकटावर राज्य शासन धीराने मुकाबला करत आहे. राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे ही महामारी आटोक्यात आणण्यात यश आले असले तरी पुन्हा फेब्रुवारी २०२१ पासून राज्यातील बहुतांशी भागात कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागली आणि आपली काळजी वाढली. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाचा पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पीय अधिवेशन घेणे व कमी दिवसांमध्ये जास्तीत जास्त तास लोकहिताच्या मुद्द्यांवर चर्चा घडवून आणणे व जनहिताचे अनेक निर्णय घेणे, विधेयके मंजूर करणे हे अतिशय आव्हानात्मक काम होते. परंतु मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कुशल नेतृत्वाखालील महाविकास आघाडी शासनाने हे शिवधनुष्य पेलले व अधिवेशन यशस्वी करून दाखवले.

यंदाचे विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. १ ते १० मार्च दरम्यान मुंबईत झालेल्या या अधिवेशनात कोरोनाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून सर्वांना प्रवेश देण्यात आला व उभय सभागृहांमध्ये या नियमांचे पालन केले गेले. कोरोना नियंत्रणासाठी शासनाकडून केल्या जात असलेल्या उपाययोजना, अतिवृष्टीमुळे व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत राज्य शासनाने केलेली मदत, शेतकऱ्यांचे प्रश्न, मराठा आरक्षण व कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न अशा जनतेच्या अनेक प्रश्नांवर विधानसभा व विधानपरिषद सभागृहांमध्ये चर्चा फलद्रूप झाली व शासनाने त्यावर सकारात्मक दृष्टिकोन ठेवत अनेक निर्णय जाहीर केले.

चर्चेद्वारे जनहिताच्या प्रश्नांची सोडवणूक

राज्यातील कृषी योजनांना निधी देणे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, हुक्का पार्लरवर कारवाई करणे, कृषी विभागातील रिक्त पदांची भरती, अवैध रेती उत्खनन, शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांना न्याय देणे, पुरेशी धान खरेदी केंद्रे सुरू करणे, अकरावीची प्रवेशप्रक्रिया सुरळीत करणे, महापूर, अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे, औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती, निराधार व्यक्तींना अनुदान, धनगर समाजाच्या विकासासाठी निधी मिळण्याची मागणी, दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदांची भरती, मराठवाड्यासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध करून देणे, मराठवाडा वॉटर ग्रीड सुरू करणे, मासेमारी बंदी कालावधीत कोळी बांधवांना द्यावयाची नुकसानभरपाई, शेतकऱ्यांना सिंचन विहीर योजनेचे अनुदान देणे, बंजारा समाजाच्या तांडे, वाड्या-वस्त्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची मागणी, शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे प्रलंबित अनुदान देणे, कृषी विभागातील आदिवासी उमेदवारांची रिक्त पदे भरणे, कुष्ठरोग रुग्णांसाठी स्वतंत्र वसाहत बांधणे, कोविड सेंटरमधील महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, आरोग्य विभागातील संस्थांचे फायर ऑडिट, राज्यातील बसस्थानकांची कामे, ऊसतोड कामगारांचे प्रश्न, लघुउद्योजकांचे प्रश्न प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, वीजबिलाचा प्रश्न असे अनेक प्रश्न विधिमंडळात मांडले गेले व त्यावर उत्तर म्हणून शासनाकडून अनेक निर्णय व व उपाययोजना जाहीर करण्यात आल्या.

राज्यपालांचे अभिभाषण

राज्य शासनाने गेल्या वर्षभरात केलेल्या कामाचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अभिनंदन करतानाच राज्याच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन करीत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. विशेषतः कोरोना संकटकाळात राज्य शासनाने राबवलेल्या विविध उपाययोजनांचे राज्यपालांनी कौतुक केले असून ही महामारी आटोक्यात आणण्यासाठी श्रम घेतलेल्या सर्व घटकांचे अभिनंदन केले आहे. 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही देशातील अभिनव आरोग्य तपासणी मोहीम राज्यात राबवण्यात आली. या मोहिमेमुळे राज्यातील कोविड संसर्ग रुग्ण सापडण्याबरोबरच राज्याचा आरोग्य नकाशा तयार होण्यास मदत झाल्याचे राज्यपालांनी सांगितले. राज्यात कोविडचा धोका अजूनही टळलेला नसून आता कोविडशी मुकाबला करण्यासाठी 'मी जबाबदार' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.

विकासकामे वेगात सुरू

कोरोनाविरुद्धच्या कठीण लढ्याला महाराष्ट्र समर्थपणे सामोरे जात असताना विकास कामांनादेखील वेग दिला असून आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेऊन महाराष्ट्र समृद्ध करण्यासाठी एकत्र येऊ या, असे आवाहन राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला विधानसभेमध्ये उत्तर देताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. महाराष्ट्र सीमाप्रश्न, त्याचप्रमाणे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठीही केंद्र शासनाकडे सर्वांनी एक होत मागणी करण्याचे आवाहनही श्री. ठाकरे यांनी केले.

कोरोनाविरुद्धचा लढा सुरूच

कोरोनाची आपत्ती नवी असल्यामुळे आपल्या यंत्रणांना सज्ज करण्याचे मोठे आव्हान होते. रुग्णांच्या प्रमाणात सुरुवातीला यंत्रणा कमी होती त्यात वाढ करत गेलो. देशातील पहिले जम्बो कोविड रुग्णालय सुरू केले. कोविडसाठी प्रत्येक जिल्ह्यात टास्क फोर्स निर्माण केला. खासगी रुग्णालयात ८० टक्के खाटा राखीव ठेवल्या; ५ लाख ६० हजार लोकांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ दिला.

कोविडचे संकट आले त्या वेळी दोन किंवा तीन चाचणी लॅब होत्या. आज ही संख्या शासकीय आणि खासगी मिळून ५०० च्या आसपास आहे. एकट्या मुंबईत २० ते २५ हजार चाचण्या होत आहेत हे आपले मोठे यश आहे.

'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अभियानांतर्गत महसूल, आरोग्य विभागाचे कर्मचारी राज्यात घरोघरी गेले. यामुळे सहव्याधी असलेले रुग्ण लक्षात आले. कोरोनावर आपण नियंत्रण मिळवत आहोत, असे वाटत असतानाच आता पुन्हा कोरोना रुग्णांची वाढ होत आहे. त्यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम केले पाहिजे. 'मी जबाबदार' मोहीम त्यासाठीच सुरू केली आहे.

कोरोनापासून बचावासाठी त्रिसूत्री आवश्यकच

मास्क वापरा, हात धुवा आणि शारीरिक अंतर ठेवा या त्रिसूत्रीचे पालन करणे आवश्यक आहे. कोरोनाविरुद्धची लस घेतली तरीही त्रिसूत्रीचे पालन आवश्यक आहे.

हमीच नाही तर हमखास भाव

पुढच्या वर्षी बाजारपेठेत कोणत्या पिकाला मागणी असेल ते विचारात घेऊन दर्जेदार उत्पादन आणि हमी भावच नाही, तर हमखास भाव मिळाला पाहिजे, यासाठी 'विकेल ते पिकेल' ही योजना सुरू केली आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी सौर कृषी वीज पंपाची योजना मोठ्या प्रमाणात राबवण्यात येत आहे.

विभागावर अन्याय नाही

विकासनिधीच्या वाटपात राज्याच्या कोणत्याही विभागावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'कोरोना' संकटाचा मुकाबला करण्यासाठी विरोधी पक्षांसह सर्व घटकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सर्वांनी मिळून कोरोनावर मात करू या

विधानपरिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यावर आलेल्या 'कोरोना'च्या अभूतपूर्व संकटाचा सामना शासनाने अत्यंत धीराने आणि संयमाने केला.

कोरोना संकटकाळात सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, पोलिस, अन्न व नागरी पुरवठा, अशा महत्त्वाच्या विभागांच्या निधीला कोणत्याही प्रकारची कात्री लावण्यात आली नसल्याचे उपमुख्यमंत्री

शिवभोजन – पोट भरणारी योजना

गोरगरिबांना केवळ ५ रुपयात थाळी देण्याची 'शिवभोजन योजना' सुरू केली. ती अजूनही सुरू आहे. ही योजना गोरगरीब जनतेचे पोट भरणारी योजना आहे. मी माझ्या राज्याशी बांधील असून जनतेची काळजी घेणे माझे कर्तव्य आहे, असेही श्री.ठाकरे यांनी सांगितले.

मराठी भाषा विद्यापीठ

मराठी भाषेचे विद्यापीठ राज्यात स्थापन करण्याचे महाराष्ट्र शासनाने निश्चित केले आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने भाषा सल्लागार समितीच्या पुणे येथे १ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेल्या बैठकीत भाषा सल्लागार समितीने ठराव संमत केला आहे. अन्य प्रांतात संबंधित भाषेची विद्यापीठे आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात देखील मराठी भाषा विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे, अशा शिफारस करण्यात आल्याचे निवेदन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात केले.

अजित पवार यांनी सांगितले. कोरोना काळात राज्यभरात जंबो कोविड सेंटर, उपचार केंद्रासह आरोग्यविषयक कामांना निधी कमी पडू दिला नाही, हे देखील त्यांनी स्पष्ट केले. कोविड-१९ संकटातून सावरण्यासाठी, राज्याच्या अर्थचक्राला गती देण्यासाठी, बांधकाम क्षेत्राला ऊर्जितावस्था मिळवून देण्यासाठी मुद्रांक शुल्क कमी करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आला. या निर्णयामुळे घरखरेदीचे व्यवहार वाढले. सर्वसामान्यांचे घरखरेदीचे स्वप्न साकार होण्यासही यामुळे मदत झाली.

राज्यात वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात नसली तरी ही मंडळे अस्तित्वात आहेत, असे गृहीत धरून निधीचे वाटप ठरलेल्या सूत्रानुसारच करण्यात येईल. विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्राच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असून राज्याच्या कोणत्याही विभागावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. कोरोना संकटकाळात आर्थिक संकटाचा सामना करत असतानासुद्धा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया सुरू ठेवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक

मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे, ही प्रत्येक नागरिकाची इच्छा आहे. यासाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली आहे. १०० फूट पादपीठ आणि ३५० फूट उंचीचा हा पुतळा असणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) कडून या कामाचा सुरुवातीला खर्च करण्यात येणार आहे.

विधिमंडळात दोन्ही सभागृहात सहा विधेयके संमत

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने राज्याच्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा कालावधी कमी असला तरी या आव्हानात्मक परिस्थितीत 'महाराष्ट्र थांबला नाही, थांबणार नाही' याला जागून १३ कोटी जनतेला दिलासा देणारा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. या अधिवेशनात दोन्ही सभागृहामध्ये सहा विधेयके संमत करण्यात आली,

या अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहात मुद्रांक शुल्काच्या दरामध्ये एकसमानता, गुंठेवारी नियमाधीन करणे व त्याची श्रेणीवाढ करणेबाबत, महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, नागरी स्थानिक संस्थामधील प्रशासकांच्या नियुक्तीचा कालावधी वाढवणे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक ही सहा विधेयके संमत करण्यात आली.

- **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. १ -** महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१ (सन २०२१ चा महा. अध्या. क्र. १) (बॅकांशी संबंधित साधे गहाण खत आणि हक्कविलेख-निक्षेप (इक्विटेबल मॉरगेज), तारण किंवा तारणगहाण यासंबंधीच्या दस्त तथा संलेख यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार आकारणी करण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या दरामध्ये एकसमानता आणण्याकरिता अधिनियमाच्या कलम ५ मध्ये ११ ऑगस्ट २०१५ रोजीच्या पूर्वलक्षी प्रभावाने तर उक्त अधिनियमात जोडलेल्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ६ व अनुच्छेद ४० मध्ये सुधारणा करणेबाबत) (महसूल व वन विभाग) (पुर:स्थापित २ मार्च २०२१, विधानसभेत संमत ३ मार्च २०२१, विधानपरिषदेत संमत ४ मार्च २०२१)
- **सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्र. २ -** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (अधिनियमन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१ (३१ डिसेंबर २०२० रोजी अस्तिवात असलेली गुंठेवारी नियमाधीन करणे व त्याची श्रेणीवाढ करणेबाबत तरतूद करण्याबाबत) (नगर विकास विभाग) (पुर:स्थापित २ मार्च २०२१, विधानसभेत संमत ३ मार्च २०२१, विधानपरिषदेत संमत ४ मार्च २०२१)
- **सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्र. ३ -** महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१ (विधानसभेत संमत ४ मार्च २०२१, विधानपरिषदेत संमत ४ मार्च २०२१)
- **सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्र. ४ -** महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१, (कोविडच्या पार्श्वभूमीवर निवडणुका घेणे शक्य नाही, असे निवडणूक आयोगाकडून कळवले असेल तेव्हा नागरी स्थानिक संस्थामधील प्रशासकांच्या नियुक्तीच्या कालावधी निवडणूक आयोगाने कळवलेल्या कालावधीसाठी वाढवणे किंवा प्रशासकांची नियुक्ती करणे) (नगर विकास विभाग) (पुर:स्थापित ४ मार्च २०२१, विधानसभेत संमत ५ मार्च २०२१, विधानपरिषदेत विचारार्थ ८ मार्च २०२१, ९ मार्च २०२१, विधानसभेत संमत ९ मार्च २०२१)
- **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. ५ -** महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ (कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत) (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग) (पुन:स्थापित ५ मार्च २०२१, विधानसभेत विचारार्थ ८ मार्च २०२१, ९ मार्च २०२१, विधानसभेत संमत ९ मार्च २०२१, विधानपरिषदेत संमत १० मार्च २०२१)
- **सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्र. ६ -** महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२१ (पुर:स्थापित १० मार्च २०२१, विधानसभेत संमत १० मार्च २०२१, विधानपरिषदेत संमत १० मार्च २०२१)

विभागीय संपर्क अधिकारी

भारतासारख्या खंडप्राय देशात शेतीचे विशेष महत्त्व आहे. शेतकरी हा सर्व समाजाचा पोशिंदा आहे. शेतीत मोठे मनुष्यबळ कार्यरत असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत शेती व शेतकरी यांचा मोलाचा वाटा आहे. आणि म्हणूनच कोरोना आणि लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना हात देऊन शेतकरी बांधवांचा विकास साधण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने नुकतेच 'कृषिपंप वीजजोडणी' हे एक अत्यंत महत्त्वाचे धोरण जाहीर केले आहे. शेतीसाठी वीजजोडणी हे या धोरणाचे महत्त्वाचे अंग आहे.

कृषिपंप वीजजोडणी धोरण

'कृषी ऊर्जा पर्व' हे १ मार्च ते १४ एप्रिल या कालावधीत राबवण्यात येत आहे. याचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते विधानभवनात करण्यात आला. दरम्यान विजबिलाची थकबाकी भरणाऱ्या शेतकऱ्याचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, ऊर्जामंत्री नितीन राऊत आदी उपस्थित होते.

विश्वजीत भोसले

५ मे २०१८ च्या शासन निर्णयानुसार, ३१ मार्च २०१८ पर्यंत पैसे भरलेल्या कृषिपंपांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीजजोडणी देण्यात येत होत्या. १ एप्रिल २०१८ पासून प्रलंबित कृषिपंप अर्जदारांना १८ डिसेंबर २०२० च्या शासण निर्णयानुसार सर्वंकष 'कृषिपंप वीजजोडणी धोरण-२०२०' योजनेंतर्गत वीजजोडणी देण्यात येत आहेत.

वीजजोडणी धोरणाचे स्वरूप

महावितरणच्या या धोरणांतर्गत ३० मीटरच्या आत सर्व कृषी ग्राहकांना तत्काळ वीजजोडणी देण्यात येणार आहे. याशिवाय ज्या कृषिपंपाचे अंतर लघुदाब वाहिनीच्या २०० मीटरच्या आत आहे अशा नवीन कृषिपंप ग्राहकांना एरियल बंच केबलद्वारे वीजजोडणी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने लघुदाब वाहिनी, एरियल बंच केबल उभा केल्यास, झालेल्या खर्चाचा १०० टक्के परतावा कृषी ग्राहकांच्या वीजबिलामधून देण्यात येणार आहे.

प्रभावी अंमलबजावणी

शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखा-समाधानाचे क्षण कसे येतील हे पाहणे सरकारचे काम आहे. शेतकऱ्यांच्या आशीर्वादाची ताकद मोठी असते. इतरांसाठी मळे फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात काटे येऊ नयेत यासाठी त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मागे सरकार ठामपणे उभे राहील. शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देणे शासनाची प्राथमिकता असून महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश दिले आहेत.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

जर अर्जदार आर्थिक कारणामुळे खर्च करण्यास सक्षम नसेल, तर त्याला क्रमवारीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार वीजजोडणी देण्यात येईल.

वीज यंत्रणेपासून २०० ते ६०० मीटरच्या आत असलेल्या कृषी ग्राहकांना 'उच्चदाब वितरण प्रणाली'चा पर्याय उपलब्ध आहे, तर ६०० मीटरपेक्षा जास्त अंतर असल्यास पारेषण विरहित सौर ऊर्जेवरील अथवा उच्चदाब प्रणालीद्वारे कृषिपंपाचा पर्याय उपलब्ध आहे.

कृषी ग्राहकांना दिलासा

कृषी ग्राहकांच्या जुन्या थकबाकीवर म्हणजेच सप्टेंबर-२०१५ पूर्वीच्या थकबाकीवरील संपूर्ण (१०० टक्के) विलंब आकार व व्याज माफ करण्यात आला आहे. तर सप्टेंबर-२०१५ ते सप्टेंबर-२०२० पर्यंतच्या थकबाकीवरील (१०० टक्के) विलंब आकार माफ व व्याज हे मा.आयोगाने ठरवलेल्या भाग भांडवलावरील व्याजदरानुसार आकारण्यात येणार आहे. या सुधारित थकबाकी व चालू बिल वेळेत भरल्यास ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार तीन वर्षात थकबाकी भरल्यास खालीलप्रमाणे सूट मिळणार आहे.

सुधारित थकबाकीचा भरणा केल्यास कृषी ग्राहकांना पहिल्या वर्षी ५० टक्के सूट, दुसऱ्या वर्षात भरलेल्या रकमेवर ३० टक्के तर तिसऱ्या वर्षात भरलेल्या रकमेवर २० टक्के सवलत मिळणार आहे. सप्टेंबर २०२० आधीच्या थकबाकीवर दिलेली सूट धरून पहिल्या वर्षी वीज बिल भरणा केल्यास एकूण सूट ६६ टक्केपर्यंत जाते. याच बरोबर, ज्या रोहित्रावर कृषी ग्राहकांनी समूहाने १०० टक्के वीजबिलाचा भरणा केल्यास त्या रोहित्रावरील सर्व कृषी ग्राहकांना चालू वीजबिलावर १० टक्के अतिरिक्त सूट देण्यात येत आहे.

या योजनेत थकबाकी नसणाऱ्या व नियमित वीजबिल भरणाऱ्या कृषी ग्राहकांना मोठा लाभ देण्यात येत आहे. थकबाकी नसणाऱ्या व नियमित वीजबिल भरणाऱ्या कृषी ग्राहकांना योजनेच्या कालावधीत चालू बिलावर अतिरिक्त पाच टक्के सवलत देण्यात येणार आहे.

सौर कृषी वाहिनीद्वारे वीजपुरवठा

सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे महावितरणच्या ३३/११ के.व्हो. उपकेंद्राच्या पाच किलोमीटरच्या परिघात सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज निर्माण करून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्याचे लक्ष्य या योजनेंतर्गत ठेवण्यात आले आहे.

उत्पन्नाची संधी

सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रकल्पाकरिता शेतकरी आपली पडीक व नापीक जमीन भाड्याने देऊ शकतात. याद्वारे पडीक व नापीक जमिनीतून उत्पन्न मिळवण्याची संधी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. याकरता शेतकऱ्यांना सौर कृषी वाहिनी योजनेत सहभागी होऊन महावितरण सोबत भाडेतत्त्वाचा करार करावा लागेल. त्यानंतर शेतकऱ्यांना प्रतिएकर प्रतिवर्ष ३०,०००/-

योजनेला प्रोत्साहन

आम्ही शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असून शेतकऱ्यांचे प्रश्न, कृषिपंपांचे महत्त्व आम्हाला माहीत आहे. सर्वांना व्यवस्थित वीज मिळेल, वेळेत विजेची जोडणी मिळेल हे आमचे उद्दिष्ट असून आहे. पाच वर्षात पाच लाख सौर कृषिपंप देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याच्या अनुषंगाने सौर कृषिपंप योजनेला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे.

- अजित पवार, उपमुख्यमंत्री

रुपये दराने मोबदला दिला जाईल. या दरात वार्षिक तीन टक्के दरवाढ ही दिली जाणार आहे. आपला सहभाग नोंदवण्यासाठी शेतकरी आपल्या नजीकच्या महावितरण कार्यालयास भेट देऊ शकतात अथवा www.mahadiscom.in/solar-mskvy/ या संकेतस्थळाला भेट देऊ शकतात.

पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण

'कृषिपंप वीजजोडणी धोरण-२०२०' योजनेंतर्गत कृषी ग्राहकांकडून बिलापोटी जमा झालेल्या एकूण रकमेच्या ६६ टक्के रकमेचा वापर कृषी ग्राहकांच्या पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी वापरण्यात येत आहे. संबंधित ग्रामपंचायतीकडून जमा झालेल्या निधीमधून ३३ टक्के रक्कम ही महावितरणच्या विभागीय पातळीवर उपलब्ध निधीनुसार त्या ग्रामपंचायतीतील कृषिपंप ग्राहकांच्या पायाभूत सुविधा सुधारण्याकरिता वापरण्यात येणार आहे, तर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीकडून एकत्रितपणे वसूल झालेल्या ३३ टक्के रकमेपर्यंतचा वापर

माझे वीज बिल माझी जबाबदारी

उद्दिष्टापेक्षा अधिक काम

नवीन कृषिपंप वीजजोडणी धोरणांतर्गत १९ फेब्रुवारीपर्यंत १० हजार शेतकऱ्यांना वीजजोडणी देण्याच्या उद्दिष्टापेक्षा अधिक काम करत सुमारे १८ हजार शेतकऱ्यांना वीजजोडणी देण्यात आली आहे. तसेच १० हजाराहून अधिक सौर कृषिपंप देण्यात आले आहेत. कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण अंतर्गत ८४ वाहिन्यांना लघुसौर ऊर्जा प्रकल्पातून वीज पुरवली जात असून, त्याद्वारे ३० हजारांहून अधिक शेतीपंपांना दिवसा वीज पुरवठा केला जात आहे.

- डॉ. नितीन राऊत, ऊर्जामंत्री

जिल्ह्याचे पालकमंत्री व महावितरणचे अधिक्षक अभियंता यांच्या मंजुरीने त्या जिल्ह्यातील कृषिपंप ग्राहकांसाठी पायाभूत सुविधा सुधारण्याकरिता वापरण्यात येणार आहेत. शेवटी वीजबिलापोटी जमा झालेल्या उर्वरित फक्त ३४ टक्के रकमेचा वापर महावितरणच्या मुख्य कार्यालयामार्फत वीज खरेदी व कर्ज परतफेडीकरिता करण्यात येणार आहे.

सहभाग व सक्षमीकरण

'कृषिपंप वीजजोडणी धोरण-२०२०' योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना वीजबिल वसुलीवर भरघोस मोबदला देण्यात येत आहे. त्यामुळे वीज बिल वसुली हे ग्रामपंचायतींना शाश्वत आर्थिक उत्पन्नाचे साधन ठरणार आहे. याकरिता ग्रामपंचायतींनी महावितरणकडे नोंद करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींना सर्व ग्राहकांच्या वीजबिल वसुलीसाठी ५/- रुपये प्रतिबिल मोबदला देण्यात येत आहे. तर कृषी ग्राहकांच्या थकबाकी वसुलीवर ३० टक्के मोबदला देण्यात येत आहे. तसेच कृषी ग्राहकांच्या चालू वीजबिल वसुलीवर २० टक्के मोबदला देण्यात येत आहे.

ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या वीज बिल वसुलीच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग गावातील विविध विजेच्या विकासकामांमध्ये करणे शक्य होणार आहे. या धोरणांतर्गत कृषी ग्राहकांकडून जमा होणारा ६६ टक्के महसूल कृषी ग्राहकांच्या विजेच्या पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध होणार आहेत. याचबरोबर महाराष्ट्र शासनाकडून कृषी ग्राहकांच्या पायाभूत सुविधांकरिता १,५०० कोटी प्रतिवर्ष (पाच वर्षांकरिता) देण्यात येणार आहेत. उपलब्ध निधीतून वीज यंत्रणेचे बळकटीकरण करताना प्रामुख्याने त्यात वितरण रोहित्रांची क्षमता वाढवणे, नवीन वितरण रोहित्र बसवणे, लघुदाब वाहिनीचे बळकटीकरण, ११ के.व्ही./२२ के.व्ही./३३ केव्ही वाहिन्यांचे बळकटीकरण, उपकेंद्र देखभाल दुरुस्ती, इनकमर वाहिनी व निर्गमित वाहिनी उभारणे, ऊर्जा रोहित्र (Power Transformer) क्षमतावाढ व अतिरिक्त रोहित्र बसवणे आदी कामे करण्यात येणार आहेत.

कृषी आकस्मितता निधी

वरीलप्रमाणे पायाभूत सुविधांसाठी राखीव असलेल्या ६६ टक्के निधी व शासनाकडून मिळणारा १,५०० कोटी निधी असा एकत्रित करून 'कृषी आकस्मितता निधी'ची (ACF - Agriculture Coningencies Fund) स्थापना करण्यात आली आहे. या 'कृषी आकस्मित निधी'मध्ये जमा होणाऱ्या रकमेचा विनियोग त्याच भागातील कृषी ग्राहकांकरिता करण्यात येणार आहे. जमा असलेल्या निधीची सर्व माहिती कृषी ग्राहकांकरिता तयार केलेल्या कृषी धोरण पोर्टलवर उपलब्ध आहे. कृषी ग्राहकांचे सर्व व्यवहार पारदर्शक होण्यासाठी ऑनलाईन पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे.

कृषी ग्राहकांना वीजबिलाचा व थकबाकीचा तपशील महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. याचबरोबर तंत्रज्ञांचा पुरेपूर वापर करत कृषी धोरण पोर्टल व सौर कृषी मागणी पोर्टल तयार करण्यात आले आहेत. तसेच खासदार व आमदार यांच्याकरिता मोबाईल ॲपही सुरू करण्यात आले आहे.

सोई-सुविधा भक्कम होणार

शेतकऱ्यांनी भरलेल्या कृषी पंपाच्या विजबिलामधून ३३ टक्के रक्कम ग्रामपंचायत क्षेत्रासाठी आणि ३३ टक्के रक्कम जिल्ह्यातील कृषी पंपाच्या पायाभूत सुविधांसाठी वापरली जाणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी पंपाच्या सोई-सुविधा भक्कम होणार आहेत. काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन प्रकाशमान करण्यासाठी 'नवीन कृषी ऊर्जा धोरण २०२०' महत्त्वाचे ठरणार आहे.

- प्राजक्त तनपुरे, ऊर्जा, राज्यमंत्री

ज्यामध्ये लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदारसंघनिहाय होणाऱ्या कृषी वीजबिलाच्या वसुलीची पाहणी करू शकतात. तसेच विजेच्या नवीन पायाभूत कामची मागणी नोंदवू शकतात.

शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद

नवीन कृषिपंप वीज धोरणास राज्यभरातील शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. ऑक्टोबर २०२० मध्ये जाहीर झालेल्या या योजनेत थकबाकी भरण्यासाठी विविध सवलती जाहीर झाल्यापासून राज्यात ७ लाख ६५ हजार शेतकऱ्यांनी धोरणांतर्गत ६९७ कोटी ४२ लाख रुपये २३ मार्च २०२१ अखेरपर्यंत भरले आहेत.

जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई.

महाआवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध ग्रामीण आवास योजनांमधून २०२२ पर्यंत ग्रामीण भागातील गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन कुटुंबांना घरकुलाचा लाभ दिला जाणार आहे. मूलभूत सुविधांसह, स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार ८ लाख दर्जेदार व पक्क्या घरकुलांची निर्मिती २०२२ पर्यंत करण्याचे शासनाचे नियोजन आहे. या घरकुलांसाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता करण्यात आलेली असून, अभियान कालावधीत बेघर व गरजूंच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

महाआवास : सर्वांसाठी घरे

डॉ. राजाराम दिघे

केंद्र व राज्य शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या 'सर्वांसाठी घरे-२०२२' या धोरणांतर्गत २०२२ पर्यंत सर्व गरजूंना हक्काचे पक्के घर मिळणार आहे. या धोरणांतर्गत विविध योजना एकत्रपणे राबवल्या जात आहेत. त्या अनुषंगाने राज्यात विविध केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना या संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या कार्यालयामार्फत यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहेत.

ग्रामीण गृहनिर्माण कक्ष

ग्रामविकास विभागांतर्गत राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच इतर विभागाच्या उदा. सामाजिक न्याय, आदिवासी, गृहनिर्माण विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाशी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत समन्वय ठेवणे व केंद्र शासनाशी अंमलबजावणी संदर्भातील विषयाबाबत समन्वय करणे यासाठी व राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण घरकूल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन नागरिकांना हक्काचा निवारा देणाऱ्या विविध ग्रामीण आवास योजना शासनातर्फे राबवण्यात येत आहेत, त्या पुढीलप्रमाणे:

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाची ही योजना आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील कच्चे घर/बेघर कुटुंबांना मूलभूत सुविधांसह घरकुलाचा लाभ दिला जातो. घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात १.२० लक्ष रुपये व नक्षलग्रस्त/डोंगराळ भागातील लाभार्थ्यांना १.३० लक्ष रुपये प्रतिलाभार्थी अर्थसाहाय्य अनुज्ञेय आहे. सामाजिक, आर्थिक व जात सर्व्हेक्षण (एसईसीसी-२०११) माहितीच्या आधारे ग्रामसभेमार्फत तयार केलेल्या कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (पीडब्ल्यूएल) मधून लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.

रमाई आवास योजना

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग अर्थसाहाय्यित ही राज्य पुरस्कृत योजना आहे. या योजनेचा लाभ राज्यातील अनुसूचित जाती (एससी) व नवबौद्ध घटकांसाठी देय आहे. त्याचप्रमाणे प्राप्त उद्दिष्टांपैकी २५,००० घरे, मातंग समाजातील लाभार्थ्यांसाठी व अनुसूचित जाती संवर्गातील ३% घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव आहेत. २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह घरकुलाचे बांधकाम केले जाते. घरकुल बांधकामाकरिता साधारण

घराचे स्वप्न होईल पूर्ण

राज्यातील एकूण लोकसंख्येचा महत्त्वाचा भाग असलेल्या ग्रामीण भागात ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजनांमधून शासन बेघरांना सर्व सुविधांनी युक्त असा हक्काचा निवारा पुरवण्यात यशस्वी होत आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयामार्फत ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वीरीत्या राबवल्या जात असून 'महाआवास अभियान-ग्रामीण' या अभियानात गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन कुटुंबांना घरकुलाचा लाभ दिला जात आहे. ग्रामविकास विभागाच्या अधीनस्थ सर्व यंत्रणा यात सक्रियपणे सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील, याचा मला विश्वास आहे. अभियान कालावधीत ८ लाख घरकुले पूर्ण करावयाची असल्याने १०० टक्के मंजूरी व पहिला हप्ता वितरणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ८ लाख घरकुलांसाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता करण्यात आलेली आहे. त्याकरिता मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार व इतर विभागांच्या मंत्र्यांशी माझी सकारात्मक चर्चा झाली आहे. या अभियान कालावधीत प्रत्येकाचे घराचे स्वप्न पूर्ण होईल, याची मला खात्री आहे.'

- हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री

क्षेत्रात १.२० लक्ष रुपये व नक्षलग्रस्त/डोंगराळ लाभार्थ्यांना १.३० लक्ष रुपये प्रतिलाभार्थी अर्थसाहाय्य अनुज्ञेय आहे. याकरिता लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादीबाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

शबरी, पारधी व आदिम आवास योजना

या तीनही घरकुल योजना आदिवासी विकास विभाग अर्थसाहाय्यित राज्य पुरस्कृत योजना आहे. या योजनेचा लाभ राज्यातील अनुसूचित जमाती (एसटी) साठी देय आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती संवर्गातील ३% घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव आहेत. घरकूल बांधकामाकरिता १.२० लक्ष ते १.३० लक्ष रुपयांपर्यंत प्रतिलाभार्थी अर्थसाहाय्य दिले जाते. यासाठी लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

मुक्त वसाहत योजना

विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील गरजूंसाठी राज्य शासनामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवली जात आहे. या योजनेंतर्गत शासकीय जमीन उपलब्ध होत असल्यास किमान १० कुटुंबांसाठी सामूहिक योजना राबवून त्यामध्ये रमाई आवास योजनेच्या धर्तीवर प्रतिलाभार्थी घर बांधण्यास आणि या वसाहतीला पाणीपुरवठा, वीज पुरवठा, सेफ्टिक टँक, मलनिस्सारण वाहिनीसह अंतर्गत रस्ते इत्यादी नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रतिवसाहत ४४.३१ लक्ष रुपये इतका आणि पुढील पात्र १० कुटुंबांसाठी त्याप्रमाणात लाभार्थीनिहाय निधी उपलब्ध करून देण्यात येतो. वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर लाभ देण्यात येतो.

अटल योजना (ग्रामीण)

राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) ही योजना राबवली जात आहे. २६९ चौ.फू.चटई क्षेत्र एवढे घरकुलाचे क्षेत्र असते. प्रतिघरकूल १.५० लक्ष रुपये इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. ग्रामीण भागातील नोंदीतील (सक्रिय) बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ दिला जातो.

जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना

राज्याच्या ग्रामविकास विभागांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना राबवली जाते. केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकूल योजनांतर्गत घरकुलास पात्र परंतु घरकूल बांधकामासाठी भूमिहीन लाभार्थ्यांस ५०० चौ.फूटपर्यंत जागा खरेदी करण्यासाठी अर्थसाहाय्य देण्यात येते. मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये २ किंवा ३ मजली इमारतींच्या भूखंडासाठी प्रतिलाभार्थ्यांस अर्थसाहाय्य देण्यात येते. शासकीय/संपादित व गावठाण हद्दीत येणारी जागा विनामूल्य उपलब्ध करण्यात येते.

निवासी अतिक्रमणे नियमानुकूल

ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत ग्रामीण भागातील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना राबवली जात आहे. या योजनेंतर्गत गायरान, वनजमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वास्तव्यास अयोग्य जमिनी वगळून इतर शासकीय

आदर्श घरांची निर्मिती

अभियान कालावधीत नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे पुरेशी जागा नसल्याने आतापर्यंत २५२ बहुमजली इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. १०७ गृहसंकुलांची उभारणी केली आहे. महिला बचतगटांच्या सहभागाने १८८ 'घरकूल मार्ट'ची उभारणी करण्यात आली आहे. १२०५ घरकूल लाभार्थ्यांना बँकेचे गृहकर्ज देण्यात आले आहे. अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण व्यवस्था, पथदिवे, सांडपाणी/घनकचरा व्यवस्थापन इ. मूलभूत सुविधांसह 'आदर्श घरांची' निर्मिती करण्यात आली आहे.

अपुऱ्या जागेत बहुमजली घरांची निर्मिती

जमिनीवरील अतिक्रमणे सध्या आहेत त्या ठिकाणी नियमानुकूल करणे, शक्य नसल्यास, अशा अतिक्रमाणांचे पर्यायी जागेत पुनर्वसन करणे, ज्या लाभार्थ्यांचे अतिक्रमण १ जानेवारी २०११ पूर्वीचे आहे, अशा लाभार्थ्यांचे निवासी जागा अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येत आहे.

लाभार्थ्यांना देय अनुदान त्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये डीबीटी योजनेंतर्गत वितरित करण्यात येते. त्याचप्रमाणे घरकूल अनुदानाव्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियानांतर्गत पात्र लाभार्थ्यास शौचालयासाठी १२,०००/- रुपये अनुदान व मनरेगांतर्गत ९०/९५ इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजुरी (साधारणपणे १९,०००/- रुपये) दिली जाते.

महाआवास अभियान–ग्रामीण

संपूर्ण देशात कोविड-१९ महामारीच्या संकटामुळे केंद्र व राज्याचा ध्वजांकित कार्यक्रम ग्रामीण गृहनिर्माण योजनांचीही प्रगती मंदावली होती. २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात २० नोव्हेंबर २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते महाआवास अभियान-ग्रामीणचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

या महाआवास अभियान कालावधीत ८ लाख घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार आतापर्यंत २,५५,६६८ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून २,६९,१२४ लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरित करण्यात आला आहे. अभियान कालावधीत ६८,२५१ घरकुले पूर्ण झाली असून ३,३३,७८७ घरकुले लिंटेल लेव्हलला व ९७,८३१ घरकुले प्लिंथ लेव्हलला आहेत. ती येत्या काही दिवसात पूर्ण होतील तसेच १,०८,४५२ घरकुलांची कामे आता सुरू होत आहेत.

रोजगार मिळाला, जीवनमान उंचावले

अभियान कालावधीत विविध शासकीय योजनांशी कृती संगमाद्वारे घरकूल लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून तीन कोटींहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून ५ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना शौचालयाचा लाभ दिला आहे. 'जल जीवन मिशन'मधून सुमारे ४.५० लाख कुटुंबांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला गेला. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतून २.३ लाख लाभार्थ्यांना गॅस जोडणीचा लाभ दिला आहे. सौभाग्य योजनेंतर्गत १.७० लाख विद्युत जोडणी दिली गेली. त्यासोबतच राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत २,२४,१३७ लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध झाले आहे.

घरासाठी महिलांना प्राधान्य

महिला लाभार्थींना प्राधान्याने घरकूल देण्याकरिता ८ मार्च २०२१ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यात महिला लाभार्थ्यांच्या हस्ते २,५७९ भूमिपूजन व ३,२७२ गृह प्रवेश करण्यात आले. तसेच महिला बचत गटांमार्फत चालवण्यात येणाऱ्या घरकूल मार्ट व विक्री केंद्र (को-ऑप. शॉप) लोगोचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

डेमो हाऊसेसची उभारणी

महाआवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक करण्यासाठी प्रत्येक पंचायत समिती आवारामध्ये एक याप्रमाणे राज्यात ३५१ डेमो हाऊसेसची उभारणी करण्यात येत आहे. त्यापैकी आतापर्यंत १५१ घरकुलांचे कामे प्रगतिपथावर आहेत. भविष्यात या डेमो हाऊसचा ग्रामीण जनतेला फायदा व्हावा, यासाठी त्याचा वापर विक्री केंद्र म्हणून करण्यात येणार आहे. या विक्री केंद्राच्या माध्यमातून गावपातळीवर निर्माण केलेल्या वस्तू व मालाची खरेदीविक्री केली जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या वस्तू विक्री किंवा खरेदी करण्याकरिता भटकंती करावी लागणार नाही. यामुळे त्यांचा वेळ व पैसा वाचेल व रोजगार निर्मिती होईल.

महाआवास अभियान-ग्रामीणला घरकूल लाभार्थ्यांच्या अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या अभियानामुळे गरीब, गरजू, बेघर व भूमीहीन ग्रामीण लोकांचे पक्क्या आणि सर्व मूलभूत सुविधांसह हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्यामुळे घरकूल लाभार्थ्यांमध्ये व ग्रामीण जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, नवी मुंबई

गेल्या वर्षभरात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येला आटोक्यात आणण्यात राज्य शासनाला यश आले होते, मात्र गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे रुग्ण वाढताना दिसत असून, राज्य शासनाने या साथीला आटोक्यात आणण्यासाठी विविध उपाय योजले आहेत. माझी जबाबदारी म्हणून लोकांनी काळजी घेतली पाहिजे. याबरोबरच लसीकरणाचा वेगही वाढवला आहे.

लसही घ्या अन् काळजीही

अजय जाधव

राज्यात कोरोना प्रतिबंधक लसीकरण १६ जानेवारीला सुरू झालं त्याला आता दोन महिने पूर्ण झाले. या काळात राज्यात (१९ मार्चपर्यंत) सुमारे ३९ लाख जणांना लसीकरण करण्यात आले आहे. १८ मार्च रोजीच्या लसीकरणाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र संपूर्ण देशात जवळजवळ अव्वल स्थानी आहे. आतापर्यंत दोन्ही मिळून (१८ मार्च रोजी) ३६ लाख ३ हजार ४२४ डोस देण्यात आले असून केवळ राजस्थान ३६ लाख ८४ हजार डोस देऊन महाराष्ट्रापेक्षा किंचित पुढे आहे असे दैनंदिन लसीकरण अहवालावरून दिसते.

लसीची मागणी

पंतप्रधानांसमवेतच्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत केंद्रीय आरोग्य सचिवांनी महाराष्ट्रातील लसीकरण प्रमाण चांगले आहे, असे सांगितले होते. असे असले तरी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिवसाला ३ लाख डोस देऊन लसीकरण वाढवण्यावर भर देण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या आहेत. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनीदेखील दिल्ली येथे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची भेट घेऊन लसीकरणासाठी आणखी लसीचा साठा मिळावा, अशी मागणी केली आहे.

१८ मार्चपर्यंत महाराष्ट्राने ३१ लाख ५ हजार १६९ पहिला डोस आणि ४ लाख ९८ हजार २५५ दुसरा डोस असे लसीकरण केले आहे, तर राजस्थानने ३० लाख ९२ हजार ६३५ पहिले डोस व ५ लाख ९२ हजार २०८ दुसरे डोस दिले आहेत. उत्तर प्रदेशने एकूण दोन्ही मिळून ३२ लाख ४६ हजार ३२३, पश्चिम बंगालने ३० लाख १७ हजार ३५, गुजरातने २८ लाख ५३ हजार ९५८ असे दोन्ही मिळून डोस दिले आहेत. त्यानंतरची इतर काही राज्ये पुढीलप्रमाणे आहेत : कर्नाटक १९ लाख २७ हजार २४६, केरळ १८ लाख ९१ हजार ४३१, तामिळनाडू १७ लाख १८ हजार ३१३, मध्यप्रदेश १८ लाख ६६ हजार १३८, बिहार १६ लाख ३४ हजार ६५, आंध्र प्रदेश १३ लाख १६ हजार १९२, दिल्ली ८ लाख ६७ हजार ४३३

लसीकरणाचा वेग वाढवणार

राज्य शासन लसीकरणाचा वेग वाढवत असतानाच राज्यात कोरोनाचा संसर्ग झपाट्याने वाढत आहे. हा लेख लिहीत असेपर्यंत राज्याने आतापर्यंतची एका दिवसातली सर्वोच्च संख्या गाठली ती १८ मार्चला. गेल्या वर्षी सप्टेंबर मध्ये सर्वाधिक २४ हजार ८९६ रुग्ण एक दिवसात आढळले होते. १८ मार्च २०२१ एक दिवसात २५ हजार ८३३ नवीन रुग्ण आढळून आले.

अशा परिस्थितीत लसीकरणाचा वेग वाढवण्याचे आव्हान असून येत्या तीन ते चार महिन्यात प्राधान्य गटातील सर्वांना दोन डोस द्यायचे आहेत. उन्हाळा लक्षात घेऊन सर्व लसीकरण केंद्रांवर नागरिकांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, व उन्हापासून संरक्षण होईल अशी व्यवस्था उभारावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी दिले आहेत.

दरम्यान, राज्यात १३४ खासगी रुग्णालयांना केंद्राने लसीकरणासाठी मान्यता दिली आहे. आपण दिवसेंदिवस लसीकरणाचा वेग वाढवत असून दिवसाला २ लाख ७५ हजार डोस देण्यात आले आहेत. लवकरच आपण ३ लाख डोस दर दिवशी देऊ शकू. प्राधान्य गटात १.७७ कोटी जणांना दोन डोस म्हणजे एकूण पहिल्या टप्प्यात ३.५ कोटी डोसची आवश्यकता आहे. अजून साधारणपणे ३ कोटी डोस द्यायचे आहेत. लसीकरण वेग वाढल्यानंतर ३ ते ४ महिन्यात ते पूर्ण होऊ शकेल. लसीकरणात महाराष्ट्र हा संपूर्ण देशात राजस्थाननंतर दुसऱ्या क्रमांकावर असल्याची बाब समाधानकारक आहे, मात्र दर दिवशी ३ लाख लस दिली पाहिजे या दृष्टीने नियोजन करण्याचे मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांनी विभागास सांगितले आहे.

नियमांप्रमाणेच लसीकरण

महाराष्ट्रात इतर काही राज्यांच्या तुलनेत लस विविध कारणामुळे वाया जाण्याचे प्रमाण खूप कमी आहे. काही राज्यांमध्ये २० टक्क्यांपर्यंत लस वाया जाते, मात्र महाराष्ट्रात हे प्रमाण केवळ ६

मुख्यमंत्र्यांनी घेतली कोरोनावरची लस

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जे.जे. रुग्णालय येथे जाऊन कोरोना प्रतिबंधक कोव्हॅक्सिन लस घेतली. या वेळी रश्मी ठाकरे यांनीदेखील लस घेतली. लस घेण्यात कोणतीही भीती नाही. कोरोनावरील धोका वाढतो आहे. कोरोनावरील प्रतिबंधात्मक लस आल्यामुळे या रोगापासून आपणास संरक्षण मिळणार आहे. या लसीचे काही दुष्परिणाम नसून जे पात्र आहेत त्या प्रत्येकाने ती घ्यावी. लस हे संरक्षण असले तरी सार्वजनिक ठिकाणी मास्क घालणे, हात धूत राहणे आणि सुरक्षित अंतर ठेवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे, असे मुख्यमंत्री यांनी या वेळी सांगितले.

टक्के आहे, ते देखील शून्यावर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्र सरकारने दिलेल्या नियमांप्रमाणेच लसीकरण होत आहे. राज्यात बहुतांश ठिकाणी तीव्र उन्हाळा असतो, त्याचा परिणाम कमी लसीकरणावर होऊ शकतो हे गृहीत धरून नागरिकांना दुपारच्या आत किंवा दुपारनंतर व उशिरा रात्रीपर्यंत लस देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच ज्येष्ठ व सहव्याधी रुग्ण रांगांमध्ये उभे असतात, त्यांची गैरसोय होणार नाही व कुठेही वादविवाद होणार नाहीत, याची काळजी घेण्यात येत आहे.

नव्या उत्साहाने पूर्णपणे सज्ज

गेल्या वर्षीप्रमाणे आतादेखील कोरोना संसर्गाला रोखण्यासाठी अतिशय काटेकोर पावले उचलण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोविड संसर्गाच्या अनुषंगाने पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित केलेल्या बैठकीत दिली. अधिकाधिक लसीकरण केंद्रांना परवानगी मिळावी जेणेकरून लसीकरणाचा वेग वाढवता येईल. तसेच हाफकिनला लस उत्पादन करण्याची मान्यता मिळावी, अशी विनंतीही श्री.ठाकरे यांनी केली. विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांची सूचना लगेचच उचलून धरत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात सर्व राज्यांमध्ये लस उत्पादन करू शकणाऱ्या संस्थांना पाठबळ व प्रोत्साहन देण्यात येईल असे जाहीर केले. देशातील काही राज्यातील वाढत्या कोविड संसर्गाच्या अनुषंगाने केंद्र सरकारने पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन केले होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी यासंदर्भातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष वेधले.

कोविड लसीचे हाफकिनकडून उत्पादन करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना विनंती केली. हाफकिन बायो फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना मिशन कोविड सुरक्षेंतर्गत लसीची टेक्नॉलॉजी हस्तांतरण करण्यासाठी आयसीएमआरच्या मार्गदर्शनाने परवानगी मिळावी जेणेकरून लस प्रत्यक्ष उत्पादित करता येईल किंवा फील-फिनिश (Fill Finish) बेसिसवर हाफकीनला काम करता येईल. यामधून १२६ दशलक्ष कोविड लसी हाफकिनमार्फत उत्पादित होऊ शकतात, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावर पंतप्रधानांनी देशात सर्वच राज्यांत अशा प्रकारे लस उत्पादनात पुढाकार घेणाऱ्या उद्योग व संस्थांना प्रोत्साहन देण्याचे आणि त्यांची क्षमता २४ x ७ पूर्णपणे कशी वापरता येईल ते पाहण्याचे बैठकीत जाहीर केले.

४५ वर्षांवरील सर्वांना लस देण्याची मागणी मान्य

देशातील ४५ वर्षांवरील वयोगटातील नागरिकांना कोविड प्रतिबंधक लस देण्याची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मागणी केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्य केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेतच्या नुकत्याच झालेल्या व्हीसीद्वारे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी ही मागणी केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भात निर्णय घेण्यात आल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

कोविडचा वाढता प्रादुर्भाव पाहता, सर्वत्र लसीकरणाचा वेग वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी वयोगटाची अट शिथिल करणे गरजेचे आहे. विशेषतः ४५ वर्षांवरील तरुणवर्ग कामासाठी बाहेर असतो, त्याला प्रतिबंधात्मक लस मिळणे गरजेचे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी व्हिसीमध्ये सांगितले होते. ही मागणी मान्य झाल्याने आता राज्यातील लसीकरणाला आणखी गती मिळणार आहे.

सुरुवातीच्या टप्प्यातही महाराष्ट्र लसीकरणात देशात अव्वलस्थानी होते. २२ मार्च २०२१ च्या आकडेवारीनुसार राज्यात ४५ लाख ९१ हजार ४०१ जणांचे लसीकरण करण्यात आले आहे.

पाचशे रुपयांत चाचणी

राज्यात खासगी प्रयोगशाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कोरोना चाचण्यांचे दर पुन्हा एकदा सुधारित करण्यात आले आहेत. आता कोरोना निदानासाठी करण्यात येणाऱ्या आरटीपीसीआर चाचणीसाठी ५०० रुपये आकारण्यात येणार आहेत. याबरोबरच रॅपीड अँटीजेन अँटीबॉडीज तपासणीचे दर देखील कमी करण्यात आले आहेत. अँटीजेन टेस्ट १५० रुपये करण्यात येणार आहे. यासंदर्भात आरोग्य विभागाने शासन निर्णय जाहीर केला आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव गेल्या वर्षापासून जाणवत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून खासगी प्रयोगशाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कोरोना चाचणीचे दर सातत्याने निश्चित करण्यात येत असून आतापर्यंत किमान पाच ते सहा वेळा या चाचण्यांच्या दरात सुधारणा करुन ४५०० रुपयांवरुन आता नव्या सुधारित दरानुसार केवळ ५०० रुपयांत ही चाचणी करणे खासगी प्रयोगशाळांना बंधनकारक आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

राज्य मंत्रिमंडळातील सदस्य आणि शासनाचे विभाग विविध स्तरावर महत्त्वाचे निर्णय घेत असतात. यामध्ये नवीन योजनांचा शुभारंभ, महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेणे आदी कामे निरंतर चालू राहतात, या काही महत्त्वाच्या घटना व घडामोडींची थोडक्यात माहिती...

पाऊल पडते पुढे

अभियानाचा शुभारंभ

ग्रामविकास विभागामार्फत राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये जागतिक महिला दिनापासून ते ५ जून या पर्यावरण दिनापर्यंत 'महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान' राबवण्यात येणार आहे. सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे झालेल्या ऑनलाईन कार्यक्रमात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, महिला आणि बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकुर यांच्यासह ऑनलाईन प्रणालीद्वारे जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

अमृत महोत्सव

ऑगस्ट क्रांती मैदान हे एक रणमैदान होते. स्वातंत्र्य चळवळीची आठवण देणाऱ्या या मैदानाचे नुसते नूतनीकरण न करता या मैदानात स्वातंत्र्यलढा जिवंत करणारे स्मारक करावे. इतिहास जिवंत ठेवणे व तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केले. मुंबईतील आझाद क्रांती मैदानात आयोजित भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' कार्यक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

योजनांचा शुभारंभ

कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप्सना पेटंट मिळवण्यासाठी राज्य शासनामार्फत १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य आणि गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणपत्राकरिताही दोन लाख रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य अशा दोन्ही योजनांचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या दोन्ही योजनांच्या लाभासाठी www.msins.in या संकेतस्थळावर अर्ज स्वीकारण्यात येतील.

'वस्त्रोद्योगा'ला बळ

वस्त्रोद्योग हा सर्वाधिक रोजगार देणाऱ्या उद्योगांपैकी असून हजारो कुटुंबांचा चरितार्थ चालवण्याची क्षमता या उद्योगात आहे. वस्त्रोद्योगाची ही क्षमता लक्षात घेऊन या क्षेत्राचे प्रश्न सकारात्मक पद्धतीने सोडवण्यात येतील. २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक क्षमतेच्या यंत्रमागांना वीज वापरावर ७५ पैसे प्रतियुनिट अतिरिक्त अनुदान

इलेक्ट्रिक व्हिक्टोरिया बग्गी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईत पर्यटकांसाठीच्या इलेक्ट्रिक व्हिक्टोरिया बग्गींचे अनावरण वर्षा शासकीय निवासस्थानी करण्यात आले. या वेळी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब आदी उपस्थित होते.

उबो राईड्ज या कंपनीकडून बग्गी चालवण्यात येणार आहे. एकूण ४० व्हिक्टोरिया बग्गी टप्प्या-टप्प्याने मुंबईत चालवण्यात येतील. पहिल्या टप्प्यात १२ बग्गी दक्षिण मुंबईत सुरू

करण्यात येणार आहेत. या १२ बग्गींपैकी ६ बग्गी 'गेट वे ऑफ इंडिया' येथील ताज पॅलेस हॉटेल समोरून सुटतील. तर उरलेल्या ६ बग्गी नरीमन पॉईंट येथून सुटणार आहेत. या बग्गींमधून सायंकाळी ४ वाजल्यापासून मध्यरात्री २ वाजेपर्यंत दक्षिण मुंबईची सफर करता येईल. घोडागाड्या बंद झाल्याने या व्यवसायातील सुमारे २५० बेरोजगारांना यात सामावून घेतले जाणार आहे. ही बग्गी पर्यावरणपूरक लिथियम बॅटरीवर चालणारी आहे. एकदा बॅटरी चार्ज झाल्यावर ७० ते ८० किमीपर्यंत प्रवास शक्य होणार आहे.

मुंबईनंतर जुहू, बँडस्टँड, ठाणे तलाव पाळी इत्यादी ठिकाणी या सेवेचा विस्तार तर मुंबईबाहेरील पर्यटन स्थळांवरही लवकरच ही सेवा सुरू केली जाणार आहे.

देणे, रेशीम संचालनालयातील रिक्तपदे कंत्राटी पद्धतीने भरण्यास मान्यता देण्यासह, वस्त्रोद्योगासाठी सौरऊर्जेच्या वापराची शक्यता तपासणे आदींबाबत राज्य सरकार सकारात्मक असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

अजित पवार
उपमुख्यमंत्री

राज्यातील वस्त्रोद्योगाच्या विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. वस्त्रोद्योगाशी संबंधित असलेले प्रश्न सोडवण्यासाठी शासन सकारात्मक आहे. त्याचबरोबर वस्त्रोद्योग व्यवसायावर असलेले संकट थांबवण्यासाठी सूत दरवाढीवर नियंत्रण आणण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाने केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग विभागाशी पत्रव्यवहार करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

कृषी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र

कृषी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेची चौथी फेरी महाविद्यालयस्तरावर पार पडल्यानंतर यंदाचे कृषी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र १ एप्रिलपासून सुरू होणार आहे. २०-२० आठवड्यांच्या दोन सत्रात येत्या डिसेंबरमध्ये शैक्षणिक वर्ष पूर्ण करण्यात येणार आहे. नवीन कृषी शिक्षण धोरणांच्या आखणीसाठी तसेच यापुढे उच्च शिक्षणप्रवेशाच्या पात्रतेसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) सोबतच बारावीच्या परीक्षेचे गुणप्रमाण निश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी. या समितीने एक महिन्याच्या कालमर्यादेत ३० एप्रिलपर्यंत शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

राज्यातील 'प्रवेश प्रक्रिया व आगामी कृषी शिक्षण धोरणा'संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कृषिमंत्री दादाजी भुसे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू (व्हीसीद्वारे) तसेच प्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा

वाढत्या शहरीकरणामुळे घनकचरा व्यवस्थापनाची समस्या जटिल होत चालली आहे. महाराष्ट्रातील नगर परिषदा व नगर पंचायतींकडे घनकचरा व्यवस्थापनाकरिता स्वतःच्या मालकीची जागा नसल्याने अनेक शहरांचे विकास आराखडे रखडले आहेत. अशा शहरांत घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

राज्यातील अनेक शहरांत घनकचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनावरून स्थानिक प्रशासन व गावकरी यांच्यात अनेकदा गंभीर वादही उद्‌भवले आहेत. काही नगरपालिकांकडे जागा उपलब्ध नाही. या सर्वांचा परिणाम घनकचरा व्यवस्थापनावर होत आहे. या समस्या राज्यातील अनेक नगरपालिका-नगरपरिषदांना भेडसावत आहेत. परिणामी या नगरपालिकांच्या विकासासाठी शासनाचा निधी मिळवण्यातही अडचणी निर्माण होत होत्या. राज्यातील १५० हून जास्त नगरपरिषद-नगरपालिकांनी महासभेचा ठराव घेऊन जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवत शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती केली होती. याचा विचार करून शासनाने आता घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. या निर्णयामुळे नगरपालिका व नगरपरिषदांची मोठी समस्या दूर होण्यास मदत होणार आहे, असे श्री. थोरात यांनी सांगितले.

कौशल्य विकास रथ

केंद्र आणि राज्य शासनामार्फत कौशल्य विकासासाठी कोणकोणते अभ्यासक्रम, योजना राबवल्या जातात, याचा लाभ मिळवण्यासाठी कोठे संपर्क साधावा, महास्वयंम संकेतस्थळाद्वारे रोजगार कसा मिळवावा, अशा विविध प्रश्नांसंदर्भात माहिती देण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील ३५५ तालुक्यांमध्ये कौशल्य विकास रथाद्वारे जनजागृती केली जाणार आहे. याशिवाय कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुणांचे समुपदेशनही यामार्फत केले जाणार असून यासाठी तयार करण्यात आलेल्या सात कौशल्य विकासरथांना झेंडी दाखवून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी या मोहीमेचा शुभारंभ केला. सोच मल्टिपर्पज सोसायटीमार्फत आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या सहयोगातून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या वेळी रथांच्या शुभारंभाबरोबरच 'स्कील टु लाईव्हलीहूड कार्निव्हल' या उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला.

नवाब मलिक
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री

वाईस इनक्युबेशन सेंटर

एसएनडीटी महिला विद्यापीठात सुरू होणारे देशातील पहिले वाईस ईक्यु इनक्युबेशन सेंटर हे राज्यातील महिला उद्योजकांसाठी अभिनव व्यासपीठ ठरणार आहे. जागतिक पातळीवरील महिला उद्योजक तयार करण्याचे कार्य या इनक्यूबेशन सेंटरद्वारे होईल, असा विश्वास कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी व्यक्त

बेरोजगारांना रोजगार

कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली असताना कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांद्वारे राज्यात जानेवारी आणि फेब्रुवारी २०२१ मध्ये ३३ हजार ७९९ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला असल्याची माहिती मंत्री कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाचे मंत्री नवाब मलिक यांनी दिली.

महास्वयंम वेबपोर्टल, ऑनलाईन

रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरी इच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो.

मागील वर्षी २०२० मध्ये अशा विविध उपक्रमांमधून राज्यात एक लाख ९९ हजार ४८६ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात यश आले, असे त्यांनी सांगितले. चालू वर्षात जानेवारी महिन्यात २० हजार ७१३ बेरोजगारांना तर फेब्रुवारी महिन्यात १३ हजार ०८६ बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला. बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे

केला. दूरदृश्य प्रणालीद्वारे वाईस इनक्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. वर्कस्पेस उपलब्धता, हॅकॅथॉन, एक्सलेटर कार्य, स्टार्टअपना मार्गदर्शन, संशोधन सहाय, बौद्धिक संपदा हक्क सहाय, गुणवत्ता चाचणी, उद्योजकता क्लब, मेटॉरिंग, सीड फर्डिंग यांसारख्या विविध सुविधा महिलांना या सेंटरद्वारे प्राप्त होणार आहेत.

पूर्वकौशल्यज्ञान मान्यता योजना

राज्यातील विविध कौशल्य धारण करणारे कारागीर, कामगार आदी घटकांना आता कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत प्रमाणित केले जाणार आहे. विशेषत: असंघटित क्षेत्रातील कारागीर, कामगार आदी कुशल घटकांना याचा लाभ होणार आहे. यासाठी राज्य शासनामार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत पूर्वकौशल्यज्ञान मान्यता योजना (Recognition of Prior Learning - RPL) राबवण्यास मंजुरी देण्यात आल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दिली. या योजनेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करणारा शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. यासाठी कौशल्य विकास सोसायटीच्या https://kaushalya.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी प्रक्रियाही लवकरच सुरू केली जाणार आहे.

व्यावसायिक शिक्षण समाविष्ट करण्याबाबत समिती

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला नवीन स्वरूप देण्याबद्दल नमूद केले आहे. त्याप्रमाणे या दशकात सर्व प्रशालांमध्ये व उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावयाचे असून त्याकरिता कौशल्यविषयक उणिवांचे विश्लेषण व स्थानिक संधीचे मापन या आधारे व्यावसायिक शिक्षणाची प्राधान्य क्षेत्रे निवडण्याची गरज आहे. यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ व वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली असून, समितीने यासंदर्भात सविस्तर अभ्यास करून पुढील तीन महिन्यात शासनास अहवाल सादर करावा, असे सांगण्यात आले असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दिली.

समितीमध्ये १५ तज्ज्ञ तथा अधिकाऱ्यांचा समावेश असून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा हे समितीच्या अध्यक्षस्थानी आहेत. राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण २०१५ मधील तरतुदी विचारात घेऊन तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील Re-imagining Vocational Education च्या अनुषंगाने अभ्यास करण्याकरिता व पुढील रूपरेषा ठरवण्याकरिता ही समिती कामकाज करेल. समितीच्या गठणासंदर्भातील शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे.

बांधकामांना परवानगीची गरज नाही

राज्यातील ग्रामीण भागातील सुमारे ३,२०० स्क्वेअर फुटापर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना आता नगररचनाकाराच्या परवानगीची गरज लागणार नाही, असे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

हसन मुश्रीफ
ग्रामविकास मंत्री

सुमारे १,६०० चौरस फुटापर्यंतच्या (१५० चौरस मीटर) भूखंडावरील बांधकामासाठी ग्रामस्थास मालकी कागदपत्र, लेआऊट प्लॅन/मोजणी नकाशा, बिल्डिंग प्लॅन आणि हे सर्व प्लॅन युनिफाईड डीसीआरनुसार असल्याचे परवानाधारक अभियंत्याचे

प्रमाणपत्र आदी कागदपत्रे ग्रामपंचायतीस फक्त सादर करावी लागणार असून आवश्यक विकास शुल्क भरावे लागेल. ही पूर्तता केल्यानंतर ग्रामस्थास थेट बांधकाम सुरू करता येईल. या मर्यादेतील बांधकामास ग्रामपंचायतीच्या बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राची आवश्यकता लागणार नाही. तर १,६०० ते ३,२०० चौरस फुटापर्यंतच्या (३०० चौरस मीटर) भूखंडावरील बांधकामासाठी ग्रामस्थाने युनिफाईड डिसीआरनुसार बांधकामाची परवानगी मागण्यासाठी ग्रामपंचायतीकडे परवानाधारक अभियंत्याद्वारे प्रमाणित आणि साक्षांकित आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायत संबंधित ग्रामस्थास किती विकास शुल्क भरायचे याची माहिती १० दिवसात कळवेल. ग्रामस्थाने ते शुल्क भरल्यानंतर ग्रामपंचायत १० दिवसात कोणत्याही छाननीशिवाय बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देईल. ग्रामपंचायत पातळीवर त्याची अडवणूक होऊ नये, यासाठी या पातळीवरील प्रक्रियाही खूप सोपी करण्यात आली आहे. शासनाच्या नगरविकास विभागाने युनिफाईड डीसीआर (एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली) जाहीर केली असून त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भातील शासन पत्र ग्रामविकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आले असून, सर्व जिल्हा परिषदांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत.

यशवंत पंचायतराज अभियान

यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत कोल्हापूर जिल्हा परिषदेने राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट जिल्हा परिषदेचा प्रथम पुरस्कार पटकावला असून यवतमाळ जिल्हा परिषदेने द्वितीय आणि सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली.

राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समितीमध्ये प्रथम क्रमांक कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) पंचायत समितीने पटकावला. कागल (जि. कोल्हापूर) पंचायत समितीने द्वितीय तर भंडारा (जि. भंडारा) पंचायत समितीने तृतीय क्रमांक पटकावला. यशवंत पंचायत राज अभियान २०२०-२१ (मूल्यांकन वर्ष २०१९-२०) अंतर्गत हे पुरस्कार आहेत.

राज्यस्तरीय पडताळणी समितीने पुरस्कारांसाठी केलेल्या गुणांकनानुसार ३०० गुणांपैकी राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट जिल्हा परिषदेसाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेला २७६.३४, यवतमाळ जिल्हा परिषदेला २७४.५७, तर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला २६४.६२ गुण प्राप्त झाले. तसेच राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समितीसाठी ३०० गुणांपैकी कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) पंचायत समितीला २९४.१६, कागल (जि. कोल्हापूर) पंचायत समितीला २८७.३०, तर भंडारा (जि. भंडारा) पंचायत समितीला २७९.४५ गुण प्राप्त झाले.

यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत विभागस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समित्यांच्या पुरस्कारांचीही घोषणा केली. याअंतर्गत कोकण विभागात कुडाळ (जि. सिंधुदुर्ग), मालवण (जि. सिंधुदुर्ग), सुधागड-पाली (जि. रायगड), नाशिक विभागात राहाता (जि. अहमदनगर), नाशिक (जि. नाशिक), कळवण (जि. नाशिक), पुणे विभागात कागल (जि. कोल्हापूर), गडहिंग्लज (जि. कोल्हापूर), माढा/कुर्डुवाडी (जि. सोलापूर), औरंगाबाद विभागात लातूर (जि. लातूर), नांदेड (जि. नांदेड), शिरूर अनंतपाळ (जि. लातूर), अमरावती विभागात अचलपूर (जि. अमरावती), दर्यापूर (जि. अमरावती), राळेगाव (जि. यवतमाळ), तर नागपूर विभागात भंडारा (जि. भंडारा), पोभुर्णा (जि. चंद्रपूर), कामठी (जि. नागपूर) या पंचायत समित्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांचे पुरस्कार पटकावले.

'शिक्षक प्रेरणा कार्यशाळा'

ग्लोबल टिचर पुरस्कार विजेते शिक्षक रणजितसिंह डिसले यांच्या माध्यमातून राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये 'शिक्षक प्रेरणा कार्यशाळा' उपक्रम राबवण्यात येणार आहे. श्री. डिसले यांच्या कार्यातून सर्व शिक्षकांना प्रेरणा मिळावी. तसेच शिक्षणातील आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वांना परिचय व्हावा, यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जाऊन श्री. डिसले या कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या माध्यमातून शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल होण्यास मदत होईल, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

सरपंच सभा

ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या सोडवणे तसेच गावांमधील रखडलेली कामे जलदगतीने मार्गी लावण्याच्या अनुषंगाने आता राज्यात तालुकास्तरावर दर तीन महिन्यांनी सरपंच सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी या सभा घेऊन सरपंचांकडून गावांमधील जनतेचे प्रश्न, समस्या ऐकून त्या मार्गी लावण्याबाबत

कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

ग्रामसभा पूर्ववत

सोशल डिस्टन्सिंग आणि कोविड-१९च्या अनुषंगाने निर्गमित विविध मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना पूर्वीप्रमाणे ग्रामसभांचे आयोजन करण्यास पुन्हा संमती देण्यात येत आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी दिली. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने जानेवारीमध्ये ग्रामसभा सुरू करण्यास संमती देण्यात आली होती. पण, दरम्यानच्या काळात कोरोना विषाणुचा नवा स्ट्रेन (प्रकार) आढळल्याने दक्षता म्हणून ग्रामसभांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. तथापि, ग्रामसभेच्या मंजुरीअभावी वार्षिक विकास आराखडे, शासनाच्या विविध योजनांतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांची यादी, पुनर्वसित गावांचे प्रस्ताव, गौण खनिज परवानगी, थेट सरपंच विरुद्धातील अविश्वास प्रस्ताव, चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगाचा निधी खर्च करणे इत्यादी बाबी प्रलंबित राहिलेल्या आहेत. तसेच, कोरोना विषाणूचा प्रादुर्भावदेखील आता कमी झाला असून जनजीवन पूर्ववत होत आहे. या बाबी विचारात घेऊन कोविड-१९ च्या अनुषंगाने निर्गमित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अटीस अधीन पूर्वीप्रमाणे ग्रामसभांचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे, असे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण

राज्यामध्ये नुकत्याच जवळपास १४ हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या असून यातून निवडून आलेले सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य यांना ग्रामविकासविषयक विविध बाबींच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. राज्यात एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रथमच झाल्या आहेत. त्यामुळे सदस्यांची संख्या जास्त असल्याने टप्प्याटप्प्याने ही प्रशिक्षणे घेतली जाणार असून पहिल्या टप्प्यात ७७ हजार ५०० जणांना प्रशिक्षण दिले जाईल, असे श्री.मुश्रीफ यांनी सांगितले. यशदा, पंचायतराज प्रशिक्षण केंद्रे व पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी यांच्या माध्यमांतून राज्यात विविध भागात ही प्रशिक्षणे घेण्यात येणार आहेत.

आपत्तिरोधक घरकुलांची निर्मिती

राज्यातील ग्रामीण भागातील घरकुल योजनांना चालना देण्यासाठी ग्रामविकास विभाग आणि आयआयटी (मुंबई), रिलायन्स फाऊंडेशन आणि हुडको यांच्यामध्ये भागीदारी करण्यात आल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली. राज्यात स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार घरकूल डिझाईन करणे, कमी खर्चातील पण दर्जेदार अशा घरकुलाचे तंत्रज्ञान विकसित करणे तसेच भूकंप, वादळ आदी नैसर्गिक आपत्तींचा सामना करू शकणाऱ्या घरकुलांची निर्मिती करण्यासाठी आयआयटी (मुंबई) यांची मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

विक्रमी वीज निर्मिती

देशातील एक अग्रगण्य वीजनिर्मिती कंपनी म्हणून नावलौकिक असलेल्या महानिर्मितीने १०,४४५ मेगावॅट वीजनिर्मिती साध्य करून औष्णिक वीजनिर्मितीमध्ये एक नवा इतिहास रचला आहे. वीज निर्मितीमध्ये कोळसा व्यवस्थापन सर्वात महत्त्वाचे असते. ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी राज्यातील औष्णिक वीज केंद्राची उत्पादन क्षमता अर्थात प्लांट लोड फॅक्टर वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले. राज्य वीज नियामक आयोगाने वीज केंद्रांची उत्पादन क्षमता किमान ८५ टक्के असायला हवी असे बंधन घातले आहे. ही क्षमता किमान ९५ टक्के गाठण्याचे लक्ष्य महानिर्मितीला आखून दिले. त्यानुसार कालबद्ध कार्यक्रम आखून त्यांनी वेळोवेळी आढावा घेतला. गुणवत्तापूर्ण कोळसा न देणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देऊन कमी गुणवत्तेच्या कोळशामुळे वीज निर्मिती क्षमतेतील घट थांबवण्याचा प्रयत्न केला.

डॉ. नितीन राऊत
ऊर्जा मंत्री

मार्च महिन्यात राज्य सरकारच्या महानिर्मिती कंपनीची कामगिरी अधिकाधिक उंचावत आहे. ५ मार्च रोजी राज्यातील ९औष्णिक वीज निर्मिती केंद्रांनी किमान ९० टक्के वा त्याहून अधिक प्लांट लोड फॅक्टर प्राप्त करून विक्रम रचला. यापूर्वीचा २० मे २०१९ रोजीचा १०,०९८ मेगावॅटचा उच्चांक मोडताना

महानिर्मितीने आधी १०,२७५ मेगावॅट वीजनिर्मिती साध्य केली व त्यात सातत्य राखत स्वतःचाच विक्रम मोडून १०,४४५ मेगावॅट वीजनिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यामध्ये औष्णिक वीज निर्मितीद्वारे ७,९९१ मेगा वॅट, वायू वीज निर्मिती केंद्राद्वारे २६४ मेगा वॅट तर जल विद्युत केंद्राद्वारे २१३८ मेगा वॅट आणि सौर ऊर्जा प्रकल्पामधून ५० मेगा वॅटइतकी वीज निर्मिती करण्यात आली आहे. या वेळी महावितरणची विजेची मागणी २२,१२९ मेगा वॅट होती. तसेच राज्याची एकूण वीजनिर्मिती १६,४२९ मेगावॅट इतकी होती. १०,००० पेक्षा जास्त वीजनिर्मितीचा आकडा पुन्हा गाठण्याची ही केवळ तिसरी वेळ आहे.

उमेदवारांना दिलासा

महावितरण कंपनीद्वारे २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या अनुषंगाने विद्युत साहाय्यक, उपकेंद्र साहाय्यक व पदवीधर शिकाऊ अभियंता-स्थापत्य, पदविकाधारक शिकाऊ अभियंता-वितरण/स्थापत्य या पदांच्या भरतीसाठी सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे (ईडब्ल्यूएस) लाभ घेण्याचा पर्याय ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या पुढाकारामुळे शासनाद्वारे उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने महावितरणला कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सुवर्ण पारितोषिक

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ७१ व्या ऑनलाईन शिखर संमेलनात स्कॉच पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यामध्ये 'कार्पोरेट एक्सलन्स' अंतर्गत 'डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर' यासाठी महापारेषणला सुवर्ण पारितोषिकाची घोषणा झाली. महापारेषण कंपनीने जॉईंट व्हेंचर उपक्रमाद्वारे अतिउच्च दाब वाहिन्यांच्या मनोऱ्यावर ओपीजीडब्ल्यू (ऑप्टिकल ग्राउंड वायर) नेटवर्क प्रस्थापित केले आहे. या पारितोषिकाबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

ऑफलाईन पद्धतीने परीक्षा

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरक्षित वातावरणात घेण्याबरोबर व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये, यासाठी शासन प्रयत्न करत आहे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन राज्यभर समान स्तरावर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी सज्ज होताना ('वी कॅन डू ईट ऑफलाईन एक्झाम') ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देण्यासंदर्भातील मोहीम राज्यभर राबवण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे योग्य आहे. यासाठी शिक्षक प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी प्रवृत्त करावे. सर्वांनी एकत्र येऊन शासनासोबत करण्यात येणारी मोहीम राबवून विद्यार्थ्यांची सकारात्मक मानसिकता तयार करून ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे. विद्यार्थ्यांची सुरक्षा, शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि परीक्षेच्या पूर्वतयारीस वेळ मिळावा या सर्व बाबींचा विचार करून परीक्षेचे वेळापत्रक ठरवण्यात आले आहे. वेळापत्रकाबाबत आणखी काही सूचना असतील तर त्या सादर कराव्यात. त्याबाबत सल्लागार समितीशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. प्रात्यक्षिक परीक्षा, प्रयोगवही सादर करणे याबाबत संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी समान निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मंत्री श्रीमती गायकवाड यांनी दिली.

सह्याद्री वाहिनीवर शासनामार्फत व्याख्यानमाला सुरू असून, परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी महत्त्वाचे प्रश्न, स्वाध्याय यासाठीही कार्यक्रम घेतले जातील. विद्यार्थ्यांना सामान्यतः पडणाऱ्या प्रश्नांबाबत संकेतस्थळावर लवकरच 'एफएक्यु' (FAQ) देण्यात येणार आहेत. ज्या निवासी शाळा बंद आहेत, त्या शाळेतील फक्त १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची आणि परीक्षा देण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

त्रिपक्षीय करार बंधनकारक

जितेंद्र आव्हाड
गृहनिर्माण मंत्री

म्हाडाअंतर्गत वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी म्हाडा, संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

मुंबईमध्ये म्हाडाच्या ५६ वसाहती आहेत. त्याचप्रमाणे राज्यात अन्यत्र सुद्धा म्हाडाच्या मालकीच्या इमारती आहेत. या वसाहतींमधील इमारतींचा पुनर्विकास, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था त्यांच्या स्तरावर विकासकाची नियुक्ती करून करतात. या भूखंडाची मालकी म्हाडाची आहे. तथापि, अशा भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून/संबंधित विकासकाकडून प्राप्त झाल्यानंतर केवळ ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही म्हाडाकडून करण्यात येते. या पुनर्विकास प्रक्रियेवर म्हाडाचे कोणतेही नियंत्रण नव्हते. पुनर्विकासासंदर्भात केवळ संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये द्विपक्षीय करार झालेला असल्याने त्यामधील अटी व शर्ती यांचे उल्लंघन झाल्यास म्हाडाकडून

कोणताही हस्तक्षेप करता येत नव्हता. म्हाडातील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाचे प्रकल्प वर्षानुवर्षे रखडतात. त्याचप्रमाणे संबंधित रहिवाशांच्या भाड्यासंदर्भातील तसेच अन्य तक्रारींचे निवारणही बऱ्याचदा योग्य रीतीने होत नाही. म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ च्या कलम १६४ (५) मधील तरतुदीनुसार म्हाडा, संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे पुनर्विकासास चालना मिळेल, अशी माहितीही गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

म्हाडाच्या सदनिकांचे वाटप

पालघर पोलीस दलातील १०९ कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे विरार बोळींज येथे उभारलेल्या गृहनिर्माण योजनेतील इमारत क्रमांक १० मधील सदनिकाचे वाटप गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे विरार बोळींज येथे सुमारे ११९ एकर जमिनीवर गृहनिर्माण योजना विकसित करण्यात आली आहे. या योजनेतील टप्पा - ३ मधील इमारत क्रमांक १० मधील १८६ सदनिका पालघर पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी यांना वितरित करण्यास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने मान्यता देण्यात आली आहे. १८६ सदनिकांसाठी पालघर पोलीस दलातील कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्याकरिता मार्च २०१९ मध्ये जाहिरात देण्यात आली. त्यानुसार पालघर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून १०९ अर्जदारांच्या नावांची यादी पाठवण्यात आली. या १०९ कर्मचाऱ्यांना इमारतीतील कितव्या मजल्यावर कोणत्या क्रमांकाची सदनिका वितरित करावयाची, याची निश्चिती व त्यांचे वितरण करण्यात आले. पालघर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून पोलीस कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी प्राप्त झाल्यास उर्वरित ७७ सदनिकांचेही वितरण करण्यात येणार आहे.

पुनर्विकास प्रकल्प

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे दक्षिण मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ येथे उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमध्ये म्हाडा संक्रमण गाळ्यात स्थलांतरित झालेल्या २७२ पात्र भाडेकरूंना वितरित करावयाच्या पुनर्वसन सदनिका संगणकीय प्रणालीद्वारे निश्चितीचा शुभारंभ गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आला.

स्मारक बांधकामाला गती

संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ७५०व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असताना नामदेव महाराजांचे जन्मगाव असलेल्या नरसी नामदेव येथे त्यांचे स्मारक बांधण्याच्या कामाला गती देण्यात यावी, असे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

संत नामदेव महाराजांची ७५० वी जयंती साजरी करण्यासंदर्भातील आढावा बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली.

अमित देशमुख
वैद्यकीय शिक्षण,
सांस्कृतिक कार्य मंत्री

संत नामदेव महाराजांचे नाव महाराष्ट्राच्या संत परंपरेत अत्यंत आदराने घेतले जाते. त्यामुळे संत नामदेव महाराजांची ७५० वी जयंती राज्यात साजरी करत असताना त्यांचे स्मारक होणे आवश्यक असून या कामाला गती देण्यात यावी. याशिवाय वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये संत नामदेव महाराजांच्या चरित्रावरील नाटके, भक्ती महोत्सव, अभंगवाणी अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असेल. विशेष म्हणजे हे कार्यक्रम मुंबईसह पंढरपूर, देहू, पुणे या ठिकाणीही आयोजित करण्यात यावेत.

कोविड लस निर्मिती

हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कोविड लसीचे उत्पादन करण्यात येणार असून त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्लांट मुंबईत सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी दिली.

कोविड लसीच्या उत्पादनासाठी लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेने पुढे यावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अलीकडे केले होते. हाफकिनमार्फत सुरू करण्यात येणाऱ्या लसीचे उत्पादन दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे.

भारतरत्न पं.भीमसेन जोशी जन्मशताब्दी वर्ष

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षाला सुरुवात झाली असून वर्षभर विविध कार्यक्रमांद्वारे त्यांना मानवंदना देण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिली.

स्वरभास्कर पं.भीमसेन जोशी हे भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अलौकिक कलाकार होते. त्यांच्या सुरेल गायकीने जगभरातील रसिकांवर मोहिनी घातली. त्यांनी त्यांच्या गुरूंच्या सन्मानार्थ सवाई गंधर्व महोत्सवाच्या आयोजनातून एक उत्तम पायंडा पाडला. त्यांचे अनेक शिष्य, चाहते जगभरात असून पंडितजींच्या शास्त्रीय संगीत क्षेत्रातील कार्याचा गौरव जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनाच्या वतीने मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि त्यांच्या जन्मस्थळी अशा ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. यात शास्त्रीय गायन, वादन व नृत्य आविष्कार,

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचे पुरस्कार

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत भौतिक तपासणी आणि तक्रार निवारणाच्या उल्लेखनीय कार्यासाठी केंद्रीय कृषी व कृषी कल्याण मंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांनाही प्रथम क्रमाकांच्या पुरस्काराने गौरवण्यात आले.

किराणा घराणा परंपरा गायन, शास्त्रीय गायन, वादन व नृत्य जुगलबंदी, राज्यातील १० अकृषिक विद्यापीठातील युवा गायक, वादक, नृत्य कलाकारांचा कार्यक्रम, अभंगवाणी अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असेल. राज्य शासनाच्या वतीने या महान गायकाच्या सांगीतिक योगदानाचा जागर या निमित्ताने केला जाईल, असेही श्री. देशमुख यांनी सांगितले.

प्राधान्याने प्रवेश

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी संस्थास्तरीय कोट्यातील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या रिक्त राहिलेल्या जागांवरील संस्थास्तरावर होणाऱ्या प्रवेशामध्ये दहशतवादी हल्ल्यात वीरमरण आलेल्या पोलिसांच्या पाल्यांना तसेच राज्याचा रहिवासी असलेल्या आणि दहशतवादी हल्ल्यात वीरमरण आलेल्या लष्करी जवान/ निमलष्करी जवान यांच्या पाल्यांना प्रतिअभ्यासक्रम जास्तीत जास्त एक जागेवर प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या २७ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार मुंबई येथे आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांच्या व राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मोफत शिक्षणाची सुविधा प्रदान करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. यानुसार पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची तसेच इतर शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येते. देशरक्षणासाठी शहीद झालेल्या शूर व्यक्तींच्या कुटुंबाविषयी सहानुभूती व्यक्त करताना त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार तसेच योग्य दर्जाचे शिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्यामुळे अशा शहिदांच्या पाल्यांना तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी खासगी विनाअनुदानित संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांमध्ये प्राधान्य देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेल्या सीमेवर कार्यरत दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या लष्करी अथवा निमलष्करी जवानांच्या पाल्यांनादेखील या निर्णयाचा फायदा होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व त्यानंतर होणाऱ्या प्रवेशाकरिता हे नियम लागू राहणार आहेत.

माजी सैनिक सन्मान योजना

दादाजी भुसे
कृषी मंत्री

महाराष्ट्रात अधिवास असणाऱ्या संरक्षण दलातील सर्व माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा पत्नींना ग्रामविकास आणि नगरविकास विभागामार्फत मालमत्ता करातून सूट देणारी मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना राज्यात राबवली जात आहे. या योजनेची अंमलबजावणी परिणामकारकपणे करावी, असे निर्देश माजी सैनिक कल्याण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. या योजनेसंदर्भात आढावा घेण्यासाठी श्री.भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

या योजनेची अंमलबजावणी नगरविकास आणि ग्रामविकास विभागाने प्रभावीपणे करून देशासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या सैनिकांप्रति आदर व्यक्त करावा. क्षेत्रीयस्तरावर योजनेच्या अंमलबजावणीकरिता दोन्ही विभागांनी परिपत्रक तातडीने निर्गमित करावे. ग्रामविकास विभागामार्फत सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना या संदर्भात पत्र पाठवून योजनेचा लाभ देण्याबाबत सूचना निर्गमित कराव्यात. विभागीय आयुक्तांच्या बैठकीतदेखील या योजनेचा आढावा घ्यावा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनीदेखील या योजनेसाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश श्री.भुसे यांनी दिले.

ग्राम कृषी संजीवनी विकास दर्शिका

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांची गावातील सद्य:स्थिती आता एका क्लिकवर पाहता येणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची माहिती सर्वांसाठी पारदर्शकपणे खुली झाली आहे. प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ग्राम कृषी संजीवनी विकास दर्शिका तयार करण्यात आली असून, कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन करण्यात आले.

पोक्रा अंतर्गत राज्यातील १५ जिल्ह्यांतील ५१४२ गावांमध्ये राबवण्यात येणाऱ्या सर्व घटकांची माहिती या ग्राम कृषी संजीवनी विकास दर्शिकेत देण्यात आली आहे. महा पोक्रा संकेतस्थळावर खास एक विभाग विकसित करण्यात आला आहे. जिल्हा, तालुका व त्यातील गाव निवडून गावाची संपूर्ण माहिती येथे उपलब्ध करण्यात आली आहे. https://mahapocra.gov.in/village-profile या लिंकवर जाऊन कोणीही कोणत्याही गावाची माहिती

पाहता येऊ शकते.

भूजल जागृती प्रदर्शनी कक्ष

गुलाबराव पाटील
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

पुणे येथे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या मुख्यालयातील (भूजल भवन येथील) नूतनीकृत भूजल जागृती प्रदर्शनी कक्षाचे उद्घाटन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

भूजल जागृती प्रदर्शनीमध्ये भूजलाची उपलब्धता व हालचाल, भूजल उपश्यांच्या विविध उपाययोजना, भूजल पुनर्भरणाच्या विविध उपाययोजना, भूस्तर व जलधारक संरचना इत्यादी दर्शवणारे विविध मॉडेल्स प्रदर्शित केलेले आहेत. हे प्रदर्शन भूजल विज्ञान आणि भूजल दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थी आणि शासकीय कर्मचाऱ्यांनाही भूजलाचा अभ्यास करताना निश्चितच लाभ होणार आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

पाणी तपासणी सुविधा

'जल जीवन मिशन' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत पाणी गुणवत्ता, संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील ग्रामीण जनतेला पुरवण्यात येणाऱ्या पाण्याच्या दर्जाबाबत विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी व जनजागृतीसाठी सार्वजनिक पाणी तपासणी मोहिमेव्यतिरिक्त खासगी नमुने तपासणीला प्रोत्साहन देण्यासाठी माफक दरात पाणी तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने घेतला आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पाणी तपासणीच्या दरामध्ये सुधारणा करणे अपेक्षित होते. प्रयोगशाळेत खासगी पाणी नमुने तपासणीसाठी विहित केलेले दर ८०० रुपये ऐवजी ६०० रुपये प्रमाणे निर्धारित करण्यात आले आहेत. प्रयोगशाळेमध्ये खासगी पाणी नमुने तपासणीचा खर्च, त्याकरिता लागणारा वेळ यामुळे खासगी पाणी नमुने तपासण्यासाठी सामान्य नागरिकांचा जास्त प्रतिसाद मिळत नव्हता. राज्यातील ग्रामीण जनतेला खासगी पाणी नमुने फिल्ड टेस्ट किट्सच्या मदतीने तपासणी करून देण्यासाठी रासायनिक व जैविक घटकांसाठी प्रत्येकी ५ रुपये इतक्या माफक दरात राज्यातील सर्व विभागीय, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सिंचन विहिरींचा लाभ

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन सुविधेसाठी वैयक्तिक सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सुधारित सूचनांचा शासन निर्णय निर्गमित केल्याने आता राज्यातील शेतकऱ्यांना वैयक्तिक सिंचन विहिरींचा लाभ मिळणे सुलभ होणार असल्याची माहिती रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे यांनी दिली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात आले होते. ते अधिकार पुन्हा सह कार्यक्रम अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील मजुरांसोबतच शेतकऱ्यांना देखील लाभ होणार असून राज्यातील जवळपास २८, ५०० ग्रामपंचायतींमधील शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. या योजनेची अंमलबजावणी तत्काळ होणार असल्याचे श्री. भुमरे यांनी या वेळी सांगितले.

संदिपानराव भुमरे
रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री

शरद पवार ग्रामसमृद्धी योजना

ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शरद पवार ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे, कुक्कुटपालन शेड बांधणे, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग या कामांना सर्वोत्तम प्राधान्यक्रमाने सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबवण्यात येणार असून शरद पवार ग्रामसमृद्धी योजनांना राज्य योजना म्हणून राबवण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे रोहयो आणि फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे यांनी सांगितले.

मॅक्सी कॅब धोरणासंदर्भात समिती

प्रवाशांची मागणी, नागरिकांची सुविधा आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या फेऱ्या या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी दिली.

ॲड. अनिल परब
परिवहन मंत्री

मंत्रालयात अनधिकृत प्रवासी वाहतुकदारांना अधिकृत दर्जा (मॅक्सी कॅब धोरण) संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. श्री. परब म्हणाले, या समितीने वाढती वाहतूक सुविधा, प्रवाशांची सोय या सर्व बाबींचा अभ्यास करून दोन महिन्यात अहवाल शासनाकडे सादर करावा.

यंत्रमागधारकांना दिलासा

राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणानुसार वस्त्रोद्योग प्रकल्पांना देण्यात येणाऱ्या वीज दर सवलतीसाठी ऑनलाईन नोंदणीची अट २७ अश्वशक्तीपेक्षा (हॉर्सपॉवर) कमी जोडभार असलेल्या यंत्रमागधारकांसाठी शिथिल करण्यात आली आहे. अशा यंत्रमागधारकांना ऑनलाईनबरोबरच ऑफलाइन पद्धतीनेही नोंदणी करण्याचा पर्याय देण्यात आला आहे, अशी माहिती वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख यांनी दिली.

काही दिवसांपूर्वी साध्या यंत्रमागधारक संघटनेच्या शिष्टमंडळाने ही मागणी केली होती. वस्त्रोद्योग धोरणानुसार वीजदरातील सवलतीसाठी वस्त्रोद्योग प्रकल्पांना वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक होते. मात्र, २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागधारकांना ऑनलाईन नोंदणी करताना अडचणी येत असल्यामुळे ऑफलाईन स्थळप्रतीत नोंदणीसाठी अर्ज करण्याची मागणी यंत्रमागधारकांनी केली होती. ही मागणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेची अट शिथिल केली असून २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असणाऱ्या यंत्रमागधारकांना वीजदर सवलतीसाठी ऑनलाईनबरोबरच स्थळप्रतीत (ऑफलाईन) वस्त्रोद्योग आयुक्तांकडे ऑफलाईन अर्ज करता येईल. यासंबंधीचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे श्री. शेख यांनी या वेळी सांगितले.

अस्लम शेख
वस्त्रोद्योग मंत्री

नौकानयनविषयक प्रशिक्षण

राज्यातील नौकानयन क्षेत्रातील मनुष्यबळास योग्य प्रशिक्षण, कौशल्य वृद्धिसंदर्भात साहाय्य करण्यासाठी बंदरे विकास मंत्री अस्लम शेख यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र सागरी मंडळ (मेरिटाइम बोर्ड) आणि चेन्नईमधील भारतीय सागरी (मेरिटाइम) विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करण्यात आला. महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी आणि भारतीय सागरी विद्यापीठाच्या संचालक कमोडोअर राजीव बन्सल यांनी या करारावर स्वाक्षरी केल्या. या करारामुळे राज्यातील इनलँड वेसल्सवर तैनात होणाऱ्या सुमारे ७ हजार तरुणांना नौकानयन विषयक कौशल्य व प्रशिक्षण मिळणार आहे.

'वुलू' ॲपचे लोकार्पण

महिलांसाठी स्वच्छ, सुरक्षित प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'वुलू' ॲपचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

महिला व बालविकास मंत्री ॲड. ठाकूर यांच्या विशेष सूचनेनुसार खासगी कंपनीने या ॲपची निर्मिती केली आहे. वुलू या ॲपद्वारे शासकीय महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रारंभी मुंबईतील १५०० हॉटेल आणि रेस्टॉरन्टच्या प्रसाधनगृहांचा वापर करता येणार आहे. हे ॲप विनामुल्य असून महिलांना स्वच्छ आणि सुरक्षित प्रसाधनगृहांची उपलब्धता करून देणार आहे. सुरुवातीला शासकीय महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांना हे ॲप विनामूल्य वापरता येणार असून सर्वसामान्य महिलांसाठी ९९ रुपये प्रतिमाह सबस्क्रिप्शन घेऊन वापर करता येणार आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोरवर सहजरीत्या उपलब्ध करून देण्यात आले आहे. वुलू ॲपने प्रमाणित केलेल्या हॉटेल्स आणि रेस्टॉरन्टच्या प्रसाधनगृहांची यादी या ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

उपक्रमाचा शुभारंभ

मासिक पाळीदरम्यान वापरण्यात येणाऱ्या सॅनिटरी नॅपकिन्सची 'पॅडकेअर' मशीनच्या वापराद्वारे आरोग्यपूर्ण व पर्यावरणपूरक विल्हेवाट लावण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने 'सॅनिटरी नॅपकिन्सची पर्यावरणपूरक विल्हेवाट' या उपक्रमाचा शुभारंभ महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर आणि माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

परदेश शिष्यवृत्ती योजना

सामाजिक न्याय विभागांतर्गत परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या नियमात अंशतः बदल करण्यात आला असून, यानुसार आता योजनेचे लाभार्थी म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव लाभ नाकारल्यास निवड सूचीतील प्रतिक्षा यादीतील पुढील पात्र विद्यार्थ्यांला परदेश शिष्यवृत्तीचा लाभ मिळू शकेल. याबाबतचा शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे, असे सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले.

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व
विशेष साहाय्य मंत्री

टुरिस्ट गाईड होण्याची संधी

पर्यटनाची आवड असणाऱ्या होतकरू उमेदवारांना पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण देऊन राज्यात १ हजार टुरिस्ट गाईड तयार करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाने पुढाकार घेतला आहे. या योजनेंतर्गत राज्याच्या विविध भागातील उमेदवारांना केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने तयार केलेल्या ऑनलाईन आयआयटीएफ टुरिजम फॅसिलिटेटर सर्टिफिकेशन प्रोग्रामअंतर्गत मोफत पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या

प्रशिक्षणानंतर उमेदवारांना महाराष्ट्र शासनाचे प्रमाणित टुरिस्ट गाईड म्हणून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. त्यांना राज्यस्तरावर तसेच विविध पर्यटन ठिकाणी टुरिस्ट गाईड म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे.

या डिजिटल उपक्रमामुळे विद्यार्थी तथा उमेदवारांना त्यांच्या वेळेनुसार आणि ते ज्या ठिकाणी असतील तेथून, आपल्या सवडीनुसार हे ऑनलाइन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. http://iitf.gov.in या पोर्टलवर हिंदी व इंग्रजी भाषेत विविध पर्यटन विषयाच्या महत्त्वाच्या काही अभ्यासक्रमासोबत सात मॉड्युल्ससह मूलभूत ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध आहे. एकूण कार्यक्रम नोंदणी शुल्क २ हजार रुपये असून परीक्षा शुल्क ५०० रुपये आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या १ हजार उमेदवारांना पर्यटन संचालनालयामार्फत नोंदणी शुल्क परत करण्यात येणार आहे. यामध्ये सहभागासाठी १८ ते ४० वयोगटातील उमेदवारांनी किमान बारावी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या उमेदवाराचे किमान दहावी श्रेणी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

उमेदवारास ऑनलाईन प्रशिक्षण आणि परीक्षेनंतर इंटर्नशिपची संधी आणि वर्तन कौशल्य प्रशिक्षणही देण्यात येईल. आयआयटीएफचे मूलभूत प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर राज्याच्या पर्यटन संचालनालयामार्फत एक दिवसाचे मूल्यांकन प्रशिक्षण घेतले जाईल आणि त्यानंतर महाराष्ट्र पर्यटन परवानाकृत मार्गदर्शक अशा स्वरूपात या उमेदवारास अंतिम प्रमाणपत्र देण्यात येईल. यशस्वी उमेदवारांना महाराष्ट्रातील सर्व पर्यटनस्थळे (केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या आधिपत्याखालील पर्यटनस्थळे वगळता) कोणत्याही पर्यटनस्थळांना सेवा देण्याची परवानगी दिली जाईल. अधिक माहितीसाठी http://iitf.gov.in पोर्टलवर किंवा पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ०२२-६२९४८८१७ वर किंवा diot@maharashtratourism.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

वेटलँडस्चे जतन आणि संवर्धन

आदित्य ठाकरे
पर्यटन मंत्री

राज्यातील 'नॉट वेटलँड' म्हणून पडताळणी झालेल्या साईटस्ची पुन्हा पडताळणी करण्यात यावी, वेटलँडस्च्या जतन आणि संवर्धनाचा समावेश माझी वसुंधरा अभियानात करण्यात यावा. तसेच याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांची विभागस्तरावर कार्यशाळा घेण्यात यावी, अशा सूचना पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री तथा महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरणाचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी दिल्या.

साहित्य अकादमीचे पुरस्कार

प्रसिद्ध लेखक नंदा खरे यांच्या 'उद्या' या कांदबरीस वर्ष-२०२० साठीचा सर्वोत्कृष्ट मराठी कलाकृतीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. तसेच प्रसिद्ध बाल साहित्यिक आबा महाजन लिखित 'आबाची गोष्ट' या लघुकथा संग्रहास 'बाल साहित्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठित 'साहित्य अकादमी पुरस्कार-२०२०' ची घोषणा झाली. अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत देशातील २० भाषांकरिता 'साहित्य अकादमी पुरस्कार' तसेच २१ लेखकांना 'बाल साहित्य पुरस्कार' तर १८ भाषांकरिता 'युवा पुरस्कार' विजेत्यांची घोषणा करण्यात आली.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार

सांस्कृतिक कार्य विभागातर्फे देण्यात येणारा यावर्षीचा भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ व्हायोलिन वादक, गुरू विदुषी डॉ. एन. राजम यांना जाहीर करण्यात आला आहे.

५ लाख रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही निवड केली असून राज्यमंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर, डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे, उस्ताद फय्याज हुसेन खाँ,पं. उद्धव आपेगावकर, डॉ. राम देशपांडे, श्री श्रीनिवास जोशी यांचा पुरस्कार निवड समितीत समावेश होता. समितीने २०२० साठीच्या पुरस्कारासाठी एन. राजम यांची निवड केली.

महाराष्ट्र भौगोलिकदृष्ट्याही श्रीमंत आहे. नद्या, डोंगर-दऱ्या, काळाकभिन्न बेसॉल्ट, मैदानी आणि पठारी भू-भाग, समुद्रकिनारा अशी विविधतेच्या दृष्टीनेही संपन्नता आहे. सह्याद्रीच्या सातमाळा, हरिश्चंद्र बालाघाट, शंभू महादेव या उपरांगा असलेल्या डोंगर रांगा आणि सातपुड्याच्या तोरणमाळ, गाविलगड या डोंगररांगाच्या साखळ्यांच्या दरम्यान कृष्णा, भीमा, गोदावरी, पैनगंगा, वैनगंगा, तापी-पूर्णा यांचे खोरे या सगळ्यांत आपला हा प्राचीन वैभवशाली ठेवा विखुरला आहे. या खोऱ्यातील प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन राज्य शासन करणार आहे, त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांसाठी मागील पिढ्यांनी निर्माण केलेला ठेवा जोपासला जाणार आहे.

वारसा जपला जाणार...

निशिकांत तोडकर

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा
अपार सिंधुच्या भव्य बांधवा, महाराष्ट्र देशा
सह्याद्रीच्या सख्या, जिवलगा, महाराष्ट्र देशा
पाषाणाच्या देही वरिसी तू हिरव्या वेषा
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा.'

कवी गोविंदाग्रज यांच्या या ओळी ओठी आल्या की, बेलाग कड्या-कपाऱ्यांनी सजलेल्या सह्याद्रीला अंगाखांद्यावर खेळवणारा आणि गोदावरी, कृष्णा आणि भीमा नद्यांच्या खोऱ्यात विसावलेला महाराष्ट्र मनपटलावर तरळू लागतो. पाषणात लपलेल्या लेण्यांचे मौक्तिक हार आणि त्यामध्ये ठायी ठायी शिल्पाकृतींच्या कला कुसरींनी सजलेली असंख्य मंदिरे दिसू लागतात.

एक काळ असा होता, की वाहतुकीची साधने अपुरी होती. पुस्तके, प्रवासवर्णने, अभ्यासकांचे लेख, नियतकालिकांसारख्या मुद्रित माध्यमांतून छायाचित्रांसह किंवा लघुपट-माहितीपटातूनच आपल्यापर्यंत या अमूल्य गोष्टींची माहिती पोहोचत होती. प्रदर्शने आणि संग्रहालय, चर्चा-परिसंवादातून या ठेव्याविषयी अपूर्वाईने चर्चा होत असे. आताही या गोष्टी घडतातच, पण या गोष्टी जाणून घेण्यासाठी, त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी आणखी वेगवान माध्यमे उपलब्ध झाली आहेत. त्यामध्ये भर पडली आहे, ती वेगवान अशा समाजमाध्यमांची. दूरसंचार आणि दळणवळणाच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे या गोष्टींपर्यंत पोहोचण्याच्या जिज्ञासूंच्या आकांक्षांना पंख लाभले आहेत. पदभ्रमंती आणि निसर्गफेऱ्यांच्या पलीकडे जाऊन आता 'एकांडे शिलेदार' महाराष्ट्रातील दऱ्या-खोऱ्यांत फिरू लागले आहेत. वारसा स्थळांच्या अवतीभवती शिवार-वावरातील नजरेआडच्या गोष्टी धुंडाळू लागले आहेत. भारत विद्या या विद्या शाखेविषयीही उत्सुकता वाढली आहे.

इंडोलॉजी विषय घेऊन भ्रमंती घेणारे आणि त्याविषयी भरभरून लिहिणारी तरुणाई समाजमाध्यमांवर झळकू लागली आहे. ब्लॉगर्स, यु-ट्यूब चॅनेल्स आणि समाजमाध्यमांवर संकेतस्थळ, स्वतःची ई-पेपर्स चालवणारी मंडळी अप्रकाशित आणि अस्पर्श लेणी, शिल्प, मंदिर, देवालये ते अगदी वीरगळ, मूर्ती यांच्याविषयी अभ्यास करू लागली आहेत. त्याविषयी लिहू लागली आहेत.

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (ता.त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक)

प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन करणार

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन-२०१९ मध्ये राज्यातील प्राचीन मंदिरांच्या जतन आणि संवर्धनाची घोषणा केली. त्यानंतर पुढचे पाऊल म्हणून या जतन आणि संवर्धन प्रकल्पासाठी राज्याच्या मंत्रिमंडळाने २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात १०१ कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता दिली.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

शिल्पकृती, मंदिरांवरील कलाकुसर, त्यातील बारकावे याविषयी बोलू लागली आहेत. या सगळ्यांचे व्हिडिओ आता सहजपणे प्रसारित होऊ लागले आहेत. अशा जिज्ञासूंचे गट वारसास्थळांसाठी हेरिटेज वॉक, हेरिटेज राईड आणि अशा कार्यक्रमांचे आयोजन करू लागले आहेत. भ्रमणमंडळे स्थापन झाली आहेत. वारसास्थळे आणि त्यातून उलगडणारी भाषा-साहित्य आणि संस्कृतीविषयीची चर्चा होऊ लागली आहे. याविषयीच्या माहितीचे आदान-प्रदान वाढू लागले आहे. वारसास्थळांविषयी आस्था आणि त्यांच्या जतन-संवर्धनाविषयीची भावना वाढीस लागली आहे.

रामायण-महाभारतानंतर शिवकाळ-पेशवेकालीन इतिहास यांच्या दरम्यानही आपल्याकडे सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, उत्तर चालुक्य, यादव आणि बाहमनी, चोळ यांसारख्या अनेक राजवटीही होत्या. त्यांच्या विषयीचे कुतूहल वाढले आहे. अभ्यास सुरू झाला आहे. या राजवटीत वैविध्यपूर्ण अशा स्थापत्यशैलींचा वापर केला गेला. सर्वदूर महाराष्ट्रात एकच स्थापत्यशैली अस्तित्वात नव्हती. तर त्यामध्येही वैविध्य होते. मंदिरांची रचना अगदी सभामंडप, आकाशमंडप, गर्भगृह यातही विशिष्ट शैली होती. बाह्य ते अंतर्गत रचना यात समरूपता आणि अनेक गोष्टींचा कलाविष्कार जाणीवपूर्वक जतन केल्याचे दिसते. सरधोपट हेमांडपंथी नव्हे, तर 'हेमाद्री पंत' हे यादवांच्या अखेरच्या काळातील प्रधानमंत्री होते. त्यांनी या विशिष्ट आणि पाषाण स्थापत्यशैली अस्तित्वात आणली. त्यामुळे आता मंदिरांच्या या भक्कम पण तुलनेने सोप्या रचनेला हेमाडपंती रचना म्हणण्यापर्यंत बदल झाला आहे.

आदरातिथ्य उद्योगालाही चालना

निसर्ग पर्यटनात, जंगल, राना वनात भटकंती करणाऱ्यांकडेही शिल्पकृती, मंदिर स्थापत्य याविषयींची माहिती सोबत ठेवण्याची आणि प्रत्यक्ष भेटीत ती पडताळण्याची जिज्ञासा रुजू लागली आहे. यातून पर्यटन आणि पारंपरिक तीर्थाटनाच्या संकल्पनातही देवळे, मंदिर आणि मूर्ती, शिल्पकृती यांच्याविषयी जाणून घेण्याची, चर्चा करण्याची जागरूकता वाढू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर जतन-संवर्धनाबाबतचा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे, ही बाब महत्त्वपूर्ण अशी आहे. यातून पर्यटन आणि तीर्थाटनांलाही चालना मिळेल. रोजगार संधी आणि आदरातिथ्य उद्योगालाही प्रोत्साहन मिळेल. या क्षेत्रातील गुंतवणूक वाढीचा हेतूही साध्य होईल, हेही तितकेच सत्य आहे. पण त्याही पुढे जाऊन या प्राचीन ठेव्याविषयी अधिकाधिक जाणून घेण्याच्या नव्या पिढीच्या प्रयत्नांना प्रोत्साहन आणि आणखी चालना मिळणार आहे. यात प्राचीन मंदिरे आणि लेणी, पाषाणातील अगदी बारव, टाक्या, ऐतिहासिक विहिरी, मंदिरांचे जतन-संवर्धन म्हणजे त्यांचा सरसकट जीर्णोद्धार नव्हे किंवा रंगरंगोटी आणि रोषणाईंनी सजवणे हे नक्कीच नाही. त्यांचे मूळरूप आणि पुरातत्त्व मूल्य टिकवून ठेवतानाच, त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची सुविधा, दळणवळण आणि त्यांच्याविषयी अधिकाधिक माहिती, संदर्भ उपलब्ध करणे, यावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी तज्ज्ञांची समिती काम करणार आहे.

महाराष्ट्र आपला हा पाषाण-काष्ठातील कलाकुसरींनी नटलेला आणि निसर्ग-राना-वनात विखुरलेला ठेवा कोमल-वेली-फुलांच्या नजाकतींनी जपण्यासाठीही प्रयत्नशील राहणार आहे. हेच 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा'...या कवितेतील पुढच्याच 'नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा...'ओळीतूनही ध्वनित होत राहते.

अंमलबजावणीसाठी समिती

प्राचीन लेणी, मंदिर, शिल्पांच्या जतन आणि संवर्धन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन.

समितीचे सदस्य - वित्त विभागाचे प्रधान सचिव, पुरातत्त्व विभागाचे संचालक, सर ज.जी कला महाविद्यालयाचे अधिष्ठाता, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक.

विशेष निमंत्रित सदस्य - पर्यटन आणि पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव.

सदस्य सचिव - सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव.

समितीची कार्यकक्षा - समिती महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे, लेण्या आणि शिल्पांचा जीर्णोद्धार आणि संवर्धनाचे कामांबाबतचे

उच्चाधिकार समितीही स्थापन

राज्यातील पुरातन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचा हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ काम करणार आहे. त्यासाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीही स्थापन करण्यात आली आहे. पुरातन मंदिरांचे स्थापत्य तसेच मंदिर परिसर विकास या विषयातील तज्ज्ञांशी आणि पुराभिलेख अधिकाऱ्यांशी विचारविनिमय सुरू आहे. या बाबतचा प्रस्ताव राज्यस्तरीय समिती समोर सादर केला जाईल.

- डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

जतन व संवर्धन

कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर)

आपल्या प्राचीन परंपरा, श्रद्धास्थाने व संस्कृतीचे जतन करणे हे आपले सर्वांचेच आद्यकर्तव्य आहे. शेकडो वर्षांचा वारसा असलेल्या व स्थापत्य शैलीसाठी प्रसिद्ध असलेल्या प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचे काम शासनाने प्राधान्याने ठरवले आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील निवडक आठ प्राचीन वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे त्यासाठी निवडली आहेत. धूतपापेश्वर मंदिर (ता. राजापूर, जि. रत्नागिरी), कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर), एकविरा माता मंदिर,कार्ले (ता. मावळ, जि. पुणे), गोंदेश्वर मंदिर (ता. सिन्नर, जि. नाशिक), खंडोबा मंदिर, सातारा (ता. जि. औरंगाबाद), भगवान पुरुषोत्तम मंदिर, पुरुषोत्तमपुरी (ता. माजलगाव, जि. बीड), आनंदेश्वर मंदिर, लासूर (ता. दर्यापूर, जि. अमरावती), शिव मंदिर, मार्कंडा (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) या मंदिरांचा त्यात समावेश आहे. या कामांसाठी २०२१-२२ मध्ये १०१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

प्रस्ताव सादर करेल.

अंमलबजावणी संस्था - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.

महामंडळास स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच महामंडळास अंशदान ठेव तत्त्वावर निधी देण्यास मान्यता.

महाराष्ट्रातील लेणी, मंदिरांचे वैभव

भारतातील १२०० पैकी ८०० लेणी महाराष्ट्रात आहेत. यातील अंजिठा-वेरूळ या ७जागतिक वारसा स्थळांसह, कित्येकांना पुरातत्त्वाच्या दृष्टीने अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी विकसित केलेले ३०० किल्ले आहेत. शिवकाळात मंदिरांचे जाणीवपूर्वक जतन-संवर्धन झाले. देशातील १२ पैकी ५ ज्योतीर्लिंग क्षेत्र महाराष्ट्रात आहेत.

सह्याद्री, सातपुड्यासह त्यांच्या उपरांगात आणि कृष्णा, भीमा, गोदावरी, पैनगंगा-वैनगंगा, तापी-पूर्णा यांसह त्यांच्या उपनद्यांच्या खोऱ्यात हजारोंनी मंदिर-शिल्प आढळतात.

संपन्नतेचा वारसा, सांस्कृतिक आरसा !

जतन-संवर्धन प्रकल्पाचे तज्ज्ञ, जिज्ञासूंकडून स्वागत

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन प्रकल्पाच्या घोषणेचे राज्यातील पुरातत्त्व क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासकांकडून आणि प्राचीन वैभवाविषयी जिव्हाळा असणाऱ्या मान्यवरांनी स्वागत केले आहे.

'या गोष्टींमध्ये आपल्या संपन्नेतचा वारसा आहे. आपल्या संपन्नतेच्या या पुराव्यांचे जतन, संवर्धन व्हायलाच हवे. या प्राचीन ठेव्याचे सर्वेक्षण, अंकेक्षण यात सातत्य राहायलाच हवे. त्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे स्वागतच आहे', अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ पुरातत्त्व तज्ज्ञ, संशोधक डॉ. प्रभाकर देव यांनी व्यक्त केली आहे. डॉ. देव म्हणाले, 'आपल्या नव्या पिढीचा प्राचीन कालखंडाचा अभ्यास अलीकडच्या पेशव्यांपर्यंतच्या इतिहासापर्यंतच जाऊन थांबतो. आपल्या दोन हजार वर्षांच्या वाटचालीतील जागतिक वारश्यांच्या अवशेषांचा अभ्यास होत नाही. त्यामुळे शालेय शिक्षणात आणि पदवी अभ्यासक्रमांतही यांचा समावेश व्हायला हवा. आपल्याकडे शेकडो मंदिरे आणि लेणी, शिल्प आहेत. त्याबाबत नव्या पिढी संदर्भहीन होत असल्याचे वाटते. त्या पार्श्वभूमीवर आपल्या बहुजन समाजातील माणसांनी साकारलेले हे कलाविष्कार जगासमोर यावेच लागतील. त्या दृष्टीने होणाऱ्या सर्वच प्रयत्नांचे स्वागतच करायला हवे.'

'महाराष्ट्रातील हा प्राचीन ठेवा म्हणजे आपला सांस्कृतिक आरसा आहे. हे स्थापत्य टिकले, तर आपण अनेक गोष्टींबाबत अभिमानाने सांगू शकतो', त्यामुळे या प्रकल्पाचे स्वागतच करायला हवे, असे ज्येष्ठ अभ्यासक, इतिहास संशोधक डॉ. अमर आडके यांनी नमूद केले. डॉ. आडके म्हणाले, 'या प्राचीन ठेव्यांचे जतन, संवर्धन हा दीर्घ अभ्यासाचा, कालावधीचा उपक्रम आहे. त्या-त्या कालखंडातील स्थापत्यशैली हा वेगळा अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळे संबंधित राजवटीतील शैली, त्यामध्ये समाविष्ट झालेल्या वेगवेगळ्या शैलींचाही अभ्यास व्हावा. हा सगळा प्राचीन ठेवा आपला सांस्कृतिक आरसा आहे. त्यामुळे त्यांच्या जतन-संवर्धनाचे मनापासून स्वागतच करायला हवे. या प्रयत्नांत सातत्यतही राहायला हवे. त्यासाठी जतन-संवर्धनचा आराखडा आणि त्याचा कृतिकार्यक्रमही निश्चित व्हावा, अशी अपेक्षा आहे.'

– सहायक संचालक (माहिती)

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयांचा आढावा.

मंत्रिमंडळात ठरले !

रिक्त पदे समप्रमाणात भरणार

राज्यातील शासकीय अधिकाऱ्यांना सरळसेवेने नियुक्ती तसेच पदोन्नतीच्या नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०१५ रद्द करण्यास व नवीन महसूल विभाग वाटप नियम २०२१ ची अधिसूचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. हे नियम 'अ' आणि 'ब' गटातील सर्व राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांसाठी असतील.

या अधिसूचनेची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे, सर्व महसुली विभागातील रिक्त पदे समप्रमाणात भरण्यात येतील. एका महसुली विभागातील कालावधी किमान तीन वर्ष राहील. एकल पालकत्व सिद्ध झालेल्या अधिकाऱ्यांना या नियमातून सूट देण्यात येईल. ३० पेक्षा कमी पदसंख्या असणाऱ्या संवर्गांना हे नियम लागू होणार नाहीत.

महसुली विभाग वाटप धोरणाच्या अंमलबजावणीत अडचणी येतात. त्याबाबत लोकप्रतिनिधी, प्रशासकीय विभाग तसेच, शासकीय अधिकारी संघटनांकडून निवेदनेही देण्यात आली आहेत. त्यांचा विचार करून सध्याचा महसूल विभाग वाटप नियम २०१५ रद्द करून, नवीन महसूल विभाग वाटप नियम २०२१ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रोत्साहन वेतनवाढ

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतनातील तफावत दूर करत त्यांना प्रोत्साहन वेतनवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कनिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन वरिष्ठ अधिकाऱ्यांपेक्षा अधिक होत असल्याने वेतनातील तफावत दूर करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारण, मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद-नागपूर खंडपीठ यांनी व उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

'सारथी'ला पुण्यात जागा

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), या संस्थेस पुण्यातील शिवाजीनगर येथील जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

शिवाजी नगर पुणे येथील (नगर भुमापन क्र.१७३ ब/१ मधील जागेपैकी) आगरकर रस्त्यावरील शालेय शिक्षण विभागाची ४ हजार १६३ चौ.मी. इतकी जागा सारथीला देण्यात येणार आहे. या ठिकाणी सारथीचे कार्यालय, अभ्यागत कक्ष, अभ्यास केंद्र, ग्रंथालय, अभ्यासिका, कॉन्फरन्स हॉल इ. सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. शासकीय जागा वाटपाबाबतच्या नियमित अटी व शर्थींच्या अधीन राहून महसूल मुक्त व भोगवटामूल्यरहित किमतीने ही जागा देण्यात देण्यात येणार आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विस्तार केंद्र

पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास हवेली तालुक्यातील चिखली येथे विस्तार केंद्र स्थापन करण्यास ११.३० हेक्टर शासकीय जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

संस्थेच्या विस्तारित केंद्रामध्ये आठ उत्कृष्टता व विकास केंद्र आणि संशोधन तसेच नावीन्यता पार्क सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या केंद्रांद्वारे प्रस्तावित सर्व अभ्यासक्रम हे कायम विना-अनुदानित व स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर संस्थेमार्फत चालवण्यास परवानगी देण्यात आली. या केंद्राच्या बांधकाम व साधनसामग्रीकरिता लागणारा एकवेळचा निधी म्हणून १५० कोटी रुपये इतका निधी पुढील तीन ते चार वर्षामध्ये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली.

नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

रत्नागिरी येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून हे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होईल. यात टप्प्याटप्प्याने एकूण ६५ शिक्षक व ५० शिक्षकेतर कर्मचारी पदे भरण्यात येतील. यासाठी १५३.४२ कोटी रुपये इतक्या खर्चास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

बंदिस्त नलिका वितरण प्रणाली

नाशिक जिल्ह्यातील दहिकुटे आणि बोरी अंबेदरी (ता.मालेगाव) या दोन पूर्ण झालेल्या लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या अस्तित्वातील कालव्यांचे रूपांतर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. खडकाळ जमिनीत पाणी गळतीच्या समस्येवर मात करण्याच्या दृष्टीने पथदर्शी प्रकल्प म्हणून हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

या प्रकल्पांचे सिंचन क्षेत्र अनुक्रमे ६४८ हेक्टर व ९१० हेक्टर इतके आहे. या प्रकल्पांच्या सध्याचा कालवा व त्यावरील वितरिका या खडकाळ व मुरमाड जमिनीतून जातात. त्यामुळे होणाऱ्या पाणी गळतीने गेल्या दहा वर्षांत या प्रकल्पातून अनुक्रमे जास्तीत जास्त ३४० हेक्टर व २४९ हेक्टर इतकेच सिंचन होऊ शकले आहे.

या प्रकल्पांच्या संपूर्ण सिंचन क्षेत्रास पाणीपुरवठा करण्याकरिता अस्तित्वातील खुले कालवे बंद नलिकांमध्ये रुपांतरित केल्यास फायदा होणार आहे. त्या दृष्टीने अस्तित्वातील उघडे कालवे

गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या दरात वाढ

गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या व डेड रेंट दरात दीडपट वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. हे वाढीव दर १ जुलै २०२१ पासून लागू होतील. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाचे दर खालीलप्रमाणे असतील.

- बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्ट्यांमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना ६०० रुपये प्रतिब्रास.
- उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड मग त्याचा आकार केवढाही असो आणि दगडाची भुकटी ६०० रुपये प्रतिब्रास.
- बांधकामासाठी वापरण्यात येणारा जांभा दगड (लॅटराईट स्टोन) १५० रुपये प्रतिब्रास.
  (क) उत्खननाद्वारे काढलेले किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरूम, कंकर ६०० रुपये प्रतिब्रास.
  (ख) केवळ बॉलमिल्सच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणार चॅल्सेडोनी खडे ३००० रुपये प्रतिब्रास.
  (ग) पुढील प्रयोजनाकरिता वापरण्यात न येणारी सर्वसामान्य वाळू.
- सिरामिक किंवा मृतिकाशिल्पे, धातुशास्त्रीय, दृष्टीविषयक, कोळसा खाणीमध्ये साठवून ठेवण्याच्या, सिल्व्हिक्रेट सिमेंट तयार करण्यासाठी, मातीची भांडी व काचसामान तयार करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता १२०० रुपये प्रतिब्रास आणि मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र वगळून इतर क्षेत्राकरिता ६०० रुपये प्रतिब्रास.
- कौले (मंगलोरी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनाची) तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी चिकणमाती ६०० रुपये प्रतिब्रास.
- अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भूपृष्ठ सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती ६०० रुपये प्रतिब्रास.
- बांधकामाचे साहित्य म्हणून वापरण्यात येते. त्या वेळी पाटीचा दगड किंवा नरम खडक रुपये ६०० रुपये प्रतिब्रास.
- विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती इत्यादी २४० रुपये प्रतिब्रास.
- फुलरची माती किंवा बेटोनाईट १५०० रुपये प्रतिब्रास.
- सजावटीच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे इतर सर्व प्रकारचे दगड (ग्रॅनाईट वगळून) ३००० रुपये प्रतिब्रास.
- इतर सर्व गौण खनिज (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून) ६०० रुपये प्रतिब्रास.
- सर्व गौण खनिजे (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून) ९,००० रुपये प्रतिहेक्टर किंवा त्याच्या भागासाठी ठोकबंद भाडे आकारण्यात येईल.

बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दहिकुटे प्रकल्पाकरिता ७.३६ कोटी रुपये व बोरी अंबेदरी लघू पाटबंधारे प्रकल्पासाठी १७.८८ कोटी रुपये असे एकूण २५.२४ कोटी रुपयांच्या किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

प्राचार्यांची वेतन निश्चिती

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील सरळसेवेने किंवा थेट नियुक्त झालेल्या प्राचार्यांची वेतन निश्चिती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१ जानेवारी २००६ रोजी अथवा त्यानंतर प्राचार्य पदावर सरळसेवेने/थेट नियुक्त झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची सहाव्या वेतन आयोगातील वेतनबॅण्ड ३७,४००- ६७,००० रुपये व ॲकॅडमिक ग्रेड वेतन १० हजार रुपये या वेतन संरचनेची ४३ हजार रुपये इतक्या वेतनावर वेतन निश्चिती करण्यात आली. यासाठी ४२ कोटी ८९ लाख ९६ हजार ८७६ रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या तरतुदीनुसार प्राचार्य पदाची वेतननिश्चिती ४३ हजार रुपये इतक्या वेतनावर करण्याबाबत उच्च न्यायालयाचे आदेश होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

मध्यम प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता

अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील मंगरुळ कांबे गावाजवळ बांधण्यात येणाऱ्या काटेपूर्णा बॅरेज, अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील पंढरी मध्यम प्रकल्प आणि धारणी तालुक्यातील मौ.मान्सुधावडी येथील गर्गा मध्यम प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

काटेपूर्णा प्रकल्पास ५३३ कोटी ८१ लाख, पंढरी मध्यम प्रकल्पास १ हजार १०९ कोटी २३ लाख, गर्गा मध्यम प्रकल्पास ४९४ कोटी २४ लाख इतक्या खर्चाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत.

काटेपूर्णा प्रकल्पामुळे १३ गावांमधील ४ हजार १३७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. पंढरी मध्यम प्रकल्पामुळे ४० गावांमधील ९ हजार १९१ हेक्टर क्षेत्र, गर्गा मध्यम प्रकल्पामुळे २५ गावांमधील ४ हजार २८१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

टीम लोकराज्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या प्रत्येक भूमिकेला अभ्यास आणि संशोधनाची जोड होती. त्यामुळे ते आपल्या विचारांवर नेहमीच ठाम राहिले. जात-पात-तोडक मंडळाच्या अधिवेशनाला पाठवलेल्या भाषणात बदल करण्याची आयोजकांनी केलेली विनंती नाकारून त्यांनी आपण आपल्या विचारावर ठाम असल्याचे सांगून विचार स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे.

मोतीराम कटारे

विचारांवर ठाम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'कोलंबिया विद्यापीठा'त एम.ए.च्या अभ्यासासाठी जुलै १९१३ ते जून १९१५ या कालावधीत गेले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या विषयातील एखाद्या कूट प्रश्नावर संशोधनात्मक लेख लिहून तो आपल्या विषयाच्या विद्यार्थ्यांसमोर वाचून दाखवावा; निबंधात विद्यार्थ्याचे स्वत:चे असे संशोधनात्मक विवेचन असले पाहिजे अशीही विद्यापीठाची अट होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'भारतातील जाती (घडण, उत्पत्ती आणि प्रसार)' हा निबंध वादकथासभेत ९ मे १९१६ रोजी वाचला.

या निबंधात त्यांनी मानववंशशास्त्रीय दृष्टीने विवेचन केले आहे. जगभरातून जातीवर ज्या विद्वानांनी संशोधन केले होते. त्यापैकी या विषयातील मूलगामी संशोधक म्हणून ज्यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. त्यात मि. सेनार्ट, मि. नेस्फिल्ड, सर एच. रिस्ले व डॉ. केतकर यांच्या व्याख्या उद्धृत करून त्यांचे तर्कशुद्ध रीतीने परीक्षण करतात आणि त्यांचे सिद्धान्त खोडून काढून आपले सिद्धान्त प्रस्थापित करतात. भारतात जातीआधी वर्ग अस्तित्वात असल्याचे ते सप्रमाण पटवून देतात व वर्गाचे रूपांतर जातीत कसे झाले हे सिद्ध करतात. जातीचे मूळ बेटीबंदीत असल्याचे त्यांनी आपल्या निबंधातून निदर्शनास आणलेच

धार्मिक सुधारणांचा मसुदा

या छापील भाषणात त्यांनी 'धर्म ही मुख्यत: तत्त्वांची बाब असली पाहिजे, ती नियमांची बाब असता कामा नये. ज्या क्षणी धर्म नियमांमध्ये बुडून जातो त्या क्षणी तो धर्म असण्याचे थांबतो.' हे स्पष्ट करताना त्यांना हिंदू धर्म हा तत्त्वांची बाब नाही हे स्पष्ट करायचे असते. हिंदू धर्म वेद आणि स्मृतींमधील नियमांची गोळाबेरीज असल्याचे नोंदवायलाही ते विसरत नाहीत. याच भाषणात त्यांनी धार्मिक सुधारणांचा मसुदा सादर केला आहे. तो आजही महत्त्वाचा असून हिंदूंनी तसेच शासनाने या भाषणाकडे गांभीर्याने पाहायला हवे व त्या स्वीकारायला हव्यात. शासनाने त्याचे कायद्यात रूपांतर करणे गरजेचे आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- सर्व हिंदूंना मान्य होईल, असा एकच प्रमाण ग्रंथ असावा. वेद, शास्त्र, पुराण यांसारख्या सर्व ग्रंथांवर कायद्याने बंदी घालावी. या ग्रंथातील मतांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्यास शिक्षा करण्यात यावी.
- वारसाहक्काने चालत येणारी पुरोहितशाही नष्ट करून शासन स्तरावर परीक्षा घेऊन पुरोहित नेमावेत. त्यास सनद दिली जावी. सनद असणारी व्यक्तीच पुरोहितगिरी करण्यास पात्र असेल, अशी कायद्यात तरतूद करण्यात यावी.
- सनद नसणाऱ्या व्यक्तीने पुरोहितगिरी केल्यास तो कायद्याने शिक्षेस पात्र राहील.
- पुरोहित राज्याचा नोकर असावा आणि देशातील इतर नागरिकांप्रमाणे तो कायद्याच्या अधीन असेल. तो त्याच्या नीतिकल्पना, श्रद्धा, उपासना याबाबत राज्याच्या शिस्तभंगाच्या कारवाईच्या अधीन असावा.
- राज्याच्या गरजांनुसार पुरोहितांची संख्या मर्यादित असावी.

पण भारतीय स्मृतिकारांनी दैवी विभागणी म्हणून गरीब जनतेवर जातिप्रथा लादली. जात ही शास्त्रांनी नेमून दिलेली आहे व शास्त्रे चूक असू शकत नाहीत हा हिंदूंचा समज असल्याचेही ते मांडतात. ब्राह्मण वर्गाने सर्वप्रथम जातीची रचना सुरू केली हेही ते निदर्शनास आणून देतात. त्यात अनुकरणाचा सिद्धान्त मांडला आहे. अनुकरणातून जाती निर्माण झाल्या. त्यांनी केलेले विवेचन एवढे शास्त्रशुद्ध आहे की, ते खोडून काढणे अशक्यच आहे.

जातिप्रथेचे विध्वंसन

१९१६ साली सुरू झालेले त्यांचे जातीसंदर्भातील चिंतन अखेरपर्यंत सुरू होते. त्याचाच परिपाक म्हणून लाहोरच्या 'जात-पात-तोडक मंडळा'ने १९३५ साली त्यांना वार्षिक परिषदेला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली. बाबासाहेबांनी मंडळाची विनंती नाकारली. बाबासाहेबच अध्यक्ष हवेत म्हणून मंडळ आग्रही होते. त्यांच्या आग्रहास्तव निमंत्रण स्वीकारून 'जातिप्रथेचे विध्वंसन' हे प्रसिद्ध भाषण तयार केले. जातिविध्वंसनासंदर्भात समग्र चिंतन त्यांनी या भाषणातून व्यक्त केले आहे. छापील भाषण बाबासाहेबांनी मंडळाकडे पाठवले तेव्हा मंडळाला हे भाषण फारच जहाल आणि वादग्रस्त वाटले. त्यांनी बाबासाहेबांना वादग्रस्त भाग वगळण्याची विनंती केली. विचार स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या बाबासाहेबांनी भाषणातील एकही शब्द बदलला जाणार नसल्याचे मंडळाला कळवले. अखेर मंडळाने आपले अधिवेशनच रद्द करून टाकले.

दुर्लक्षिलेल्या विषयाला हात

जातीचा अभ्यास करताना त्यांना धर्मशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा वाटला आणि त्यातूच 'शूद्र पूर्वी कोण होते?' व 'अस्पृश्य मूळचे कोण व ते अस्पृश्य कसे बनले?' हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ आकाराला आले. संस्कृत येत नाही, याची प्रांजळ कबुली त्यांनी या ग्रंथात दिली आहे. संस्कृत येत नाही म्हणून ते अडून बसले नाहीत. इंग्रजी भाषांतराच्या साहाय्याने त्यांनी आपले संशोधन पूर्णत्वास नेले आहे. 'शूद्र पूर्वी कोण होते?' या ग्रंथात इतिहास पद्धतीचा अवलंब करून आपले संशोधन मांडले आहे. ब्राह्मण विरूद्ध क्षत्रिय या संघर्षात ब्राह्मणांनी क्षत्रियांना कसे शूद्र दर्जाला पोहोचवले याची अभिनव आणि नवी मांडणी धर्मशास्त्रांचा आधार घेत केली आहे. 'अस्पृश्य मूळचे कोण व ते अस्पृश्य कसे बनले?' या ग्रंथात बाबासाहेबांनी विद्वान व संशोधकांनी दुर्लक्षिलेल्या विषयाला हात घातला आहे. या विषयावर संशोधन मांडणारा पहिलाच ग्रंथ असल्याचे बाबासाहेब आवर्जून नोंदवतात. या ग्रंथातील अस्पृश्यतेबाबतची उपपत्ती ही पूर्णत: नवी असल्याचेही ते नोंदवायला विसरत नाहीत. अस्पृश्य हे मूळचे बौद्ध असल्याचे साधार स्पष्ट केले आहे.

पाकिस्तानचा प्रश्न डोकेदुखी

हा ग्रंथ सुरुवातीला 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या नावाने १९४० साली प्रसिद्ध झाला होता. या ग्रंथाची सुधारित आवृत्ती १९४५ साली 'पाकिस्तान अथवा भारताची फाळणी' या नावाने प्रसिद्ध झाली. हा ग्रंथ पाच भागात विभागलेला आहे. या विषयावर ग्रंथ का लिहिला याची कारणमीमांसा त्यांनी उपोद्घातात नोंदवलेली आहे. बाबासाहेब लिहितात, 'पाकिस्तानची समस्या प्रत्येक व्यक्तीकरिता एक डोकेदुखी बनून राहिली. विशेषत: माझ्याकरिता. मी आपले इतर साहित्यिक कार्य थांबवून या समस्येच्या निवारणाकरिता आपला अमूल्य वेळ खर्ची घातला.' बाबासाहेबांचे हे मनोगत वाचले की, भारतासाठी पाकिस्तानचा प्रश्न त्या काळी जसा डोकेदुखी होता, तसा आजही डोकेदुखी ठरला आहे. हा ग्रंथ म्हणजे गेल्या शतकातील भारतीय राजनीतीचा आणि सामाजिक स्थितीचा थोडक्यात इतिहास आहे, असे नोंदवायलाही ते विसरत नाहीत.

समाजसुधारकच श्रेष्ठ

पुण्याच्या डेक्कन सभेने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त समारंभ आयोजित करून १८ जानेवारी १९४३ रोजी बाबासाहेबांना भाषण देण्यासाठी निमंत्रित केले होते.

बाबासाहेब हे निमंत्रण स्वीकारण्यास फारसे उत्सुक नव्हते. रानड्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांची चर्चा करताना त्यांच्या व्यक्तिगत विचारांची छाप उमटेल आणि संस्थेच्या सदस्यांना ते आवडणार नाही म्हणून ते निमंत्रण स्वीकारायला तयार नव्हते. अखेरीस बाबासाहेबांनी ते निमंत्रण स्वीकारले. मित्रांच्या आग्रहास्तव 'रानडे, गांधी आणि जीना' या नावाने हे भाषण पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेखाली १५ मार्च १९४७ ही तारीख आहे.

या भाषणात त्यांनी महापुरुष कोणाला म्हणावे, याची चर्चा करताना अनेक विचारवंतांची उदाहरणे देत रानडे महापुरूष असल्याचे सिद्ध केले आहे. समाजसुधारक रानडे यांची चर्चा करताना काही तात्त्विक गोष्टी बाबासाहेब सांगतात. उदा.,

- समाजसुधारक समाजालाच आव्हान देतो व स्वत:वर सामाजिक बहिष्काराची आपत्ती ओढवून घेतो.
- जेव्हा एखादा समाजसुधारक संपूर्ण समाजाला आव्हान देतो तेव्हा त्याचे स्वागत करणारा कोणीही उरत नाही. त्याचा मित्र म्हणवून घेण्यालाही कोणी तयार होत नाही. त्याचा तिटकारा करण्यात येतो. मात्र तोच जर राजकारणी देशभक्त असेल तर त्याच्यामागे सगळा समाज उभा राहतो.

ही चर्चा करताना एकाकीपणे लढणारा समाजसुधारक श्रेष्ठ की राजकारणी असा प्रश्न उपस्थित करत समाजसुधारकच श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा ते देतात.

संस्थाने आणि अल्पसंख्याक

भारताचे संविधान तयार करण्याचे काम घटना समितीकडे सोपवल्यानंतर 'अ.भा.शे.का.फेडरेशन' च्या कार्यकारी मंडळाच्या विनंतीवरून घटना समितीला सादर करण्यासाठी केलेले निवेदन म्हणजे 'संस्थाने आणि अल्पसंख्याक' (State and Minorities) हा ग्रंथ होय. अस्पृश्य हे अल्पसंख्याक नाहीत हा हिंदूंनी लावलेला जावईशोध बाबासाहेबांना मान्य नव्हता हे प्रस्तावनेतच त्यांनी स्पष्ट केलेले आहे. या विधानातून दोन अर्थ निघत असल्याचे बाबासाहेब स्पष्ट करतात. पहिला म्हणजे अस्पृश्य हे अन्य अल्पसंख्याकापेक्षा वेगळे आहेत. अन्य नागरिकांना आणि अस्पृश्यांना मिळणारे कोणतेही संरक्षण अस्पृश्यांच्या बाबतीत पुरेसे नाही. दुसरा निघणारा अर्थ म्हणजे अस्पृश्य हे अन्य अल्पसंख्याकांपेक्षा वेगळे आहेत त्यामुळे अन्य अल्पसंख्याकांना मिळणाऱ्या संरक्षणास ते पात्र नाहीत, असा निष्कर्ष काढणे त्यांना मूर्खपणाचे वाटते. या पुस्तिकेतील विचार हे इतर ग्रंथात मांडले तसे न मांडता घटनेच्या अनुच्छेदाच्या धर्तीवर मांडले आहेत.

या पुस्तिकेतील अनुच्छेद २ हा अत्यंत महत्त्वाचा आहे. यात नागरिकांचे मूलभूत अधिकार, या अधिकारांवर होणाऱ्या आक्रमणाविरुद्ध उपाय, अल्पसंख्यांकांच्या संरक्षणविषयक तरतुदी, अनुसूचित जातीकरिता संरक्षक तरतुदी, हमी या सदरात विधानमंडळे, स्थानिक संस्था यात प्रतिनिधित्वाचा अधिकार, कार्यकारिणीत प्रतिनिधित्वाचा अधिकार, शासकीय सेवेत प्रतिनिधित्वाचा अधिकार, उच्चतर शिक्षणाची जबाबदारी, स्वतंत्र वसाहती, संरक्षणविषयक तरतुदींची दुरुस्ती व अंमलबजावणी, भारतीय संस्थानातील अनुसूचित जातींना संरक्षण आदी विषयांची मांडणी केली आहे.

खंड-४ मध्ये त्यांनी ज्या तरतुदी नोंदवल्या होत्या, त्या क्रांतिकारक अशाच म्हणाव्या लागतील. मूलभूत (Key) उद्योगधंदे हे राज्यसरकारच्या मालकीचे असतील व सरकार ते चालवील, पायाभूत (Basic) उद्योग हे राज्यसरकारच्या मालकीचे असतील व ते सरकार वा सरकारी महामंडळामार्फत चालवण्यात येतील. विमाधंद्यावर राज्याचा मक्ता राहील. कृषी उद्योग हा राज्याचा राष्ट्रीय उद्योग राहील. या पुस्तिकेत त्यांनी राज्य समाजवादाचा पुरस्कार केलेला आहे. बाबासाहेबांच्या सूचना त्या वेळी भांडवलदार आणि मोठ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या घटना समितीतील सदस्यांनी अंशत: स्वीकारल्या.

भांडवलदारांच्या हुकूमशाहीला बाबासाहेबांनी या निवेदनात कडाडून विरोध केला आणि या हुकूमशाहीला चाप लावण्यासाठी कायदा करण्याची मागणी केली. संवैधानिक कायद्याद्वारे समाजाच्या राजकीय तसेच आर्थिक जडणघडणीचे स्वरूप निश्चित करणे आवश्यक असल्याचे बाबासाहेबांना वाटत होते. ते जर केले गेले असते तर आज दिसणारी आर्थिक विषमता निश्चितच काही प्रमाणात कमी झाली असती. जर घटना समितीने राज्य समाजवादाचा स्वीकार केला असता तर या देशाच्या इतिहासाला नवे वळण लागले असते.

(लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत.)

मूकनायक या मुखपत्रामुळे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी सुरू झाली होती. या पेरणीतून तरारून आलेले पीक म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची २१/२२ मार्च १९२० रोजी मुक्काम माणगाव या कोल्हापूर जिल्ह्यातील कागल संस्थानात पार पडलेली माणगाव परिषद. आपल्या समुदायासमोर जाहीररीत्या संघटना बांधणे अन् त्याजोगे समाजाच्या ऊर्जितावस्थेचे कार्यक्रम आखणाऱ्या परिषदेचे अध्यक्षपद भूषवणे हा पहिलाच प्रसंग. या माणगाव परिषदेचे हे शताब्दी समाप्ती वर्ष असल्यामुळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथम समाजहितैषी भाषणाचीही शताब्दी होत आहे. २०२० मध्ये कोरोनामुळे या परिषदेचा शताब्दी मागोवा घेता आला नाही म्हणून हा लेखन प्रपंच.

ज. वि. पवार

आंबेडकरी चळवळीचा पाया

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाश्चिमात्य उच्चभ्रू विद्यापीठातून उच्च विद्याविभूषित झाल्यावर भारतातल्या आपल्या ज्ञातबंधूच्या उन्नयनासाठी, त्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी २७ जानेवारी १९१९ रोजी साऊथ ब्युरो कमिशनसमोर साक्ष दिली. हे कमिशन मॉटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या अंतर्गत भारतातील वेगवेगळ्या जातींची मताधिकारविषयक चौकशी करत होते. डॉ. भीमराव आंबेडकरांना या समितीसमोर साक्ष द्यायची होती, परंतु ते सिडन्हॅम महाविद्यालयात प्राध्यापक होते, हे महाविद्यालय शासकीय असल्यामुळे डॉ. आंबेडकर हे सरकारी नोकर ठरले होते अन् कोणत्याही कमिशनसमोर सरकारी कर्मचाऱ्यांना निवेदन देता येत नव्हते. त्या काळात अस्पृश्यांच्या वतीने निवेदने अस्पृश्येतर नेतेच देत असत. अस्पृश्यतेचे चटके न सोसणारे नेते अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व कसे काय करणार हा प्रश्न डॉ. आंबेडकरांसमोर होता. कमिशनसमोर साक्ष देता आली नाही तरी आपले म्हणणे काय आहे हे सांगण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी टाईम्स ऑफ इंडियात १६ जानेवारी १९१९ रोजी एक पत्र प्रसिद्ध केले.

अनुभूतिजन्य साक्ष

प्रा. डॉ. आंबेडकर यांनी सरकारला एक विशेष बाब म्हणून साऊथ ब्युरो कमिशनसमोर साक्ष देण्याची परवानगी मागितली. शासनाने ती मान्य केली. त्यामुळे कमिशनसमोर २७ जानेवारी १९१९ रोजी अस्पृश्यांच्या हक्कासंदर्भात साक्ष दिली. याच दिवशी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचीही साक्ष झाली. या दोन रामजी पुत्रांनी दिलेल्या साक्षी या एकमेकाला समांतर ठरल्या. एक साक्ष अनुभूतिजन्य होती, तर दुसरी होती सहानुभूतिजन्य. याच दरम्यान छत्रपती शाहू महाराज यांच्या सहकार्याने ३१ जानेवारी १९२० पासून मूकनायक हे मुखपत्र प्रकाशित होऊ लागले. या मुखपत्रामुळे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी सुरू झाली होती. या पेरणीतून तरारून आलेले पीक म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची २१/२२ मार्च १९२० रोजी मुक्काम माणगाव या कोल्हापूर जिल्ह्यातील कागल संस्थानात पार पडलेली माणगाव परिषद.

चळवळीचे इप्सित

आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने विसाव्या शतकातील दुसरे आणि तिसरे ही दोन दशके फारच महत्त्वाची ठरतात. १६ जानेवारी

मूकनायक

बहिष्कृत भारत

१९१९ चे टाईम्समधील पत्र, २७ जानेवारी १९१९ ची साक्ष, ३१ जानेवारी १९२० पासूनचे मूकनायक, २०/२१ मार्च १९२० ची माणगाव परिषद, ३० मे १९२० ची नागपूर परिषद, १९/२० मार्च १९२७ चा महाडचा धर्मसंगर, २५ डिसेंबर १९२५ चे मनुस्मृती दहन, ३ एप्रिल १९२७ चा बहिष्कृत भारतचा प्रथमांक, २ मार्च १९३० चा काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा, १९३२ ची लंडन येथील गोलमेज परिषद आणि १३ ऑक्टोबर १९३५ ची हिंदुधर्म त्यागाची भीमगर्जना ही आंबेडकरी चळवळीच्या शिरपेचात खोवलेली मोरपिसे, चळवळीतील मैलाचे दगड. परंतु एकूणच आंबेडकरी चळवळीचा मागोवा घेतल्यास माणगाव येथील परिषदेचे अनन्यसाधारण महत्त्व जाणवते. या परिषदेची फलश्रुती म्हणजे जे ठराव पास करण्यात आले; बहुदा तेच पुढे चळवळीचे इप्सित ठरले.

शाहू महाराजांचा आशावाद

या परिषदेतील छत्रपती शाहू महाराजांची उपस्थिती अनेकांना सुखावून गेली. त्यांनी हिंदू धर्मप्रणित जातीय ज्येष्ठता, कनिष्ठता आणि पवित्र/अपवित्रता यांच्यावर घणाघाती हल्ला केला. तत्कालीन पुढाऱ्यांवर आसूड ओढताना महाराज म्हणाले की, 'त्यांना शूद्र म्हणून अस्पृश्य मानतात व त्यांना स्पर्श झाला म्हणजे स्वतःची शुद्धी करून घेतात, असे पुढारी काय कामाचे? पाश्चिमात्य देशात अथवा इतर कोणत्याही देशात असले पुढारी कोण कबूल करेल? हिंदुस्थानाशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यास जात नाही.' परंतु, दुर्दैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की, मांजर, कुत्रे किंबहुना शेणापेक्षादेखील कमी अशाप्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवास व भगिनीस वागवतो. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातिभेद मोडून अस्पृश्यास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजे.' याच सभेत शाहू महाराजांनी आशावाद जोपासला की, 'डॉ. आंबेडकरांच्या उदार मतांबद्दल स्तुती करणे जरूर आहे. विद्वानांत ते एक भूषण आहेत. त्यांना पंडित ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे.! आर्य समाज, बुद्ध समाज, ख्रिस्ती समाज यांनी त्यांना आपल्यात आनंदाने घेतले असते. परंतु, तुमचा उद्धार करण्यासाठी ते इथेच थांबले. तिकडे ते गेले नाहीत. तुम्हाला तुमचा उद्धारकर्ता मिळाला आहे. तुम्ही त्याचे आभार मानले पाहिजेत व मी सुद्धा आभार मानतो. '

स्वजनोद्धार

माणगाव परिषद ही सहजासहजी पार पडली नाही; उलट तिच्यात अडथळेच जास्त निर्माण करण्यात आले. १०० वर्षांपूर्वीचा काळ पाहिला तर त्या काळी अस्पृश्यता शिगेला पोहोचली होती. जिथे एका अस्पृश्याच्या सावलीचा बाट, तेथे हजारो अस्पृश्य एकटवणे म्हणजे धर्म बुडवणेपणाच. या परिषदेचा प्रचार अस्पृश्य मंडळी करत होती. परंतु त्याहीपेक्षा परिणामकारक अपप्रचार या परिसरातली स्पृश्य मंडळी करत होती. त्यांच्या अधिकारांना आव्हान देण्याचे सामर्थ्य सामान्य माणसात नव्हते. परिषदेला प्रजेचे दक्ष राजे छत्रपती शाहू महाराज हे उपस्थित राहणार हे जाहीर झाल्यामुळे उपस्थितीवर विपरित परिणाम झाला नाही. एका खेड्यात पार पडलेल्या या परिषदेला पाच हजार लोक उपस्थित राहणे हा एक विक्रमच होता. उच्च शिक्षणासाठी परदेश गमन करणारे डॉ. भीमराव आंबेडकर हे इंग्रजाळलेले आहेत, असा अपप्रचार होत होता. या परिषदेला शाहू महाराजांमुळे कोल्हापूर दरबारातील काही उच्चभ्रू अधिकारी हजर हाते, परंतु अस्पृश्यांच्या उद्धाराचा ठेका घेतल्याचे मिरवणारे डिप्रेस्ड क्लास मिशनचा एकही कार्यकर्ता फिरकला नाही. तेथे विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे महर्षी उपस्थित राहण्याचा प्रश्नच नव्हता. माणगाव परिषदेचे स्वागताध्यक्ष दादासाहेब इनामदार यांनी, आपल्या उद्धारासाठी इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या स्वजनोद्धाराचे महत्कार्य करण्यास एकत्र आलेल्या उपस्थितांचे स्वागत केले. याचाच अर्थ स्वउद्धारासाठी परावलंबी राहण्यापेक्षा स्वावलंबनाचा मार्ग अनुसरा हा मंत्र या परिषदेने दिला.

नव्या पिढीचे कौतुक

या परिषदेतील डॉ. भीमराव आंबेडकर यांचे अध्यक्षीय भाषण आणि छत्रपती शाहू महाराजांचे प्रमुख अतिथी म्हणून झालेले भाषण, ही दोन्ही भाषणे पुढील आंबेडकरी चळवळीच्या पायातले दगड ठरवत इतकी महत्त्वाची आहेत. या काळात स्वराज्य हा

परवलीचा शब्द होता. त्याचा आधार घेत डॉ. आंबेडकर म्हणाले की, स्वराज्य हा बाह्मणांचा जन्मसिद्ध हक्क असेल तर तो अधिकार अस्पृश्यांनाही आहे. परंतु, या स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात होईल, की नाही हा आमच्या पुढील प्रश्न आहे. मुंबई इलाख्यातील या पहिल्याच परिषदेमुळे आपल्या लोकात आपल्या उन्नतीबद्दल दिसून येत असलेल्या कळकळीची 'अपूर्व' अशी संभावना केली आणि तशी अपूर्वता बहिष्कृत लोकांच्या विचारक्रांतीतही आढळते', असे निक्षून सांगितले. डॉ. भीमराव आंबेडकर पुढे म्हणाले की, 'आपली वाईट परिस्थिती होण्याचे कारण आपले दुर्भाग्य होय आणि दुर्भाग्याला आळा घालणे आपल्या हाती नसल्या कारणाने आहे ती बिकट स्थिती आपण निमूटपणे सोसली पाहिजे, असा समज दृढ करण्यात आला होता, परंतु हल्लीच्या पिढीला मात्र आपली परिस्थिती ईश्वरी लीलेचा परिपाक आहे, असे वाटत नसून ती इतरांच्या दुष्कृत्यांच्या परिणाम आहे, असे वाटू लागले आहे, या शब्दांत बाबासाहेबांनी दैवाला फटकारले आणि नव्या पिढीला कुरवाळलेले. आपल्या अप्रगतीला हिंदुधर्मातील जन्मसिद्ध श्रेष्ठता आणि अपवित्रता कशी कारणीभूत आहे याचे विवेचन केले. ते पुढे म्हणाले की, आपल्या बहिष्कृत वर्गाची स्थिती मात्र जन्मसिद्ध आयोग्यतेमुळे व अपवित्रतेमुळे फारच शोचनीय झाली आहे. अनेक दिवस अयोग्य आणि अपवित्र मानून घेतल्यामुळे नैतिकदृष्ट्या आपल्यातील आत्मबळ व स्वाभिमान ही जी उन्नतीची आद्य कारणे असतात, ती लोपून गेली आहेत. सामाजिकदृष्ट्या हिंदू धर्मीयांप्रमाणे त्यांना कोणतेही हक्क नाहीत. यावर उपाय म्हणून आपण राजकीय सामर्थ्य संपादीले पाहिजे. जातवार प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती राजकीय सामर्थ्य येणार नाही.' असे प्रतिपादन करताना बाबासाहेब म्हणाले की, 'सत्यमेव जयते' हे तत्त्व पोकळ आहे. सत्याचा जय होण्यास आपण आपली चळवळ कायम ठेवली पाहिजे, असे सांगताना चळवळीचा मनोरा बांधण्यासाठी पायाभूत अभंग चिरा ठेवला. याच्यावरच आंबेडकरी चळवळ ओजस्वी आणि तेजस्वी रूपात उभी राहिली आहे.

दूरगामी परिणाम करणारे ठराव

या परिषदेत मंजूर करण्यात आलेले ठराव फारच महत्त्वाचे असून ते दूरगामी परिणाम करणारे ठरले आहेत. एखादी परिषद झाली की, शेवटी पारित केलेले ठराव परिषदेला उपस्थित राहणाऱ्यांना महत्त्वाचे वाटत असतात. तद्वतच तत्कालीन सरकारलाही मोलाचे वाटत असत. एवढेच नव्हे, तर त्याच धर्तीवर आणखी ठराव पारीत व्हावे म्हणून परिषदा घेण्यात येत होत्या. माणगाव परिषदेनंतर नागपूर येथे दोन दिवसीय परिषद झाली. तिचा उद्देश माणगाव परिषदेची पुनरावृत्ती व्हावी, हाच होता.

नागपूर परिषदेतील ठराव आणि माणगाव परिषदेतील ठराव याची साधर्म्यता याचीच साक्ष देते. परिषदा घेतल्यावर ठराव पास करणे, ते संबंधितांकडे पाठवणे, त्याची अंमलबजावणी होते की नाही याचा पाठपुरावा करणे, हे महत्त्वाचे असे. ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून कायदेही करण्यात आले असल्याचे प्रत्ययास येते. माणगाव परिषदेत एकूण १५ ठराव संमत करण्यात आले होते. त्यातील काही ठराव तर परंपरा बदलण्यास व जोपासलेली मानसिकता नष्ट करण्यास साहाय्यभूत ठरली आहे. उदा. ठराव क्रमांक चार (अ) नुसार 'सार्वजनिक रस्ते, विहिरी, तलाव, शाळा, धर्मशाळा तसेच लायसेन्सखाली असलेल्या करमणुकीच्या जागा, भोजनगृहे, वाहने इत्यादी सार्वजनिक सोयींचा उपयोग घेण्याचा हक्क मिळावा.' हा ठराव संमत झाला होता. हा ठराव माणगाव परिषदेत २२ मार्च १९२० रोजी झाला परंतु, त्याची अंमलबजावणी होण्यासंदर्भातला ठराव रा. ब. सीताराम केशव बोले यांनी तत्कालीन मुंबई राज्य विधिमंडळात ८ ऑगस्ट १९२३ रोजी मांडला. विधिमंडळात ठराव मांडल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नव्हती आणि म्हणून त्यांनीच ५ ऑगस्ट १९२६ रोजी ठराव मांडताना 'जी सार्वजनिक आस्थापने अंमलबजावणी करणार नाहीत त्यांची शासकीय अनुदाने बंद होतील.' असा इशारा दिला. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी डॉ. भीमराव आंबेडकर यांनी १९, २० मार्च रोजी महाडला पहिला जनलढा उभारला. देशातील अनेक विधिमंडळात शेकडो ठराव मंजूर होत असतात परंतु त्यातील एखादाच ठराव क्रांतिकारक ठरतो. या बोले ठरावामुळे अस्पृश्यांच्या मूलभूत अधिकारांना वाचा फुटली. संघर्षाची ठिणगी पडली. पण या ठरावाचे मोल आहे ते माणगावच्या परिषदेत. ठराव क्रमांक ९ (एक) अन्वये महार वतनी महार कुळास देण्याचा ठराव झाला. पुढे अनेक वर्षांनी कूळकायदा संमत झाला. खोती बिलाची प्रथमावस्था याच परिषदेच्या ठरावात दिसते. ठराव क्रमांक १३ अन्वये स्वतंत्र मतदार संघाची मागणी करण्यात आली होती. १९३२ मध्ये याच ठरावाच्या अंमलबजावणीसाठी लंडन येथील गोलमेज परिषदेत रण माजले. गांधी-आंबेडकर वा पुणे करार झाला असला तरी याच ठरावामुळे अस्पृश्यांचा कणा ताठर झाला, तो प्रखर राष्ट्रभक्त झाला. थोडक्यात आज तेजाब प्यायलेली स्वाभिमानी आणि लढाऊ अशी आंबेडकरी चळवळ अस्तित्वात आली. तिचे बीजारोपण माणगाव परिषदेने केले हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)

शेवटच्या घटकाचा विकास हे शासनाचे ध्येय आहे. विशेषतः वंचित आणि उपेक्षित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देताना त्यांना संधीची उपलब्धता करून देण्यासाठी शासन आग्रही आहे. महाविकास आघाडी शासनाने वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी विविध योजना राबवून त्याद्वारे सामाजिक विकासावर भर दिला आहे.

वंचितांचा विकास

इ. झेड. खोब्रागडे, भाप्रसे (नि.)

वंचितांचा विकास म्हणजे कोणाचा आणि कोणत्या प्रकारचा विकास? असा प्रश्न उपस्थित केला जातो. माझ्या मते, वंचित म्हणजे असा समाज घटक ज्यांच्यापर्यंत अजूनही संविधानाचा लाभ पोहोचला नाही. वंचित म्हणजे समाजातील अशी व्यक्ती की, जी माणूस जगण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांपासून दूर आहे. मूलभूत गरजा जसे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानापासून वंचित आहे. संविधानाने जरी देशातल्या प्रत्येक व्यक्तीस मूलभूत अधिकार दिले असले तरी जो समाज घटक आजही सन्मानाचे जीवन जगू शकत नाही, असा समाजवर्ग म्हणजे वंचित समाज असे ढोबळमानाने म्हणता येईल. वंचितमध्ये अनुसूचित जाति-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, इतर मागासवर्गीय, महिला व बालके, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमिक यांचा समावेश होतो. वंचितांना दोन वेळचे पोटभर जेवण, राहायला पक्के घर, अंगभर कपडा, शिक्षणाची गावात/पाड्यात सोय, आरोग्याची काळजी घेणारी यंत्रणा, अन्याय-अत्याचारापासून संरक्षण आणि सन्मानाचे जगणे उपलब्ध करून देणारी व्यवस्था करणे, हे सरकारचे काम व दायित्व आहे. लोककल्याण आणि समग्र विकास घडवून आणणे हे सरकारचे सांविधानिक कर्तव्य आहे. मग, सरकार हे कोणत्याही राजकीय पक्षाचे असो. संविधानाची शपथ घेऊन राज्यकारभार करणाऱ्या लोकशाही संस्थांमधील सर्वांनीच

ध्येय, उद्दिष्ट एकच

मागासवर्गीयांचे कल्याण यामध्ये वंचितांचा विकास अंतर्भूत आहेच. संविधानात विशेष तरतुदीही आहेत. मात्र याची सुरुवात ब्रिटिश सरकारच्या काळात झाला. १९२८ ला स्टार्ट समितीची स्थापना झाली होती. या समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सदस्य होते. बाबासाहेबांच्या अथक संघर्षातून 'बॅकवर्ड क्लास वेल्फेअर डिपार्टमेन्ट'ची स्थापना ५ नोव्हेंबर १९३२ मध्ये, मागास समाजाच्या, शोषित, वंचित, उपेक्षितांच्या उन्नतीसाठी झाली. पुढे २३ सप्टेंबर १९५७ ला, संचालक बॅकवर्ड क्लास वेल्फेअर डिपार्टमेन्ट व मुख्य निरीक्षक, प्रमाणित शाळा या दोन्ही कार्यालयांचे एकत्रीकरण करून समाज कल्याण विभागाची स्थापना झाली. मुळातच, समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटके-विमुक्त जाती, मागासवर्गीय, महिला व बालके, अपंग- दिव्यांग यांच्या समग्र कल्याणासाठी, अन्याय व शोषणमुक्तीसाठी, न्यायासाठी झटणारा व काम करणारा विभाग म्हणजे समाज कल्याण विभाग. इतर म्हणूनच, या विभागास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विभाग म्हटले जाते. पुढे या विभागाची विभागणी होऊन, १९८२ मध्ये आदिवासी विभाग, १९९१ मध्ये महिला व बालकल्याण, १९९५ मध्ये अपंग आयुक्तालय, तर २००० विमुक्त-विशेष मागास प्रवर्ग संचालनालयाची निर्मिती झाली. मंत्रालय स्तरावरसुद्धा वेगवेगळे मध्ये इतर मागासवर्ग-भटके मंत्रालयीन विभाग तयार झालेत. या सर्व विभागाचे ध्येय व उद्दिष्ट हेच आहे की, वंचिताचा विकास घडवून आणून त्यांचे जगणे प्रतिष्ठापूर्वक करणे.

लोककल्याण साधणे, गरजांवर आधारित योजना/कार्यक्रम आणणे, त्यासाठी निधी देणे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व ज्यांच्या कल्याणासाठी विकास योजना आणल्या आहेत त्याचा लाभ विनाविलंब, शोषण न करता, भ्रष्टाचारास वाव न देता, म्हणजेच गुड गर्व्हनन्स-चांगले प्रशासन' देणे हे कर्तव्य आहे. हाच संविधानाचा निर्धार आहे. तेव्हा, वंचितांचा विकास हा फार महत्त्वाचा व प्राधान्याचा विषय आहे.

वंचितांच्या विकासाचे व्हिजन

वंचितांच्या विकासाबाबत बोलताना भारतीय संविधानाच्या भाग-४ मधील 'राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे', अनुच्छेद ३६ ते ५१ ची उजळणी होण्याची गरज आहे. या तत्त्वांचा उद्देश सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे हा आहे. याचा उल्लेख संविधानाच्या प्रिॲम्बलमध्ये असून सर्व नागरिकांना तो मिळवून देण्याचा सम्यक संकल्प संविधानात आहे. संविधानाचे अनुच्छेद ४६ फार महत्त्वाचे आहे. 'राज्य हे दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषणापासून संरक्षण करील'. भेदाभेद, विषमता व असमानता यावर आधारित समाजव्यवस्थेने बहुसंख्य लोकांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. संविधान लागू झाले आणि संविधानाने जातिभेद, विषमता, असमानता दूर केली व 'नाही रे वर्गाना' आहे रे' वर्गाबरोबर, विशेष तरतुदींद्वारे सर्व क्षेत्रात संधीचे दार उघडे केले. त्यामुळेच शोषित-वंचित वर्ग कमी प्रमाणात का होईना परंतु सर्व क्षेत्रात प्रगती करताना दिसतो. संविधानामुळेच हे घडते आहे. कारण, देशाचा कारभार संविधानानुसार केला जावा हा संविधानाचा आग्रह आहे. म्हणूनच, वंचितांच्या विकासाचे व्हिजन व मिशन हे अनुच्छेद ४६ हे आहे. हे सामाजिक-आर्थिक न्याय प्रस्थापित करणारे आहे.

वंचितांच्या विकासाचे वर्ष

महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक २०१९ ला पार पडली. तीन राजकीय पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन केले. या सरकारला महाविकास आघाडीचे सरकार म्हणून संबोधिले जाते. या सरकारच्या नावातच 'महाविकास' आहे. एवढेच नव्हे, तर या सरकारचा जो किमान समान कार्यक्रम ठरवला गेला आहे, त्यात 'सामाजिक न्याय' हा एक फार महत्त्वाचा कार्यक्रम आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या सरकारने वंचितांचा विकास घडवून आणण्याचे अभिवचन दिले आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

महाविकास आघाडी सरकारचे एक वर्ष हे कोरोनाविरूद्ध लढण्यात गेले. मात्र, पुढचे वर्ष २०२१ हे वंचितांच्या विकासासाठी समर्पित होईल, महाविकास आघाडी सरकारच्या काळात एक ऐतिहासिक सुरुवात झाली, ती म्हणजे १६ डिसेंबर २०१९ ला नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या सभागृहात 'संविधानाची प्रास्ताविका' वाचण्यात आली. ही चांगली परंपरा कायम राहावी. प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीच्या दिवशी विधिमंडळात प्रास्ताविका वाचण्यात यावी. संविधान जागृतीचे काम म्हणजे देशभक्तीचे काम देश घडवण्याचे काम आहे घर घर संविधान वाचन होणे हे नागरिक म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे. संविधानाचे रक्षण म्हणजे संविधानानुसार काम हीच शपथ घेऊन सत्तेवर येणाऱ्यांनी लोकशाही मजबूत करण्यासाठी सांविधानिक नीतिमूल्ये जोपासावीत आणि राजकीय इच्छाशक्ती दाखवून 'नाही रे' वर्गासाठी काम करावे हीच संविधानाची अपेक्षा आहे. हाच सामाजिक न्याय वंचितांच्या जीवनात आनंद आणेल.

(लेखक सेवानिवृत्त सनदी अधिकारी आहेत.)

महाराष्ट्र शासन

मी जबाबदार

मी जबाबदार



मी जबाबदार

मी जबाबदार

मी जबाबदार

मी जबाबदार

माझा मास्क. माझी सुरक्षा.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे